शिक्षण संचालनालय, गोवा शासन, गोवा

# सुलभ गोमंत भारती

## पुस्तक दुसरे

इयत्ता सहावी

२०१४

शिक्षण संचालनालय, गोवा शासन, गोवा

सुलभ गोमंत भारती

पुस्तक दुसरे

इयत्ता सहावी

२०१४

मुद्रण : २००८
पुनर्मुद्रण : २००९
पुनर्मुद्रण : २०१०
पुनर्मुद्रण : २०११
पुनर्मुद्रण : २०१२
पुनर्मुद्रण : २०१३
पुनर्मुद्रण : २०१४

**प्रकाशक :**
शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय,
पर्वरी, गोवा.

**निर्मिती :**

राज्य शिक्षणशास्त्र संस्था,
आल्त-पर्वरी-गोवा.

**मुद्रक :**
गणेश प्रिंटर्स,
ई-४, न्यू को-ऑप. सोसायटी
वाय. पी. पोवारनगर.
कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन : ९८२२५५३३९४

**© शिक्षण संचालनालय, पर्वरी, गोवा ४०३५२१**

## निवेदन

आपणांस माहीत असेलच की, भारत सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून गोव्याच्या राज्य शिक्षणशास्त्र संस्थेने इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार केलेला असून त्याची अंमलबजावणी जून १९९४ पासून करण्यात आली आहे.

१९९४-९५ मध्ये इयत्ता पाचवीची पाठ्यपुस्तके तयार करण्यात येऊन ती शाळांमध्ये लावण्यात आली. त्यापुढील पायरी म्हणून चालू वर्षी (१९९५-९६) इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके तयार केलेली असून ती जून १९९५ पासून शाळांमध्ये लावण्यात येतील.

वरील कार्यक्रमानुसार मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी तयार करण्यात आलेले ''सुलभ गोमंत भारती'' पुस्तक दुसरे, इयत्ता साहवी हे सदरचे पुस्तक आपल्या हाती देत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रम विकसन कक्षाने तयार केलेले हे पाठ्यपुस्तक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना भाषाविषयक क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**शिक्षण संचालक**

मुद्रण : २००८
पुनर्मुद्रण : २००९
पुनर्मुद्रण : २०१०
पुनर्मुद्रण : २०११
पुनर्मुद्रण : २०१२
पुनर्मुद्रण : २०१३
पुनर्मुद्रण : २०१४

**प्रकाशक :**
शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय,
पर्वरी, गोवा.

**निर्मिती :**

राज्य शिक्षणशास्त्र संस्था,
आल्त-पर्वरी-गोवा.

**मुद्रक :**
गणेश प्रिंटर्स,
ई-४, न्यू को-ऑप. सोसायटी
वाय. पी. पोवारनगर.
कोल्हापूर (महाराष्ट्र)
फोन : ९८२२५५३३९४

**© शिक्षण संचालनालय, पर्वरी, गोवा ४०३५२१**

## निवेदन

आपणांस माहीत असेलच की, भारत सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून गोव्याच्या राज्य शिक्षणशास्त्र संस्थेने इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार केलेला असून त्याची अंमलबजावणी जून १९९४ पासून करण्यात आली आहे.

१९९४-९५ मध्ये इयत्ता पाचवीची पाठ्यपुस्तके तयार करण्यात येऊन ती शाळांमध्ये लावण्यात आली. त्यापुढील पायरी म्हणून चालू वर्षी (१९९५-९६) इयत्ता सहावीची पाठ्यपुस्तके तयार केलेली असून ती जून १९९५ पासून शाळांमध्ये लावण्यात येतील.

वरील कार्यक्रमानुसार मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी तयार करण्यात आलेले ''सुलभ गोमंत भारती'' पुस्तक दुसरे, इयत्ता साहवी हे सदरचे पुस्तक आपल्या हाती देत असताना मला अत्यंत आनंद होत आहे.

राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रम विकसन कक्षाने तयार केलेले हे पाठ्यपुस्तक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना भाषाविषयक क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**शिक्षण संचालक**

## प्रस्तावना

गोवा सरकारने नवीन अभ्यासक्रम सर्व शाळांमध्ये क्रमान्वित केल्यावर त्यावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने हाती घेतले. ह्या उपक्रमांत गेल्या वर्षी इयत्ता पाचवीसाठी सर्व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात आली.

ह्याच मालिकेतील इयत्ता सहावीची पुस्तके ह्या वर्षी राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने तयार केली. त्यातील मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी सुलभ गोमंत भारती पुस्तक दुसरे तयार करण्यात आले.

हे पुस्तक तयार करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण ध्यानात घेण्यात आले आहे. पुस्तकाच्या प्राथमिक अवस्थेत गोव्यातील तीस शाळांतील मराठी विषय शिक्षकांनी ह्या पुस्तकाची उपयोगिता पडताळून पाहिलेली आहे.

ह्या पुस्तकाच्या निर्मितीसाठी खालील व्यक्तींचा सहभाग लाभला आहे.

**● लेखक समिती ●**

श्री. मनोहर द. कोरगांवकर (निमंत्रक) — श्री. दशरथ स. शेटगांवकर

श्रीमती गीता गो. काळे — श्री. सुरेश बा. राणे

श्री. मारुती धों. दळवी — श्रीमती शैलजा स. किनळेकर

श्री. ज्ञानेश स. सावंत — श्रीमती कृष्णाबाई भा. नायक

**● परीक्षण समिती ●**

श्री. चंद्रकांत रामा गावस — श्री. रमेश वि. राणे

वरील सर्व सभासदांचे तसेच त्यांच्या संस्थाचालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

ह्या पाठ्यपुस्तकातील काही कविता किशोर मासिकातून घेण्यात आल्या आहेत. त्या कविता छापण्यास अनुमती दिल्याबद्दल किशोरच्या संपादिका तसेच अन्य कवी ह्यांचे आम्ही ऋणी आहोत.

संचालक,

गुढीपाडवा — राज्य शिक्षण शास्त्र संस्था,

आल्त पर्वरी – गोवा

## प्रस्तावना

गोवा सरकारने नवीन अभ्यासक्रम सर्व शाळांमध्ये क्रमान्वित केल्यावर त्यावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने हाती घेतले. ह्या उपक्रमांत गेल्या वर्षी इयत्ता पाचवीसाठी सर्व पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात आली.

ह्याच मालिकेतील इयत्ता सहावीची पुस्तके ह्या वर्षी राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने तयार केली. त्यातील मराठी (तृतीय भाषा) विषयासाठी सुलभ गोमंत भारती पुस्तक दुसरे तयार करण्यात आले.

हे पुस्तक तयार करताना विद्यार्थ्यांच्या गरजा व स्थानिक वातावरण ध्यानात घेण्यात आले आहे. पुस्तकाच्या प्राथमिक अवस्थेत गोव्यातील तीस शाळांतील मराठी विषय शिक्षकांनी ह्या पुस्तकाची उपयोगिता पडताळून पाहिलेली आहे.

ह्या पुस्तकाच्या निर्मितीसाठी खालील व्यक्तींचा सहभाग लाभला आहे.

**● लेखक समिती ●**

श्री. मनोहर द. कोरगांवकर (निमंत्रक) — श्री. दशरथ स. शेटगांवकर

श्रीमती गीता गो. काळे — श्री. सुरेश बा. राणे

श्री. मारुती धों. दळवी — श्रीमती शैलजा स. किनळेकर

श्री. ज्ञानेश स. सावंत — श्रीमती कृष्णाबाई भा. नायक

**● परीक्षण समिती ●**

श्री. चंद्रकांत रामा गावस — श्री. रमेश वि. राणे

वरील सर्व सभासदांचे तसेच त्यांच्या संस्थाचालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

ह्या पाठ्यपुस्तकातील काही कविता किशोर मासिकातून घेण्यात आल्या आहेत. त्या कविता छापण्यास अनुमती दिल्याबद्दल किशोरच्या संपादिका तसेच अन्य कवी ह्यांचे आम्ही ऋणी आहोत.

संचालक,

गुढीपाडवा — राज्य शिक्षण शास्त्र संस्था,

आल्त पर्वरी – गोवा

# अनुक्रमणिका


१. या बालांनो ........................ (कविता) ............................ १
२. रोपवाटिका ................................................................ ३
३. केल्याने होत आहे रे ! ................................................ ७
४. वाचन – एक उपक्रम ................................................ ११
५. आरोग्य धनसंपदा ...................................................... १४
६. आनंदी आनंद गडे ................ (कविता) ........................ १८
७. परिवर्तन ................................................................ २०
८. परोपकारी नरेंद्र ......................................................... २५
९. राज – रमण ............................................................ २८
१०. पक्षी आपले मित्र ..................................................... ३२
११. फुलपाखरू ........................ (कविता) ........................ ३६
१२. प्रदूषण – एक धोका ................................................. ३७
१३. दयाळू डॉक्टर ......................................................... ४२
१४. दोन पत्रे ................................................................ ४६
१५. थोर गोमन्तकीय ....................................................... ४९
१६. वारा ................................ (कविता) ........................ ५२
१७. माणसातील देव ........................................................ ५३
१८. सत्यनिष्ठ मोहन ......................................................... ५७
१९. खो – खो सामना ...................................................... ६१
२०. मनोगत .................................................................. ६५
२१. ध्वज उंच धरू .................... (कविता) ........................ ६८
२२. महर्षी व्यासमुनी ........................................................ ६९
२३. निसर्गाच्या सान्निध्यात ................................................ ७२
२४. आदर्श ग्रामपंचायत .................................................... ७५
२५. घोडेमोडणी ............................................................. ८०
२६. उरूस ..................................................................... ८३
२७. लुईची देणगी ........................................................... ८६



# अनुक्रमणिका

१. या बालांनो ........................ (कविता) ............................ १
२. रोपवाटिका ................................................................ ३
३. केल्याने होत आहे रे ! ................................................ ७
४. वाचन – एक उपक्रम ................................................ ११
५. आरोग्य धनसंपदा ...................................................... १४
६. आनंदी आनंद गडे ................ (कविता) ........................ १८
७. परिवर्तन ................................................................ २०
८. परोपकारी नरेंद्र ......................................................... २५
९. राज – रमण ............................................................ २८
१०. पक्षी आपले मित्र ..................................................... ३२
११. फुलपाखरू ........................ (कविता) ........................ ३६
१२. प्रदूषण – एक धोका ................................................. ३७
१३. दयाळू डॉक्टर ......................................................... ४२
१४. दोन पत्रे ................................................................ ४६
१५. थोर गोमन्तकीय ....................................................... ४९
१६. वारा ................................ (कविता) ........................ ५२
१७. माणसातील देव ........................................................ ५३
१८. सत्यनिष्ठ मोहन ......................................................... ५७
१९. खो – खो सामना ...................................................... ६१
२०. मनोगत .................................................................. ६५
२१. ध्वज उंच धरू .................... (कविता) ........................ ६८
२२. महर्षी व्यासमुनी ........................................................ ६९
२३. निसर्गाच्या सान्निध्यात ................................................ ७२
२४. आदर्श ग्रामपंचायत .................................................... ७५
२५. घोडेमोडणी ............................................................. ८०
२६. उरूस ..................................................................... ८३
२७. लुईची देणगी ........................................................... ८६

# १. या बालांनो

(एक पुंगीवाला जादूगार एका नगरातील मुलांना आपल्या जादूनगरीत बोलावत आहे.)



या बालांनो, या रे या!
लवकर भरभर सारे या!
मजा करा रे! मजा करा!
आज दिवस तुमचा समजा!
स्वस्थ बसे!
तोची फसे!
नवभूमी
दाविन मी,
या नगराला लागुनिया!
सुंदर ती दुसरी दुनिया!
या बालांनो, या रे या!
लवकर भरभर सारे या!
खळखळ मंजुळ गाति झरे,
गीत मधुर चहुबाजु भरे!
जिकडे तिकडे फुले फळे,
सुवास पसरे, रसहि गळे!
पर ज्यांचे
सोन्याचे
ते रावे
हेरावे
तर मग कामे टाकुनिया
नवी बघ या, ही
दुनिया!
या बालांनो या रे या!
लवकर भरभर सारे या!



# १. या बालांनो

(एक पुंगीवाला जादूगार एका नगरातील मुलांना आपल्या जादूनगरीत बोलावत आहे.)



या बालांनो, या रे या!
लवकर भरभर सारे या!
मजा करा रे! मजा करा!
आज दिवस तुमचा समजा!
स्वस्थ बसे!
तोची फसे!
नवभूमी
दाविन मी,
या नगराला लागुनिया!
सुंदर ती दुसरी दुनिया!
या बालांनो, या रे या!
लवकर भरभर सारे या!
खळखळ मंजुळ गाति झरे,
गीत मधुर चहुबाजु भरे!
जिकडे तिकडे फुले फळे,
सुवास पसरे, रसहि गळे!
पर ज्यांचे
सोन्याचे
ते रावे
हेरावे
तर मग कामे टाकुनिया
नवी बघ या, ही
दुनिया!
या बालांनो या रे या!
लवकर भरभर सारे या!

१

पंख पाचुचे मोरांना,
टिपति पाखरे मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना.
चपलगती
        हरिण किती!
देखावे
        देखावे
                तर मग लवकर धावुनिया
                नवी बघा या, ही दुनिया!
                या बालांनो, या रे या!
                लवकर भरभर सारे या!

**– भा. रा. तांबे**

---

**शब्दार्थ :**
**दुनिया** – जग. **पर** – पंख. **रावे** – पोपट.

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पुंगीवाला मुलांना काय करायला सांगत आहे ?
२. नव्या दुनियेत काय काय आहे?
३. मोर, पाखरे, घोडे ह्यांच्याबद्दल कवितेत काय काय सांगितले आहे.

◆◆◆



पंख पाचुचे मोरांना,
टिपति पाखरे मोत्यांना,
पंख फडकती घोड्यांना,
मौज दिसे ही थोड्यांना.
चपलगती
        हरिण किती!
देखावे
        देखावे
                तर मग लवकर धावुनिया
                नवी बघा या, ही दुनिया!
                या बालांनो, या रे या!
                लवकर भरभर सारे या!

**– भा. रा. तांबे**

---

**शब्दार्थ :**
**दुनिया** – जग. **पर** – पंख. **रावे** – पोपट.

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पुंगीवाला मुलांना काय करायला सांगत आहे ?
२. नव्या दुनियेत काय काय आहे?
३. मोर, पाखरे, घोडे ह्यांच्याबद्दल कवितेत काय काय सांगितले आहे.

◆◆◆

२

# २. रोपवाटिका

''या, नमस्कार.'' फाटकापाशी रखवालदाराने स्वागत केले. पंकज व त्याचे बाबा फाटकातून आत आले. दुतर्फा रंगीबेरंगी झाडे असलेल्या वाटेने चालत ते कार्यालयात पोहोचले. कार्यालयात मालक बसले होते.

''आम्हाला काही रोपटी खरेदी करावयाची आहेत आणि रोपवाटिकाही पाहावयाची आहे.'' बाबा म्हणाले.

''ठीक आहे, आमचा रखवू तुम्हाला सर्व वाटिका फिरवून दाखवील.'' मालकाने सांगितले.

रखवूबरोबर ते दोघे निघाले. प्रथम ते गुलाबाच्या कुंड्यांकडे आले. शेकडो कुंड्यांत वेगवेगळ्या रंगांची व आकाराची फुले फुलली होती. त्या सर्व कुंड्या मोठ्या जागेत मांडून ठेवल्या होत्या. रोपट्यांवरील रंगीबेरंगी गुलाब पाहून पंकजला आनंद झाला. त्यातील काही रोपटी त्याने खरेदी करण्यासाठी निवडली. जवळच जास्वंदीच्या कुंड्या होत्या. त्यातील लाल, पिवळ्या व निळ्या रंगांच्या फुलांच्या कुंड्यांची निवड केली.






# २. रोपवाटिका

''या, नमस्कार.'' फाटकापाशी रखवालदाराने स्वागत केले. पंकज व त्याचे बाबा फाटकातून आत आले. दुतर्फा रंगीबेरंगी झाडे असलेल्या वाटेने चालत ते कार्यालयात पोहोचले. कार्यालयात मालक बसले होते.

''आम्हाला काही रोपटी खरेदी करावयाची आहेत आणि रोपवाटिकाही पाहावयाची आहे.'' बाबा म्हणाले.

''ठीक आहे, आमचा रखवू तुम्हाला सर्व वाटिका फिरवून दाखवील.'' मालकाने सांगितले.

रखवूबरोबर ते दोघे निघाले. प्रथम ते गुलाबाच्या कुंड्यांकडे आले. शेकडो कुंड्यांत वेगवेगळ्या रंगांची व आकाराची फुले फुलली होती. त्या सर्व कुंड्या मोठ्या जागेत मांडून ठेवल्या होत्या. रोपट्यांवरील रंगीबेरंगी गुलाब पाहून पंकजला आनंद झाला. त्यातील काही रोपटी त्याने खरेदी करण्यासाठी निवडली. जवळच जास्वंदीच्या कुंड्या होत्या. त्यातील लाल, पिवळ्या व निळ्या रंगांच्या फुलांच्या कुंड्यांची निवड केली.




''रवळू, आम्हाला नारळाची रोपटी दाखव ना!'' बाबा म्हणाले.

रवळू त्यांना घेऊन नारळाची रोपटी असलेल्या विभागात गेला.

''ही रोपं आहेत ना, ह्यांना चार वर्षात फळं येतात. त्यांची फळं लहान असली तरी पीक भरपूर असतं. झाडंही उंच वाढत नाहीत. ती पलीकडे आहेत ना त्यांना सात – आठ वर्षात फळं येतात. त्यांची फळं मोठी असतात तशीच रुचकरही असतात. झाडांचं आयुष्यही भरपूर असतं.'' रवळूने अनेक प्रकारची नारळाची रोपे दाखविली. त्यांतील काही रोपे बाबांनी निवडली.

त्यानंतर ते चिकू, लिंबू, पेरू यांची रोपे पाहायला गेले. छोट्या छोट्या रोपट्यांवर आलेली मोठी फळे पाहून पंकजला नवल वाटले. त्याने पेरूचे रोप घेण्याचा बाबांना आग्रह केला. बाबांनी एक चांगलेसे रोप निवडले. जवळच आंब्याची रोपे होती.

''कोणकोणत्या आंब्याच्या जाती आहेत ह्या?'' रोपांकडे पाहात बाबांनी रवळूला विचारले.

वेगवेगळ्या रोपांकडे बोट दाखवीत रवळू सांगू लागला.

''मानकुराद, हापूस, जमादार, तोतापुरी, लंगडा, फेर्नांद, बारामासी, भिसम, सुकाल, निलम आणि रुमानी.''

पंकजला आंब्यांच्या जातींची नावे ऐकून गंमत वाटली.

नंतर ते पुढे गेले. तेथे काही कामगार खणत होते. तर काहीजण मातीत रेती व सुके शेण मिसळत होत. कुंड्यांत व प्लॅस्टीक पिशवीत रेतीमिश्रित माती भरत होते. पंकज बारकाईने हे सर्व पाहत होता.

''ते मातीत रेती का मिसळतात हो?'' पंकजने रवळूला विचारले.

''मातीत रेती व सुके शेण मिसळल्यामुळे माती भुसभुशीत राहाते. त्यामुळे मुळांची वाढ जलद व सहज होते.'' रवळूने उत्तर दिले.

त्यापुढील विभागात कुंड्या व प्लॅस्टीक पिशव्या ओळीने ठेवलेल्या होत्या. प्रत्येक कुंडीत व पिशवीत एकेक रोपटे होते. एक कामगार झारीतील पाण्याने त्यांना शिंपीत होता. काहीजण आंबा, काजू, चिकू, पेरू, लिंबू यांच्या छोट्या छोट्या फांद्यांचे एक टोक तिरपे कापत होते. कुंड्यांतील रोपट्यांचा वरचा भाग कापून तेथे खाच पाडत होते आणि त्या खाचेत फाद्यांचा तिरपा कापलेला भाग भरून गच्च बांधत होते.

''काय करतात हे?'' पंकजने रवळूला विचारले.

''रवळू, आम्हाला नारळाची रोपटी दाखव ना!'' बाबा म्हणाले.

रवळू त्यांना घेऊन नारळाची रोपटी असलेल्या विभागात गेला.

''ही रोपं आहेत ना, ह्यांना चार वर्षात फळं येतात. त्यांची फळं लहान असली तरी पीक भरपूर असतं. झाडंही उंच वाढत नाहीत. ती पलीकडे आहेत ना त्यांना सात – आठ वर्षात फळं येतात. त्यांची फळं मोठी असतात तशीच रुचकरही असतात. झाडांचं आयुष्यही भरपूर असतं.'' रवळूने अनेक प्रकारची नारळाची रोपे दाखविली. त्यांतील काही रोपे बाबांनी निवडली.

त्यानंतर ते चिकू, लिंबू, पेरू यांची रोपे पाहायला गेले. छोट्या छोट्या रोपट्यांवर आलेली मोठी फळे पाहून पंकजला नवल वाटले. त्याने पेरूचे रोप घेण्याचा बाबांना आग्रह केला. बाबांनी एक चांगलेसे रोप निवडले. जवळच आंब्याची रोपे होती.

''कोणकोणत्या आंब्याच्या जाती आहेत ह्या?'' रोपांकडे पाहात बाबांनी रवळूला विचारले.

वेगवेगळ्या रोपांकडे बोट दाखवीत रवळू सांगू लागला.

''मानकुराद, हापूस, जमादार, तोतापुरी, लंगडा, फेर्नांद, बारामासी, भिसम, सुकाल, निलम आणि रुमानी.''

पंकजला आंब्यांच्या जातींची नावे ऐकून गंमत वाटली.

नंतर ते पुढे गेले. तेथे काही कामगार खणत होते. तर काहीजण मातीत रेती व सुके शेण मिसळत होत. कुंड्यांत व प्लॅस्टीक पिशवीत रेतीमिश्रित माती भरत होते. पंकज बारकाईने हे सर्व पाहत होता.

''ते मातीत रेती का मिसळतात हो?'' पंकजने रवळूला विचारले.

''मातीत रेती व सुके शेण मिसळल्यामुळे माती भुसभुशीत राहाते. त्यामुळे मुळांची वाढ जलद व सहज होते.'' रवळूने उत्तर दिले.

त्यापुढील विभागात कुंड्या व प्लॅस्टीक पिशव्या ओळीने ठेवलेल्या होत्या. प्रत्येक कुंडीत व पिशवीत एकेक रोपटे होते. एक कामगार झारीतील पाण्याने त्यांना शिंपीत होता. काहीजण आंबा, काजू, चिकू, पेरू, लिंबू यांच्या छोट्या छोट्या फांद्यांचे एक टोक तिरपे कापत होते. कुंड्यांतील रोपट्यांचा वरचा भाग कापून तेथे खाच पाडत होते आणि त्या खाचेत फाद्यांचा तिरपा कापलेला भाग भरून गच्च बांधत होते.

''काय करतात हे?'' पंकजने रवळूला विचारले.

''फळे, फुले चांगली व लवकर मिळावीत म्हणून चांगल्या जातीच्या झाडाची फांदी साध्या रोपावर बांधतात. त्यामुळे चांगल्या जातीचे रोप तयार होते. यालाच कलम करणे असे म्हणतात.'' रवळूने माहिती दिली.

पंकजला रोपवाटिका पाहून समाधान वाटले. खूप झाडे लावून आपली बाग सजवावी असे त्याने ठरविले.

---

**शब्दार्थ :**

**फाटक** – कुंपणाला असलेले दार. **मिश्रित** – मिसळलेली.
**रखवालदार** – राखण करणारा.

**प्रश्न :**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. पंकज व बाबा यांचे स्वागत रखवालदाराने कसे केले?
२. बाबांनी मालकांना काय सांगितले?
३. रवळूने पंकज व बाबांना प्रथम कुठे नेले?
४. पंकजने कोणती फुलझाडे खरेदी केली?
५. पंकजला कोणत्या गोष्टीचे नवल वाटले?
६. रोपवाटिका पाहून पंकजने काय करायचे ठरविले?

**२. खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) रवळूने माडाच्या रोपांबद्दल कोणती माहिती सांगितली?
ब) कामगार कोणकोणती कामे करीत होते?
क) रोप लावायच्या मातीत रेती व सुके शेण का मिसळतात?

**व्यवसाय :**

खाली दिलेल्या वाक्यांच्या समोरील कंसातील योग्या शब्द निवडून वाक्ये पूर्ण करून लिहा :

क) मातीत रेती मिसळली की माती............. राहाते.
(खडखडीत, सुळसुळीत, भुसभुशीत)

ख) दुपारी.......... उन्हातून गणेश घरी गेला.
(चकचकीत, रखरखीत, सणसणीत)



''फळे, फुले चांगली व लवकर मिळावीत म्हणून चांगल्या जातीच्या झाडाची फांदी साध्या रोपावर बांधतात. त्यामुळे चांगल्या जातीचे रोप तयार होते. यालाच कलम करणे असे म्हणतात.'' रवळूने माहिती दिली.

पंकजला रोपवाटिका पाहून समाधान वाटले. खूप झाडे लावून आपली बाग सजवावी असे त्याने ठरविले.

---

**शब्दार्थ :**

**फाटक** – कुंपणाला असलेले दार. **मिश्रित** – मिसळलेली.
**रखवालदार** – राखण करणारा.

**प्रश्न :**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. पंकज व बाबा यांचे स्वागत रखवालदाराने कसे केले?
२. बाबांनी मालकांना काय सांगितले?
३. रवळूने पंकज व बाबांना प्रथम कुठे नेले?
४. पंकजने कोणती फुलझाडे खरेदी केली?
५. पंकजला कोणत्या गोष्टीचे नवल वाटले?
६. रोपवाटिका पाहून पंकजने काय करायचे ठरविले?

**२. खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) रवळूने माडाच्या रोपांबद्दल कोणती माहिती सांगितली?
ब) कामगार कोणकोणती कामे करीत होते?
क) रोप लावायच्या मातीत रेती व सुके शेण का मिसळतात?

**व्यवसाय :**

खाली दिलेल्या वाक्यांच्या समोरील कंसातील योग्या शब्द निवडून वाक्ये पूर्ण करून लिहा :

क) मातीत रेती मिसळली की माती............. राहाते.
(खडखडीत, सुळसुळीत, भुसभुशीत)

ख) दुपारी.......... उन्हातून गणेश घरी गेला.
(चकचकीत, रखरखीत, सणसणीत)

५

ग) रामभाऊ नेहमी............ आवाजात प्रभावी भाषण करतात.
(मिळमिळीत, खणखणीत, किरकिरीत)

घ) रस्ता....... असल्यामुळे विनू घसरून पडला.
(खडखडीत, बुळबुळीत, दलदलीत)

ड) सोन्याचे............. दागिने पाहून मुलींना आनंद झाला.
(फटफटीत, झिरझिरीत, चकचकीत)

च) रमेश आज....... जेवण जेवल्यामुळे त्याच्या डोळ्यांतून पाणी आले
(मिळमिळीत, चमचमीत, झणझणीत)

**उपक्रम :**

शिक्षकांच्या मदतीने एखाद्या रोपट्याचे / झाडाचे कलम करा व ते करताना कोणकोणत्या कृती केल्या ते लिहा.

◆◆◆



ग) रामभाऊ नेहमी............ आवाजात प्रभावी भाषण करतात.
(मिळमिळीत, खणखणीत, किरकिरीत)

घ) रस्ता....... असल्यामुळे विनू घसरून पडला.
(खडखडीत, बुळबुळीत, दलदलीत)

ड) सोन्याचे............. दागिने पाहून मुलींना आनंद झाला.
(फटफटीत, झिरझिरीत, चकचकीत)

च) रमेश आज....... जेवण जेवल्यामुळे त्याच्या डोळ्यांतून पाणी आले
(मिळमिळीत, चमचमीत, झणझणीत)

**उपक्रम :**

शिक्षकांच्या मदतीने एखाद्या रोपट्याचे / झाडाचे कलम करा व ते करताना कोणकोणत्या कृती केल्या ते लिहा.

◆◆◆

६

# ३. केल्याने होत आहे रे!

श्याम हा आठ-दहा वर्षांचा मुलगा. लहानपणी तो आपल्या आईला पोथ्यापुराणे वाचून दाखवीत असे. संध्याकाळी देवापुढे बसून काही स्तोत्रे म्हणत असे. रामरक्षा मात्र त्याला पाठ म्हणता येत नव्हती. त्याच्या वडिलांनी त्याला ती शिकवली नव्हती. आपल्याला रामरक्षा पाठ म्हणता येत नाही याचे श्यामला खूप वाईट वाटे.

श्यामच्या शेजारी त्याचा मित्र भास्कर राहत होता. संध्याकाळ झाली की भास्कर रामरक्षा मोठ्याने म्हणत असे. भास्करला पाठ म्हणता येते पण आपल्याला ती पाठ म्हणता येत नाही याची श्यामला खंत वाटे.

एके दिवशी भास्कर एकटाच घरी होता. तो मोठमोठ्याने रामरक्षा म्हणत असताना श्याम त्याच्या घरी गेला. तेव्हा भास्कर त्याला म्हणाला, ''अरे श्याम, मी रोज रामरक्षा म्हणतो. तुला कुठे येते?'' भास्करचे शब्द कानी पडताच श्याम संतापला. तो भास्करच्या अंगावर धावून गेला व त्याला चांगलेच सुनावले.

''तुला पाठ म्हणता येते हे माहीत आहे मला, एवढी ऐट नको काही! माझ्याजवळ पुस्तक असतं तर तुझ्या आधी मी पण पाठ केली असती. मोठा आला आहे पाठ करणारा!''

श्यामचा मोठा आवाज ऐकून त्याची आई तिथे आली. ती श्यामला म्हणाली, 'अरे श्याम, मी सर्व ऐकलं आहे. तुला पाठ येत नाही असं त्यानं म्हटलं तर त्यात चिडण्यासारखं काय आहे? खरं तेच त्यानं सांगितलं. आपला कमीपणा दाखविला म्हणून रागवावं कशाला? ती उणीव दूर करण्यचा प्रयत्न करावा. तू पाठ का करीत नाहीस?''

''आई, मी बरेच दिवस भाऊंच्या मागे लागलो की, मला रामरक्षा शिकवा म्हणून. पण त्यांना वेळच मिळत नाही. शिवाय माझ्याजवळ पुस्तकही नाही.'' श्यामने आईला आपली अडचण सांगितली.

''अरे, मग भास्करचं पुस्तक आहे ना? त्याच्याकडून पुस्तक मागून घे, लिहून काढ आणि पाठ कर.'' आईने श्यामला सुचविले. श्यामला आईचे म्हणणे पटले. त्याने मनातल्या मनात निश्चय केला. कोऱ्या कागदांची एक वही तयार केली. दुसऱ्या दिवशी सकाळीच श्याम भास्करच्या घरी गेला. त्याने भास्करकडे पुस्तक मागितले. भास्कर पुस्तक द्यायला तयार नव्हता. श्यामने त्याच्या आईला सांगितले.



# ३. केल्याने होत आहे रे!

श्याम हा आठ-दहा वर्षांचा मुलगा. लहानपणी तो आपल्या आईला पोथ्यापुराणे वाचून दाखवीत असे. संध्याकाळी देवापुढे बसून काही स्तोत्रे म्हणत असे. रामरक्षा मात्र त्याला पाठ म्हणता येत नव्हती. त्याच्या वडिलांनी त्याला ती शिकवली नव्हती. आपल्याला रामरक्षा पाठ म्हणता येत नाही याचे श्यामला खूप वाईट वाटे.

श्यामच्या शेजारी त्याचा मित्र भास्कर राहत होता. संध्याकाळ झाली की भास्कर रामरक्षा मोठ्याने म्हणत असे. भास्करला पाठ म्हणता येते पण आपल्याला ती पाठ म्हणता येत नाही याची श्यामला खंत वाटे.

एके दिवशी भास्कर एकटाच घरी होता. तो मोठमोठ्याने रामरक्षा म्हणत असताना श्याम त्याच्या घरी गेला. तेव्हा भास्कर त्याला म्हणाला, ''अरे श्याम, मी रोज रामरक्षा म्हणतो. तुला कुठे येते?'' भास्करचे शब्द कानी पडताच श्याम संतापला. तो भास्करच्या अंगावर धावून गेला व त्याला चांगलेच सुनावले.

''तुला पाठ म्हणता येते हे माहीत आहे मला, एवढी ऐट नको काही! माझ्याजवळ पुस्तक असतं तर तुझ्या आधी मी पण पाठ केली असती. मोठा आला आहे पाठ करणारा!''

श्यामचा मोठा आवाज ऐकून त्याची आई तिथे आली. ती श्यामला म्हणाली, 'अरे श्याम, मी सर्व ऐकलं आहे. तुला पाठ येत नाही असं त्यानं म्हटलं तर त्यात चिडण्यासारखं काय आहे? खरं तेच त्यानं सांगितलं. आपला कमीपणा दाखविला म्हणून रागवावं कशाला? ती उणीव दूर करण्यचा प्रयत्न करावा. तू पाठ का करीत नाहीस?''

''आई, मी बरेच दिवस भाऊंच्या मागे लागलो की, मला रामरक्षा शिकवा म्हणून. पण त्यांना वेळच मिळत नाही. शिवाय माझ्याजवळ पुस्तकही नाही.'' श्यामने आईला आपली अडचण सांगितली.

''अरे, मग भास्करचं पुस्तक आहे ना? त्याच्याकडून पुस्तक मागून घे, लिहून काढ आणि पाठ कर.'' आईने श्यामला सुचविले. श्यामला आईचे म्हणणे पटले. त्याने मनातल्या मनात निश्चय केला. कोऱ्या कागदांची एक वही तयार केली. दुसऱ्या दिवशी सकाळीच श्याम भास्करच्या घरी गेला. त्याने भास्करकडे पुस्तक मागितले. भास्कर पुस्तक द्यायला तयार नव्हता. श्यामने त्याच्या आईला सांगितले.

७

''काकू भास्करला पुस्तक द्यायला सांगा हो, मी माझ्या वहीत रामरक्षा लिहून घेतो. मला पण पाठ करायची आहे. आज सुटी आहे. मी दिवसभर बसून लिहून काढेन.'' भास्करने आपल्या आईच्या सांगण्यावरून पुस्तक दिले.

श्याम पुस्तक घेऊन घरी आला. लेखनाचे काम करण्याकरिता तो एका निवांत जागी बसला. त्याने दिवसभरात रामरक्षा पूर्ण लिहून काढली. त्या दिवशी त्याला खूप आनंद झाला. श्यामने भास्करचे पुस्तक परत केले. एका आठवड्यात रामरक्षा पाठ करायची असे त्याने ठरविले.



लागले. चार दिवसांपूर्वी परगावी गेलेले श्यामचे वडील घरी परतले. हातपाय धुऊन घरात गेले. देवापुढे बसून श्याम अगदी खणखणीत आवाजात रामरक्षा म्हणत होता. वडील त्याच्याकडे कौतुकाने पाहत राहिले.

श्यामचे स्तोत्र म्हणून पूर्ण झाले. त्यांनी श्यामच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हटले,

''अरे, तू केव्हा पाठ केलीस? कोणी शिकवली तुला?''



''काकू भास्करला पुस्तक द्यायला सांगा हो, मी माझ्या वहीत रामरक्षा लिहून घेतो. मला पण पाठ करायची आहे. आज सुटी आहे. मी दिवसभर बसून लिहून काढेन.'' भास्करने आपल्या आईच्या सांगण्यावरून पुस्तक दिले.

श्याम पुस्तक घेऊन घरी आला. लेखनाचे काम करण्याकरिता तो एका निवांत जागी बसला. त्याने दिवसभरात रामरक्षा पूर्ण लिहून काढली. त्या दिवशी त्याला खूप आनंद झाला. श्यामने भास्करचे पुस्तक परत केले. एका आठवड्यात रामरक्षा पाठ करायची असे त्याने ठरविले.



लागले. चार दिवसांपूर्वी परगावी गेलेले श्यामचे वडील घरी परतले. हातपाय धुऊन घरात गेले. देवापुढे बसून श्याम अगदी खणखणीत आवाजात रामरक्षा म्हणत होता. वडील त्याच्याकडे कौतुकाने पाहत राहिले.

श्यामचे स्तोत्र म्हणून पूर्ण झाले. त्यांनी श्यामच्या पाठीवरून हात फिरविला आणि म्हटले,


''अरे, तू केव्हा पाठ केलीस? कोणी शिकवली तुला?''

८

श्यामने पटकन वाकून वडिलांना नमस्कार केला. वडिलांनी त्याचे कौतुक केले. त्याला खूपच आनंद झाला. तो म्हणाला, ''भाऊ, मी भास्करच्या पुस्तकावरून लिहून काढली आणि पाठ केली.'' श्यामला आपल्या वडिलांना रामरक्षा म्हणून दाखवायची होती. त्यांच्याच सांगण्यानुसार श्यामने परत एकदा एका सुरात म्हणून दाखविली.

श्यामची आई आतून हे सारे पाहत होती. तिच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. ती बाहेर आली. श्यामने तिला नमस्कार केला. त्याबरोबर आई म्हणाली,

''अरे श्याम, आता झाली की नाही पाठ! भाऊ शिकवतील म्हणून तू वाट पाहत होतास, आपल्याकडे पुस्तक नाही म्हणून रडत बसला असतास तर पाठ म्हणता आली असती का? अरे, दुसऱ्यावर अवलंबून राहू नये. मनाचा निश्चय करून त्याप्रमाणे प्रयत्न केल्यास आपण आपल्या अडचणी दूर करू शकतो. असाच कष्ट करून मोठा हो.''



**शब्दार्थ :**


**स्तोत्र** – प्रशंसा किंवा स्तुती करणारी एक पद्य रचना. **रामरक्षा** – प्रभू रामचंद्र यांची स्तुती. **उणीव** – कमीपणा. **निवांत** – शांत. **संतापणे** – रागावणे. **सुनावणे** – रागाने सांगणे. **खंत वाटणे** – वाईट वाटणे. **पारायण करणे** – पुन्हा पुन्हा वाचन करणे.



श्यामने पटकन वाकून वडिलांना नमस्कार केला. वडिलांनी त्याचे कौतुक केले. त्याला खूपच आनंद झाला. तो म्हणाला, ''भाऊ, मी भास्करच्या पुस्तकावरून लिहून काढली आणि पाठ केली.'' श्यामला आपल्या वडिलांना रामरक्षा म्हणून दाखवायची होती. त्यांच्याच सांगण्यानुसार श्यामने परत एकदा एका सुरात म्हणून दाखविली.

श्यामची आई आतून हे सारे पाहत होती. तिच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. ती बाहेर आली. श्यामने तिला नमस्कार केला. त्याबरोबर आई म्हणाली,

''अरे श्याम, आता झाली की नाही पाठ! भाऊ शिकवतील म्हणून तू वाट पाहत होतास, आपल्याकडे पुस्तक नाही म्हणून रडत बसला असतास तर पाठ म्हणता आली असती का? अरे, दुसऱ्यावर अवलंबून राहू नये. मनाचा निश्चय करून त्याप्रमाणे प्रयत्न केल्यास आपण आपल्या अडचणी दूर करू शकतो. असाच कष्ट करून मोठा हो.''



**शब्दार्थ :**

**स्तोत्र** – प्रशंसा किंवा स्तुती करणारी एक पद्य रचना. **रामरक्षा** – प्रभू रामचंद्र यांची स्तुती. **उणीव** – कमीपणा. **निवांत** – शांत. **संतापणे** – रागावणे. **सुनावणे** – रागाने सांगणे. **खंत वाटणे** – वाईट वाटणे. **पारायण करणे** – पुन्हा पुन्हा वाचन करणे.

९

**वाक्प्रचार :**

**पाठीवरून हात फिरविणे** – कौतुक करणे

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. श्यामला कोणत्या गोष्टीची खंत वाटे?
२. श्यामने कोणता निश्चय केला?
३. वडिलांना श्यामचे कौतुक का वाटले?
४. आईने श्यामला कोणता आशीर्वाद दिला?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन–तीन वाक्यांत लिहा.**

१. भास्करवर श्याम का संतापला?
२. श्यामला रामरक्षा का पाठ म्हणता येत नव्हती?
३. आईने श्यामला रामरक्षा पाठ करण्याकरिता कोणता उपाय सुचविला?
४. भास्करकडून पुस्तक मिळविण्यासाठी श्यामने काय केले?
५. रामरक्षा पाठ करण्याकरिता श्यामने काय केले?

**व्यवसाय :**

खालील परिच्छेद वाचा व त्यातील नामे शोधून लिहा.

आज जांबावली गावच्या शाळेला सुटी होती. म्हणून कृष्णाला आनंद झाला होता. दूध पिऊन बागेत गेला. झाडांना खत व पाणी घातले. बाबा खुश झाले.

**उपक्रम :**

साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक मिळवून वाचा. त्यातील तुम्हाला आवडलेला प्रसंग वर्गात सांगा.

◆◆◆



**वाक्प्रचार :**

**पाठीवरून हात फिरविणे** – कौतुक करणे

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. श्यामला कोणत्या गोष्टीची खंत वाटे?
२. श्यामने कोणता निश्चय केला?
३. वडिलांना श्यामचे कौतुक का वाटले?
४. आईने श्यामला कोणता आशीर्वाद दिला?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन–तीन वाक्यांत लिहा.**

१. भास्करवर श्याम का संतापला?
२. श्यामला रामरक्षा का पाठ म्हणता येत नव्हती?
३. आईने श्यामला रामरक्षा पाठ करण्याकरिता कोणता उपाय सुचविला?
४. भास्करकडून पुस्तक मिळविण्यासाठी श्यामने काय केले?
५. रामरक्षा पाठ करण्याकरिता श्यामने काय केले?

**व्यवसाय :**

खालील परिच्छेद वाचा व त्यातील नामे शोधून लिहा.

आज जांबावली गावच्या शाळेला सुटी होती. म्हणून कृष्णाला आनंद झाला होता. दूध पिऊन बागेत गेला. झाडांना खत व पाणी घातले. बाबा खुश झाले.

**उपक्रम :**

साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक मिळवून वाचा. त्यातील तुम्हाला आवडलेला प्रसंग वर्गात सांगा.

◆◆◆

# ४. वाचन - एक उपक्रम



वाचनालयाचा तास सुरू झाला. वर्गशिक्षिका मुलांना घेऊन वाचनालयात गेल्या. पूर्वी दिलेली पुस्तके जमा करून त्या नवीन पुस्तके द्यायच्या. पण आज नेहमीप्रमाणे बदलून द्यायला त्यांनी सुरुवातच केली नाही.

''आतापर्यंत दिलेली सर्व पुस्तके कोणी वाचली आहेत?'' शिक्षिकेने मुलांना प्रश्न केला. फक्त चारच मुलांनी हात वर केले.

''शर्मद, तुला दिलेल्या पुस्तकांपैकी कोणते पुस्तक अधिक आवडले?'' शर्मदने आपल्याला वीरकथांचे पुस्तक आवडल्याचे सांगितले. इतरांनीही आपल्याला आवडलेल्या पुस्तकांची नावे सांगितली.

''बाई, मला मिळालेले प्रत्येक पुस्तक मी वाचतोच. शिवाय प्रत्येक पुस्तकातील महत्त्वाचे विचार मी एक वहीत टिपून ठेवतो.'' महेशने अधिक माहिती सांगितली.

''बाई, मी पण एक वही ठेवली आहे. त्या वहीत मी वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचे नाव,




४. वाचन - एक उपक्रम



वाचनालयाचा तास सुरू झाला. वर्गशिक्षिका मुलांना घेऊन वाचनालयात गेल्या. पूर्वी दिलेली पुस्तके जमा करून त्या नवीन पुस्तके द्यायच्या. पण आज नेहमीप्रमाणे बदलून द्यायला त्यांनी सुरुवातच केली नाही.

''आतापर्यंत दिलेली सर्व पुस्तके कोणी वाचली आहेत?'' शिक्षिकेने मुलांना प्रश्न केला. फक्त चारच मुलांनी हात वर केले.

''शर्मद, तुला दिलेल्या पुस्तकांपैकी कोणते पुस्तक अधिक आवडले?'' शर्मदने आपल्याला वीरकथांचे पुस्तक आवडल्याचे सांगितले. इतरांनीही आपल्याला आवडलेल्या पुस्तकांची नावे सांगितली.

''बाई, मला मिळालेले प्रत्येक पुस्तक मी वाचतोच. शिवाय प्रत्येक पुस्तकातील महत्त्वाचे विचार मी एक वहीत टिपून ठेवतो.'' महेशने अधिक माहिती सांगितली.

''बाई, मी पण एक वही ठेवली आहे. त्या वहीत मी वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचे नाव,

११

मला आवडलेली वाक्ये तसेच त्यातील कथा मी थोडक्यात लिहिते.'' सुझान म्हणाली.

''अरे व्वा! शाब्बास!'' शिक्षिकेला खूपच आनंद झाला.

''तुम्ही दोघे तुमच्या वह्या एकदा वर्गात घेऊन या.'' शिक्षिका म्हणाल्या. वाचनालयाचा तास असल्याने त्या दोघांनीही वह्या आणल्या होत्या. त्यांनी त्यांच्या वह्या घेतल्या. प्रत्येकाने आपल्या वहीला सुंदर वेष्टण घातले होते. वहीच्या आत पहिल्या पानावर सुवाच्य अक्षरात आपले नाव लिहिले होते. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, पुस्तकातील महत्त्वाची वाक्ये / सुविचार इत्यादींची व्यवस्थितपणे नोंद केलेली होती. शिक्षिकेने वह्या सर्व मुलांना दाखवल्या. ही कल्पना मुलांनाही फार आवडली.

''आजपासून मी एक नवीन योजना सुरू करणार आहे.'' शिक्षिका म्हणाल्या. ''वाचनालयाच्या प्रत्येक पुस्तकात मी एकेक प्रश्नावली ठेवली आहे. पुस्तकाचे नाव, पुस्तकाचे लेखक, मजकूर यासंबंधीचे ते प्रश्न असतील. प्रश्नावली नियमितपणे सोडविणाऱ्या विद्यार्थ्यांना मी वार्षिक परीक्षेत खास गुण देणार आहे. पूर्ण पुस्तक वाचून झाल्यावरच त्या प्रश्नांची उत्तरे लिहिता येतील.'' बाईंनी आपली योजना स्पष्ट केली.

पूर्वी दिलेली पुस्तके त्यांनी आता जमा करून घेतली. नंतर प्रत्येकाला नवीन पुस्तक दिले. प्रत्येक पुस्तकात एकेक प्रश्नावली होती. त्यांनी एक प्रश्नावली घेऊन ती कशी सोडवावी ह्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येकाने त्यासाठी खास एक वही ठेवावी अशी सूचना केली.

वाचनालयाच्या पुढील तासाला विद्यार्थ्यांनी प्रश्नावली सोडवून आणली होती. सगळ्याच विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिण्याचा प्रयत्न केला होता. महेश, शर्मद, सुझान व मारिया यांनी तर उत्कृष्टच उत्तरे लिहिली होती. त्यांनी ती उत्तरे वर्गात वाचून दाखविली. ज्या मुलांना उत्तरे नीट लिहिता आली नव्हती त्यांना शिक्षिकेने मार्गदर्शन केले.

त्यानंतर वर्गातील सर्व मुले वाचनालयाची पुस्तके नीटपणे वाचू लागली. रोज परिपाठाच्या वेळी या वर्गातील प्रत्येक विद्यार्थी आता पाळीपाळीने गोष्ट सांगू लागला. मुख्याध्यापकांनीही या वर्गातील मुलांचे कौतुक केले.

---

**शब्दार्थ :**

**वेष्टण** – आवरण. **व्यवस्थित** – नीट.



मला आवडलेली वाक्ये तसेच त्यातील कथा मी थोडक्यात लिहिते.'' सुझान म्हणाली.

''अरे व्वा! शाब्बास!'' शिक्षिकेला खूपच आनंद झाला.

''तुम्ही दोघे तुमच्या वह्या एकदा वर्गात घेऊन या.'' शिक्षिका म्हणाल्या. वाचनालयाचा तास असल्याने त्या दोघांनीही वह्या आणल्या होत्या. त्यांनी त्यांच्या वह्या घेतल्या. प्रत्येकाने आपल्या वहीला सुंदर वेष्टण घातले होते. वहीच्या आत पहिल्या पानावर सुवाच्य अक्षरात आपले नाव लिहिले होते. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, पुस्तकातील महत्त्वाची वाक्ये / सुविचार इत्यादींची व्यवस्थितपणे नोंद केलेली होती. शिक्षिकेने वह्या सर्व मुलांना दाखवल्या. ही कल्पना मुलांनाही फार आवडली.

''आजपासून मी एक नवीन योजना सुरू करणार आहे.'' शिक्षिका म्हणाल्या. ''वाचनालयाच्या प्रत्येक पुस्तकात मी एकेक प्रश्नावली ठेवली आहे. पुस्तकाचे नाव, पुस्तकाचे लेखक, मजकूर यासंबंधीचे ते प्रश्न असतील. प्रश्नावली नियमितपणे सोडविणाऱ्या विद्यार्थ्यांना मी वार्षिक परीक्षेत खास गुण देणार आहे. पूर्ण पुस्तक वाचून झाल्यावरच त्या प्रश्नांची उत्तरे लिहिता येतील.'' बाईंनी आपली योजना स्पष्ट केली.

पूर्वी दिलेली पुस्तके त्यांनी आता जमा करून घेतली. नंतर प्रत्येकाला नवीन पुस्तक दिले. प्रत्येक पुस्तकात एकेक प्रश्नावली होती. त्यांनी एक प्रश्नावली घेऊन ती कशी सोडवावी ह्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्येकाने त्यासाठी खास एक वही ठेवावी अशी सूचना केली.

वाचनालयाच्या पुढील तासाला विद्यार्थ्यांनी प्रश्नावली सोडवून आणली होती. सगळ्याच विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिण्याचा प्रयत्न केला होता. महेश, शर्मद, सुझान व मारिया यांनी तर उत्कृष्टच उत्तरे लिहिली होती. त्यांनी ती उत्तरे वर्गात वाचून दाखविली. ज्या मुलांना उत्तरे नीट लिहिता आली नव्हती त्यांना शिक्षिकेने मार्गदर्शन केले.

त्यानंतर वर्गातील सर्व मुले वाचनालयाची पुस्तके नीटपणे वाचू लागली. रोज परिपाठाच्या वेळी या वर्गातील प्रत्येक विद्यार्थी आता पाळीपाळीने गोष्ट सांगू लागला. मुख्याध्यापकांनीही या वर्गातील मुलांचे कौतुक केले.

---

**शब्दार्थ :**

**वेष्टण** – आवरण. **व्यवस्थित** – नीट.

१२

**प्रश्न :**

१. अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका शब्दात लिहा.

१. मुलांना घेऊन वाचनालयात कोण गेले?

२. शिक्षिकेने वाचनालयाच्या प्रत्येक पुस्तकांत काय ठेवले होते?

ब) खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन–तीन वाक्यात उत्तरे लिहा.

१. महेशने वाचनालयाच्या वहीत काय नोंदवून ठेवले?

२. शिक्षिका कोणत्या विद्यार्थ्यांना खास गुण देणार होत्या?

३. नवीन योजनेचा परिपाठासाठी मुलांना कसा उपयोग झाला?

२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन–चार वाक्यांत लिहा.

१. सुझानने वाचनालयाच्या वहीत कोणती नोंद केली होती?

२. शिक्षिकेने कोणती नवीन योजना सांगितली?

**व्यवसाय :**

एक 'पुस्तक' अनेक 'पुस्तके' या प्रकारे खालील नामांची रूपे लिहा.

| एक | अनेक |
|---|---|
| ........... | फळे |
| झाड | ........... |
| ........... | मांजरे |
| बदक | ........... |
| पान | ........... |

**उपक्रम :**

तुम्ही वाचलेल्या पुस्तकाच्या खालील प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे लिहा.

दिनांक.......... वार..........

पुस्तकाचे नाव.............

लेखकाचे नाव ...........

कथेचे नाव ..........

कथेतील व्यक्ती ........

तुम्हाला जास्त आवडलेली व्यक्ती .........

आवडलेला प्रसंग ..........

आवडलेले विचार .........

◆◆◆



**प्रश्न :**

१. अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका शब्दात लिहा.

१. मुलांना घेऊन वाचनालयात कोण गेले?

२. शिक्षिकेने वाचनालयाच्या प्रत्येक पुस्तकांत काय ठेवले होते?

ब) खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन–तीन वाक्यात उत्तरे लिहा.

१. महेशने वाचनालयाच्या वहीत काय नोंदवून ठेवले?

२. शिक्षिका कोणत्या विद्यार्थ्यांना खास गुण देणार होत्या?

३. नवीन योजनेचा परिपाठासाठी मुलांना कसा उपयोग झाला?

२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन–चार वाक्यांत लिहा.

१. सुझानने वाचनालयाच्या वहीत कोणती नोंद केली होती?

२. शिक्षिकेने कोणती नवीन योजना सांगितली?

**व्यवसाय :**

एक 'पुस्तक' अनेक 'पुस्तके' या प्रकारे खालील नामांची रूपे लिहा.

| एक | अनेक |
|---|---|
| ........... | फळे |
| झाड | ........... |
| ........... | मांजरे |
| बदक | ........... |
| पान | ........... |

**उपक्रम :**

तुम्ही वाचलेल्या पुस्तकाच्या खालील प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे लिहा.

दिनांक.......... वार..........

पुस्तकाचे नाव.............

लेखकाचे नाव ...........

कथेचे नाव ..........

कथेतील व्यक्ती ........

तुम्हाला जास्त आवडलेली व्यक्ती .........

आवडलेला प्रसंग ..........

आवडलेले विचार .........

◆◆◆

१३

# ५. आरोग्य धनसंपदा







# ५. आरोग्य धनसंपदा





१४

अंगणात मुलांचा चोर – शिपाईचा खेळ अगदी रंगात आला होता. बाजूलाच एक मुलगा रडत उभा होता. मी जवळ जाऊन त्याची विचारपूस केली. तो रडत रडत म्हणाला,

''काका, हे मला खेळायला घेत नाहीत.''

''विनोदला का खेळायला घेत नाही रे?'' मी त्या मुलांना विचारले.

''डॉक्टर काका, विनोदला खूप खरूज झाली आहे.'' भरत म्हणाला. मी विनोदकडे निरखून पाहिले. त्याच्या हातापायांच्या बोटांना खरूज झाली होती. मी त्या सर्व मुलांना घेऊन व्हरांड्यांत आलो व आत जाऊन काही रंगीत चित्रे आणली. त्यातील एक चित्र मी मुलांना दाखविले व विचारले,

''या चित्रातील मुले काय करत आहेत?''

रोहन म्हणाला, ''काका, एक मुलगा दात घासत आहे.''

''शाब्बास! रोहन.''

''सकाळी अठल्यावर दात दंतमंजनाने घासून तोंड स्वच्छ धुवावे. आपले केसही स्वच्छ ठेवावेत.'' मी अधिक स्पष्ट केले.

मी मुलांना दुसरे चित्र दाखविले.

''शांती, या चित्रातील मुलगा काय करत आहे?''

''काका, मुलगा आंघोळ करीत आहे.'' शांतीने उत्तर दिले.

''प्रत्येकाने दररोज आंघोळ केली पाहिजे. आंघोळ करताना साबण लावून शरीर स्वच्छ केले पाहिजे. आपला चेहरा, नाक, कान, हातापायांची बोटे, डोळे स्वच्छ धुतले पाहिजेत. आपले शरीर स्वच्छ असले की खरूज, पुरळ, नायटा यासारखे त्वचेचे रोग आपल्याला होत नाहीत.'' मी मुलांना समजावून सांगितले.

''शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायामाचीही आवश्यकता असते. दररोज व्यायम केल्याने आपले स्नायू बळकट होतात व आपण निरोगी राहतो. निरोगी शरीर हीच खरी संपत्ती! आपला आहार समतोल व आरोग्याला पोषक असणे तितकेच महत्त्वाचे आहे.''

मी मुलांना आणखी एक चित्र दाखविले व म्हणालो,

''या चित्रातील ही बाई कपडे धूत आहे.''

''काका, माझी आईपण रोज कपडे धुते.'' मीना म्हणाली.



अंगणात मुलांचा चोर – शिपाईचा खेळ अगदी रंगात आला होता. बाजूलाच एक मुलगा रडत उभा होता. मी जवळ जाऊन त्याची विचारपूस केली. तो रडत रडत म्हणाला,

''काका, हे मला खेळायला घेत नाहीत.''

''विनोदला का खेळायला घेत नाही रे?'' मी त्या मुलांना विचारले.

''डॉक्टर काका, विनोदला खूप खरूज झाली आहे.'' भरत म्हणाला. मी विनोदकडे निरखून पाहिले. त्याच्या हातापायांच्या बोटांना खरूज झाली होती. मी त्या सर्व मुलांना घेऊन व्हरांड्यांत आलो व आत जाऊन काही रंगीत चित्रे आणली. त्यातील एक चित्र मी मुलांना दाखविले व विचारले,

''या चित्रातील मुले काय करत आहेत?''

रोहन म्हणाला, ''काका, एक मुलगा दात घासत आहे.''

''शाब्बास! रोहन.''

''सकाळी अठल्यावर दात दंतमंजनाने घासून तोंड स्वच्छ धुवावे. आपले केसही स्वच्छ ठेवावेत.'' मी अधिक स्पष्ट केले.

मी मुलांना दुसरे चित्र दाखविले.

''शांती, या चित्रातील मुलगा काय करत आहे?''

''काका, मुलगा आंघोळ करीत आहे.'' शांतीने उत्तर दिले.

''प्रत्येकाने दररोज आंघोळ केली पाहिजे. आंघोळ करताना साबण लावून शरीर स्वच्छ केले पाहिजे. आपला चेहरा, नाक, कान, हातापायांची बोटे, डोळे स्वच्छ धुतले पाहिजेत. आपले शरीर स्वच्छ असले की खरूज, पुरळ, नायटा यासारखे त्वचेचे रोग आपल्याला होत नाहीत.'' मी मुलांना समजावून सांगितले.

''शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायामाचीही आवश्यकता असते. दररोज व्यायम केल्याने आपले स्नायू बळकट होतात व आपण निरोगी राहतो. निरोगी शरीर हीच खरी संपत्ती! आपला आहार समतोल व आरोग्याला पोषक असणे तितकेच महत्त्वाचे आहे.''

मी मुलांना आणखी एक चित्र दाखविले व म्हणालो,

''या चित्रातील ही बाई कपडे धूत आहे.''

''काका, माझी आईपण रोज कपडे धुते.'' मीना म्हणाली.

१५

''अग, आपल्या शरीराप्रमाणेच आपले कपडे स्वच्छ असले पाहिजेत. काम करताना, खेळताना आपल्याला घाम येतो. घामाने भिजलेल्या कपड्यांना हवेतील धुळीचे कण चिकटतात. असे घामट कपडे आरोग्याला अपायकारक असतात म्हणून नेहमी स्वच्छ कपडे वापरावेत. त्याचप्रमाणे आजारी माणसांचे कपडे कधीच वापरू नयेत.''

''हे आता शेवटचे चित्र पहा. या चित्रात तुम्हाला काय काय दिसते?'' मी विचारले.



रीटा म्हणाली, ''काका, या चित्रातले घर किती सुंदर दिसते आहे! घराच्या समोरच फुलझाडे आहेत. मागच्या बाजूला विहीर आहे. विहिरीजवळच एक मुलगा आंघोळ करत आहे.''

''पण काका, विहिरीजवळ आंघोळ करताना पाणी विहिरीत नाही का पडणार?'' कल्पना चटकन म्हणाली.

''मी म्हणालो, ''कल्पना, तुझे म्हणणे बरोबर आहे. विहिरीच्या जवळ आंघोळ करू नये. तसेच कपडे, भांडी, गुरे धुऊ नयेत. त्यामुळे पाणी दूषित होते. दूषित पाणी पिणे अपायकारक असते. उकळलेले व गाळलेले पाणी नेहमी प्यावे.''

''आपले घर व घरासभोवतालचा परिसरही स्वच्छ ठेवावा. आपले घर स्वच्छ व टापटीप असेल तर आपले मन प्रसन्न रहाते व सर्वांना आनंद मिळतो.''

''काका, आज तुम्ही आम्हाला छान चित्र दाखवलीत आणि माहितीपण चांगली सांगितलीत.'' रीटा म्हणाली. मी विनोदला जवळ बोलावून मलम दिले व ते कसे वापरावे याबद्दल सूचना दिल्या.

---

**शब्दार्थ :**

**दंतमंजन** – दात घासण्याची पावडर. **त्वचारोग** – कातडीचे रोग.

**वाक्प्रचार :**

**विचारपूस करणे** – चौकशी करणे. **निरखून पाहणे** – बारकाईने पाहणे.



''अग, आपल्या शरीराप्रमाणेच आपले कपडे स्वच्छ असले पाहिजेत. काम करताना, खेळताना आपल्याला घाम येतो. घामाने भिजलेल्या कपड्यांना हवेतील धुळीचे कण चिकटतात. असे घामट कपडे आरोग्याला अपायकारक असतात म्हणून नेहमी स्वच्छ कपडे वापरावेत. त्याचप्रमाणे आजारी माणसांचे कपडे कधीच वापरू नयेत.''

''हे आता शेवटचे चित्र पहा. या चित्रात तुम्हाला काय काय दिसते?'' मी विचारले.



रीटा म्हणाली, ''काका, या चित्रातले घर किती सुंदर दिसते आहे! घराच्या समोरच फुलझाडे आहेत. मागच्या बाजूला विहीर आहे. विहिरीजवळच एक मुलगा आंघोळ करत आहे.''

''पण काका, विहिरीजवळ आंघोळ करताना पाणी विहिरीत नाही का पडणार?'' कल्पना चटकन म्हणाली.

''मी म्हणालो, ''कल्पना, तुझे म्हणणे बरोबर आहे. विहिरीच्या जवळ आंघोळ करू नये. तसेच कपडे, भांडी, गुरे धुऊ नयेत. त्यामुळे पाणी दूषित होते. दूषित पाणी पिणे अपायकारक असते. उकळलेले व गाळलेले पाणी नेहमी प्यावे.''

''आपले घर व घरासभोवतालचा परिसरही स्वच्छ ठेवावा. आपले घर स्वच्छ व टापटीप असेल तर आपले मन प्रसन्न रहाते व सर्वांना आनंद मिळतो.''

''काका, आज तुम्ही आम्हाला छान चित्र दाखवलीत आणि माहितीपण चांगली सांगितलीत.'' रीटा म्हणाली. मी विनोदला जवळ बोलावून मलम दिले व ते कसे वापरावे याबद्दल सूचना दिल्या.

**शब्दार्थ :**

**दंतमंजन** – दात घासण्याची पावडर. **त्वचारोग** – कातडीचे रोग.

**वाक्प्रचार :**

**विचारपूस करणे** – चौकशी करणे. **निरखून पाहणे** – बारकाईने पाहणे.

१६

**प्रश्न :**

**१. खाली प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुलगा का रडत होता?
२. मुले विनोदला खेळायला का घेत नव्हती?
३. शरीर स्वच्छ नसल्यास कोणते त्वचारोग होतात?
४. आपला आहार कसा असावा?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे २/३ वाक्यांत लिहा.**

१. दररोज व्यायाम केल्याने कोणता फायदा होतो?
२. आपले शरीर स्वच्छ राखण्यासाठी आपण काय काय केले पाहिजे?
३. रोज स्वच्छ धुतलेले कपडे का वापरावेत?
४. पाणी कोणत्या कारणामुळे दूषित होते?
५. डॉक्टरकाकांनी विनोदला जवळ का बोलावले?
६. स्वच्छता राखल्याने कोणते फायदे होतात?

**व्यवसाय :**

**१. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दऐवजी समानार्थी शब्द वापरा.**

१. प्रत्येकाने स्नान करणे आवश्यक आहे.
२. विहिरीजवळ स्त्रिया कपडे धूत आहेत.
३. घरासभोवतालच्या आवारात फुलझाडे होती.
४. दूषित जल पिणे अपायकारक असते.
५. आपले गृह टापटीप असेल तर आपले मन प्रसन्न राहते.

२. **खालील वाक्य वाचा.**

खेळणारा मुलगा पडला.

या वाक्यात 'खेळणारा' हा शब्द 'खेळणे' या शब्दापासून तयार झाला आहे. अशाप्रकारे खालील शब्दांपासून नवीन शब्द तयार करा.

भिजणे ......... पळणे ......... करणे .........
बोलणे ......... घासणे .........

**उपक्रम :**

दंतमंजनाच्या विविध नावांची यादी तयार करा.

◆◆◆



**प्रश्न :**

**१. खाली प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुलगा का रडत होता?
२. मुले विनोदला खेळायला का घेत नव्हती?
३. शरीर स्वच्छ नसल्यास कोणते त्वचारोग होतात?
४. आपला आहार कसा असावा?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे २/३ वाक्यांत लिहा.**

१. दररोज व्यायाम केल्याने कोणता फायदा होतो?
२. आपले शरीर स्वच्छ राखण्यासाठी आपण काय काय केले पाहिजे?
३. रोज स्वच्छ धुतलेले कपडे का वापरावेत?
४. पाणी कोणत्या कारणामुळे दूषित होते?
५. डॉक्टरकाकांनी विनोदला जवळ का बोलावले?
६. स्वच्छता राखल्याने कोणते फायदे होतात?

**व्यवसाय :**

**१. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दऐवजी समानार्थी शब्द वापरा.**

१. प्रत्येकाने स्नान करणे आवश्यक आहे.
२. विहिरीजवळ स्त्रिया कपडे धूत आहेत.
३. घरासभोवतालच्या आवारात फुलझाडे होती.
४. दूषित जल पिणे अपायकारक असते.
५. आपले गृह टापटीप असेल तर आपले मन प्रसन्न राहते.

२. **खालील वाक्य वाचा.**

खेळणारा मुलगा पडला.

या वाक्यात 'खेळणारा' हा शब्द 'खेळणे' या शब्दापासून तयार झाला आहे. अशाप्रकारे खालील शब्दांपासून नवीन शब्द तयार करा.

भिजणे ......... पळणे ......... करणे .........
बोलणे ......... घासणे .........

**उपक्रम :**

दंतमंजनाच्या विविध नावांची यादी तयार करा.

◆◆◆

१७

# ६. आनंदी आनंद गडे!

आनंदी - आनंद गडे!
इकडे, तिकडे, चोहिकडे,
वरती-खाली मोद भरे,
वायुसंगे मोद फिरे,
नभात भरला,
दिशांत फिरला,
जगात उरला,
मोद विहरतो चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!
सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हसते आहे,
खुलली संध्या प्रेमाने,
आनंदे गाते गाणे,
मेघ रंगले,
चित्त दंगले,
गान स्फुरले,
इकडे, तिकडे चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!
वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षी मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरे?
कमल विकसले,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले
इकडे, तिकडे चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!




# ६. आनंदी आनंद गडे!

आनंदी - आनंद गडे!
इकडे, तिकडे, चोहिकडे,
वरती-खाली मोद भरे,
वायुसंगे मोद फिरे,
नभात भरला,
दिशांत फिरला,
जगात उरला,
मोद विहरतो चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!
सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हसते आहे,
खुलली संध्या प्रेमाने,
आनंदे गाते गाणे,
मेघ रंगले,
चित्त दंगले,
गान स्फुरले,
इकडे, तिकडे चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!
वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षी मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरे?
कमल विकसले,
भ्रमर गुंगले,
डोलत वदले
इकडे, तिकडे चोहिकडे,
आनंदी - आनंद गडे!

१८

**शब्दार्थ :**

**मोद** – आनंद. **कौमुदी** – चांदणे. **चित्त** – मन. **निर्झर** – झरा.

**प्रश्न :**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ‘आनंद सर्वत्र भरून राहिला आहे’ हे सांगणाऱ्या कवितेतील ओळी लिहा.

२. संध्या काय करीत आहे?

३. निर्झर कसे वाहतात?

४. आनंदाचा मेघ, संध्या व चित्त यावर काय परिणाम झाला आहे?

◆◆◆



**शब्दार्थ :**

**मोद** – आनंद. **कौमुदी** – चांदणे. **चित्त** – मन. **निर्झर** – झरा.

**प्रश्न :**

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ‘आनंद सर्वत्र भरून राहिला आहे’ हे सांगणाऱ्या कवितेतील ओळी लिहा.

२. संध्या काय करीत आहे?

३. निर्झर कसे वाहतात?

४. आनंदाचा मेघ, संध्या व चित्त यावर काय परिणाम झाला आहे?

◆◆◆

१९

# ७. परिवर्तन

चंद्रपूर गावात शिवरामपंत नावाचे एक गृहस्थ राहत होते. शंकर हा त्यांचा एकुलता एक मुलगा. आईवडिलांनी लहानपणी शंकरचे खूप लाड केले. तो खूप उनडक्या करी. शाळेत जाई पण अभ्यासात त्याचे लक्ष नसे. परीक्षेत परत परत नापास होई. त्यामुळे त्याने शाळा सोडली. मोठा झाल्यावर त्याला वाईट मित्रांची संगत लागली. मौजमजा करण्याकरिता पैशांची गरज भासू लागली. त्यासाठी तो लहान मोठ्या चोऱ्याही करू लागला. वडिलांनी त्याला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ!

त्याच गावात गणपतराव नावाचे एक लाकडाचे व्यापारी होते. त्यांचा व्यापार उत्तम चाले. एके दिवशी नेहमीप्रमाणे दुपारी ते आपल्या घरी जात होते. रस्त्यावर माणसांची वर्दळ फारशी नव्हती. त्याचवेळी शंकर गणपतराव येण्याच्या मार्गावर दबा धरून बसला होता. गणपतराव रस्त्याच्या वळणावर पोहोचले. शंकरने संधी साधून त्यांच्यावर झडप घातली. त्यांच्याकडे असलेली पैशांची थैली हिसकावून घेऊन शंकरने पोबारा केला. शंकरने वेषांतर केले असल्याने गणपतराव त्याला ओळखू शकले नाहीत. त्यांनी ताबडतोब चोर! चोर!! पकडा! पकडा!! अशी आरडाओरड केली. ती ऐकून आजूबाजूचे लोक धावून आले. लोकांनी पाठलाग करून चोराला पकडले. त्यांनी त्याला चोप दिला. इतक्यात गणपतरावही धावा टाकत तेथे पोहोचले. लोकांनी पैशाची थैली गणपतरावला परत केली आणि शंकरला पोलिसांच्या हवाली केले.

पोलिसांनी सर्व हकीकत ऐकली. ते शंकरला घेऊन पोलीसचौकीकडे निघाले. आता आपल्याला शिक्षा होणार, तुरुंगात जावे लागणार या विचाराने शंकर घाबरून गेला.

पण आता घाबरून चालणार नव्हते. पोलीसचौकीकडे पोहोचण्यापूर्वीच कशीतरी सुटका करून घेतलीच पाहिजे. 'काय करावे बरे?' या विचारात असतानाच पोलिसांच्या हाताची पकड थोडी ढिली झाल्याचे त्याल जाणवले. शंकरने संधी साधली. त्याने सर्वशक्तीनिशी पोलिसांच्या हाताला एक जोराचा हिसका दिला. त्याबरोबर पकड सुटली. त्याने धूम ठोकली. तो आडवाटेने पळत सुटला. पोलीस त्याचा पाठलाग करू लागले. पळता पळता शंकर गावाबाहेर पोहोचला. सतत धावत राहिल्याने तो दमला होता. जाता जाता वाटेत त्याला एक गुहा दिसली. लपून राहण्याकरिता ही जागा योग्य आहे असे त्याला वाटले. मागचा पुढचा विचार न करतो तो त्या गुहेत घुसला. तेथे एक दिवा जळत होता, पण गुहेत तर कोणी दिसत नव्हते. जवळच एक भगवी कफनी होती. शंकरने झटकन ती कफनी अंगावर चढविली. चेहरा ओळखता येऊ नये म्हणून एक भगवे वस्त्र त्याने डोक्याला गुंडाळले. तो डोळे मिटून बसला.

इतक्यात पोलीसही गुहेजवळ पोहोचले. त्यांनी गुहेत प्रवेश करून इकडे तिकडे शोध




# ७. परिवर्तन

चंद्रपूर गावात शिवरामपंत नावाचे एक गृहस्थ राहत होते. शंकर हा त्यांचा एकुलता एक मुलगा. आईवडिलांनी लहानपणी शंकरचे खूप लाड केले. तो खूप उनडक्या करी. शाळेत जाई पण अभ्यासात त्याचे लक्ष नसे. परीक्षेत परत परत नापास होई. त्यामुळे त्याने शाळा सोडली. मोठा झाल्यावर त्याला वाईट मित्रांची संगत लागली. मौजमजा करण्याकरिता पैशांची गरज भासू लागली. त्यासाठी तो लहान मोठ्या चोऱ्याही करू लागला. वडिलांनी त्याला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ!

त्याच गावात गणपतराव नावाचे एक लाकडाचे व्यापारी होते. त्यांचा व्यापार उत्तम चाले. एके दिवशी नेहमीप्रमाणे दुपारी ते आपल्या घरी जात होते. रस्त्यावर माणसांची वर्दळ फारशी नव्हती. त्याचवेळी शंकर गणपतराव येण्याच्या मार्गावर दबा धरून बसला होता. गणपतराव रस्त्याच्या वळणावर पोहोचले. शंकरने संधी साधून त्यांच्यावर झडप घातली. त्यांच्याकडे असलेली पैशांची थैली हिसकावून घेऊन शंकरने पोबारा केला. शंकरने वेषांतर केले असल्याने गणपतराव त्याला ओळखू शकले नाहीत. त्यांनी ताबडतोब चोर! चोर!! पकडा! पकडा!! अशी आरडाओरड केली. ती ऐकून आजूबाजूचे लोक धावून आले. लोकांनी पाठलाग करून चोराला पकडले. त्यांनी त्याला चोप दिला. इतक्यात गणपतरावही धावा टाकत तेथे पोहोचले. लोकांनी पैशाची थैली गणपतरावला परत केली आणि शंकरला पोलिसांच्या हवाली केले.

पोलिसांनी सर्व हकीकत ऐकली. ते शंकरला घेऊन पोलीसचौकीकडे निघाले. आता आपल्याला शिक्षा होणार, तुरुंगात जावे लागणार या विचाराने शंकर घाबरून गेला.

पण आता घाबरून चालणार नव्हते. पोलीसचौकीकडे पोहोचण्यापूर्वीच कशीतरी सुटका करून घेतलीच पाहिजे. 'काय करावे बरे?' या विचारात असतानाच पोलिसांच्या हाताची पकड थोडी ढिली झाल्याचे त्याल जाणवले. शंकरने संधी साधली. त्याने सर्वशक्तीनिशी पोलिसांच्या हाताला एक जोराचा हिसका दिला. त्याबरोबर पकड सुटली. त्याने धूम ठोकली. तो आडवाटेने पळत सुटला. पोलीस त्याचा पाठलाग करू लागले. पळता पळता शंकर गावाबाहेर पोहोचला. सतत धावत राहिल्याने तो दमला होता. जाता जाता वाटेत त्याला एक गुहा दिसली. लपून राहण्याकरिता ही जागा योग्य आहे असे त्याला वाटले. मागचा पुढचा विचार न करतो तो त्या गुहेत घुसला. तेथे एक दिवा जळत होता, पण गुहेत तर कोणी दिसत नव्हते. जवळच एक भगवी कफनी होती. शंकरने झटकन ती कफनी अंगावर चढविली. चेहरा ओळखता येऊ नये म्हणून एक भगवे वस्त्र त्याने डोक्याला गुंडाळले. तो डोळे मिटून बसला.

इतक्यात पोलीसही गुहेजवळ पोहोचले. त्यांनी गुहेत प्रवेश करून इकडे तिकडे शोध

२०



केला. गुहेत तर साधूशिवाय कोणीच नव्हते. साधू महाराजांची समाधी भंग होऊ नये म्हणून पोलिसांनी दुरूनच त्यांना नमस्कार केला आणि तेथून ते निघून गेले. शंकर हे सर्व किलकिल्या डोळ्यांनी पाहत होता.

पोलीस गेल्यावर शंकरने सुटकेचा नि:श्वास सोडला. पोलिसांनी आपल्याला नमस्कार केल्याचे आठवून त्याला हसू आले. जर का मी खरोखरच साधूप्रमाणे सज्जन बनलो तर सर्वजण माझा किती आदर करतील! असा विचार त्याच्या मनात आला. तेवढ्यात त्या गुहेत राहणाऱ्या साधुमहाराजांनी प्रवेश केला. त्यांना पाहून शंकरने त्यांच्या पायावर लोटांगण घातले.

शंकरने कळवळून म्हटले, ''महाराज, 'मला आपल्या चरणापाशी ठेवून घ्या व आपली सेवा करण्याची संधी द्या.'' आपली सेवा केल्याने मी धन्य होईन. साधुमहाराजांनी त्याच्या नजरेला नजर भिडविली. त्यांनी शंकरची विनंती मान्य केली. त्याला आपल्याजवळ ठेवून घेतले.

त्या दिवसापासून शंकर त्या साधूमहाराजांची मनापासून सेवा करू लागला. त्यांच्या उपदेशामुळे हळूहळू त्याचे मनपरिवर्तन झाले आणि त्याचा अध:पात टळला. तो आता एक सज्जन मनुष्य झाला. पुढे त्यांच्याच सांगण्यावरून शंकर आपल्या गावी जाऊन कष्टाची कमाई करून सुखाने जगू लागला.





केला. गुहेत तर साधूशिवाय कोणीच नव्हते. साधू महाराजांची समाधी भंग होऊ नये म्हणून पोलिसांनी दुरूनच त्यांना नमस्कार केला आणि तेथून ते निघून गेले. शंकर हे सर्व किलकिल्या डोळ्यांनी पाहत होता.

पोलीस गेल्यावर शंकरने सुटकेचा नि:श्वास सोडला. पोलिसांनी आपल्याला नमस्कार केल्याचे आठवून त्याला हसू आले. जर का मी खरोखरच साधूप्रमाणे सज्जन बनलो तर सर्वजण माझा किती आदर करतील! असा विचार त्याच्या मनात आला. तेवढ्यात त्या गुहेत राहणाऱ्या साधुमहाराजांनी प्रवेश केला. त्यांना पाहून शंकरने त्यांच्या पायावर लोटांगण घातले.

शंकरने कळवळून म्हटले, ''महाराज, 'मला आपल्या चरणापाशी ठेवून घ्या व आपली सेवा करण्याची संधी द्या.'' आपली सेवा केल्याने मी धन्य होईन. साधुमहाराजांनी त्याच्या नजरेला नजर भिडविली. त्यांनी शंकरची विनंती मान्य केली. त्याला आपल्याजवळ ठेवून घेतले.

त्या दिवसापासून शंकर त्या साधूमहाराजांची मनापासून सेवा करू लागला. त्यांच्या उपदेशामुळे हळूहळू त्याचे मनपरिवर्तन झाले आणि त्याचा अध:पात टळला. तो आता एक सज्जन मनुष्य झाला. पुढे त्यांच्याच सांगण्यावरून शंकर आपल्या गावी जाऊन कष्टाची कमाई करून सुखाने जगू लागला.

२१



---

**शब्दार्थ :**

**गुहा** – डोंगरातील किंवा खडकातील मोठा पोकळ भाग. **वर्दळ** – रहदारी. **चोप** – मार. **कफनी** – भगव्या रंगाचा लांब अंगरखा. **अध:पात** – नाश, दुर्दशा. **उनाडक्या** – खोड्या.

**वाक्प्रचार :**

**दबा धरून बसणे** – आडोशाला लपून बसणे. **धूम ठोकणे** – पळून जाणे. **पोबारा करणे** – पळून जाणे. **सुटकेचा नि:श्वास सोडणे** – संकट टळल्यामुळे समाधान वाटणे. **समाधी भंग होणे** – तंद्री मोडणे. **लोटांगण घालणे** – शरण येणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. शंकरने शाळा का सोडली?
२. गणपतराव कोणता व्यवसाय करीत असत?
३. शंकरला गणपतराव का ओळखू शकले नाहीत?






---

**शब्दार्थ :**

**गुहा** – डोंगरातील किंवा खडकातील मोठा पोकळ भाग. **वर्दळ** – रहदारी. **चोप** – मार. **कफनी** – भगव्या रंगाचा लांब अंगरखा. **अध:पात** – नाश, दुर्दशा. **उनाडक्या** – खोड्या.

**वाक्प्रचार :**

**दबा धरून बसणे** – आडोशाला लपून बसणे. **धूम ठोकणे** – पळून जाणे. **पोबारा करणे** – पळून जाणे. **सुटकेचा नि:श्वास सोडणे** – संकट टळल्यामुळे समाधान वाटणे. **समाधी भंग होणे** – तंद्री मोडणे. **लोटांगण घालणे** – शरण येणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. शंकरने शाळा का सोडली?
२. गणपतराव कोणता व्यवसाय करीत असत?
३. शंकरला गणपतराव का ओळखू शकले नाहीत?

२२

४. पोलिसांनी पकडताच शंकरच्या मनात कोणता विचार आला?
५. शंकर गुहेत का लपून बसला?
६. पोलिसांनी साधुमहाराजांना दुरूनच नमस्कार का केला?
७. शंकरने साधुमहाराजांना कोणती विनंती केली?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. शंकरचे लहानपणचे वागणे कसे होते?
२. गणपतरावांकडील पैसे लुटण्यासाठी शंकरने काय काय केले?
३. रस्त्यावरील आरडाओरड ऐकून लोकंनी काय केले?
४. शंकरने पोलिसांना चुकविण्यासाठी कोणती युक्ती केली?
५. पोलीस गुहेतून निघून गेल्यानंतर शंकरच्या मनात कोणते विचार आले?
६. शंकरचे मनपरिवर्तन कसे झाले?

**व्यवसाय :**

**अ) खाली काही शब्द दिले आहेत. त्यांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| दुर्जन | ........ | विक्री | ........ |
| अनादर | ........ | ठेंगणा | ........ |
| दु:ख | ........ | जुना | ........ |
| अमान्य | ........ | अनेक | ........ |
| दूर | ........ | अस्वच्छ | ........ |

**ब) पळण्याची क्रिया चालू आहे हे दर्शविण्यासाठी 'पळणे' या शब्दाबासून 'पळता–पळता' असा शब्द वापरतात. याप्रमाणे खाली दिलेल्या वाक्यातील रिकाम्या जागी त्या वाक्यासमोर दिलेल्या शब्दापासून शब्द बनवून वाक्ये पूर्ण लिहा.**

जसे : गणेत **पळता – पळता** पडला. (पळणे)
१. ............ मला ठसका लागला. (खाणे)
२. मला ............ झोप लागली. (वाचणे)
३. शंकरला ............ चक्कर आली. (फिरणे)
४. अभिजीतला ............ ठेच लागली. (जाणे)



४. पोलिसांनी पकडताच शंकरच्या मनात कोणता विचार आला?
५. शंकर गुहेत का लपून बसला?
६. पोलिसांनी साधुमहाराजांना दुरूनच नमस्कार का केला?
७. शंकरने साधुमहाराजांना कोणती विनंती केली?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. शंकरचे लहानपणचे वागणे कसे होते?
२. गणपतरावांकडील पैसे लुटण्यासाठी शंकरने काय काय केले?
३. रस्त्यावरील आरडाओरड ऐकून लोकंनी काय केले?
४. शंकरने पोलिसांना चुकविण्यासाठी कोणती युक्ती केली?
५. पोलीस गुहेतून निघून गेल्यानंतर शंकरच्या मनात कोणते विचार आले?
६. शंकरचे मनपरिवर्तन कसे झाले?

**व्यवसाय :**

**अ) खाली काही शब्द दिले आहेत. त्यांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| दुर्जन | ........ | विक्री | ........ |
| अनादर | ........ | ठेंगणा | ........ |
| दु:ख | ........ | जुना | ........ |
| अमान्य | ........ | अनेक | ........ |
| दूर | ........ | अस्वच्छ | ........ |

**ब) पळण्याची क्रिया चालू आहे हे दर्शविण्यासाठी 'पळणे' या शब्दाबासून 'पळता–पळता' असा शब्द वापरतात. याप्रमाणे खाली दिलेल्या वाक्यातील रिकाम्या जागी त्या वाक्यासमोर दिलेल्या शब्दापासून शब्द बनवून वाक्ये पूर्ण लिहा.**

जसे : गणेत **पळता – पळता** पडला. (पळणे)
१. ............ मला ठसका लागला. (खाणे)
२. मला ............ झोप लागली. (वाचणे)
३. शंकरला ............ चक्कर आली. (फिरणे)
४. अभिजीतला ............ ठेच लागली. (जाणे)

२३

५. माझे ............ पोट दुखू लागले. (हसणे)
६. ............ माणसांची गर्दी जमली. (बघणे)
७. ............ते दोघे भांडू लागले. (खेळणे)

**उपक्रम :**

शिक्षकांच्या मदतीने या पाठाचे नाट्यीकरण करा.

◆◆◆



५. माझे ............ पोट दुखू लागले. (हसणे)
६. ............ माणसांची गर्दी जमली. (बघणे)
७. ............ते दोघे भांडू लागले. (खेळणे)

**उपक्रम :**

शिक्षकांच्या मदतीने या पाठाचे नाट्यीकरण करा.

◆◆◆

# ८. परोपकारी नरेंद्र

हिवाळ्याचे दिवस होते. कलकत्ता शहरात कडाक्याची थंडी पडली होती. छोटा नरेंद्र शाल पांघरून खिडकीशी उभा होता. तो बाहेर पाहत होता. रस्त्यावर तुरळक रहदारी होती. एक संन्यासी थंडीने कुडकुडत रस्त्याने जात होता. त्याच्या अंगात भगवी कफनी होती. ती ठिकठिकाणी फाटलेली होती. नरेंद्रला त्या संन्याशाची दया आली. तो संन्यासी खिडकीसमोरून जात असताना नरेंद्रने त्याला जवळ बोलाविले. संन्यासी खिडकीजवळ आला. नरेंद्रने आपल्या अंगावरील भारी किमतीची शाल त्याला दिली.

''भगवान तुम्हारा भला करे.'' असा आशीर्वाद देऊन संन्यासी निघाला. शाल पांघरून जात असलेल्या त्या संन्याशाकडे नरेंद्र समाधानाने बघत राहिला.

नरेंद्र नित्यनेमाने व्यायम करी. त्याला खेळाची फार आवड होती. तो रोज संध्याकाळी मैदानावर जात असे. आपल्या सवंगड्यांसह खेळत असे. एकदा नरेंद्र आपल्या मित्रांसह झोपाळ्यावर झोके घेत होता. शेजारचा झोपाळा तुटून मुले खाली पडली, पण कोणालाच इजा झाली नाही. मुले झोपाळा नीट करू लागली. नरेंद्र त्यांना मदत करू लागला, पण झोपाळा नीट होईना. त्याचवेळी एक वयस्कर कामगार तिकडून जात होता. त्याचे लक्ष या मुलांकडे गेले. तो जवळ आला व मुलांना मदत करू लागला. इतक्यात झोपाळ्याचा लोखंडी खांब मजुराच्या डोक्यावर पडला. डोक्याला जखम झाली. त्या जखमेतून भळाभळा रक्त वाहू लागले. तो मजूर बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. सर्व मुले घाबरली, पण नरेंद्र मुळीच घाबरला नाही. क्षणाचाही विलंब चन करता नरेंद्राने आपल्या अंगातील सदरा कढला व त्या सदऱ्याने मजुराची जखम घट्ट बांधली. बेशुद्ध पडलेल्या त्या मजुराला काही मुले वारा घालू लागली. थोड्या वेळाने मजूर शुद्धीवर आला. सर्व मुलांना हायसे वाटले. नरेंद्राने सर्व मुलांकडून पैसे गोळा केले. आपल्याकडील सर्व पैसे त्यात घालून जमलेली रक्कम मजुराच्या हाती दिली व म्हणाला, ''या पैशातून औषधोपचार करा.'' त्या मजुराने कृतज्ञतेने सर्व मुलांकडे पाहिले आणि तो निघून गेला.



नरेंद्रला खेळाप्रमाणेच वाचनाची फार आवड होती. वडील विश्वनाथ दत्त त्याला



# ८. परोपकारी नरेंद्र

हिवाळ्याचे दिवस होते. कलकत्ता शहरात कडाक्याची थंडी पडली होती. छोटा नरेंद्र शाल पांघरून खिडकीशी उभा होता. तो बाहेर पाहत होता. रस्त्यावर तुरळक रहदारी होती. एक संन्यासी थंडीने कुडकुडत रस्त्याने जात होता. त्याच्या अंगात भगवी कफनी होती. ती ठिकठिकाणी फाटलेली होती. नरेंद्रला त्या संन्याशाची दया आली. तो संन्यासी खिडकीसमोरून जात असताना नरेंद्रने त्याला जवळ बोलाविले. संन्यासी खिडकीजवळ आला. नरेंद्रने आपल्या अंगावरील भारी किमतीची शाल त्याला दिली.

''भगवान तुम्हारा भला करे.'' असा आशीर्वाद देऊन संन्यासी निघाला. शाल पांघरून जात असलेल्या त्या संन्याशाकडे नरेंद्र समाधानाने बघत राहिला.

नरेंद्र नित्यनेमाने व्यायम करी. त्याला खेळाची फार आवड होती. तो रोज संध्याकाळी मैदानावर जात असे. आपल्या सवंगड्यांसह खेळत असे. एकदा नरेंद्र आपल्या मित्रांसह झोपाळ्यावर झोके घेत होता. शेजारचा झोपाळा तुटून मुले खाली पडली, पण कोणालाच इजा झाली नाही. मुले झोपाळा नीट करू लागली. नरेंद्र त्यांना मदत करू लागला, पण झोपाळा नीट होईना. त्याचवेळी एक वयस्कर कामगार तिकडून जात होता. त्याचे लक्ष या मुलांकडे गेले. तो जवळ आला व मुलांना मदत करू लागला. इतक्यात झोपाळ्याचा लोखंडी खांब मजुराच्या डोक्यावर पडला. डोक्याला जखम झाली. त्या जखमेतून भळाभळा रक्त वाहू लागले. तो मजूर बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. सर्व मुले घाबरली, पण नरेंद्र मुळीच घाबरला नाही. क्षणाचाही विलंब चन करता नरेंद्राने आपल्या अंगातील सदरा कढला व त्या सदऱ्याने मजुराची जखम घट्ट बांधली. बेशुद्ध पडलेल्या त्या मजुराला काही मुले वारा घालू लागली. थोड्या वेळाने मजूर शुद्धीवर आला. सर्व मुलांना हायसे वाटले. नरेंद्राने सर्व मुलांकडून पैसे गोळा केले. आपल्याकडील सर्व पैसे त्यात घालून जमलेली रक्कम मजुराच्या हाती दिली व म्हणाला, ''या पैशातून औषधोपचार करा.'' त्या मजुराने कृतज्ञतेने सर्व मुलांकडे पाहिले आणि तो निघून गेला.



नरेंद्रला खेळाप्रमाणेच वाचनाची फार आवड होती. वडील विश्वनाथ दत्त त्याला

२५

पुस्तके आणून देत. ती पुस्तके तो मन लावून वाचत असे. एकदाच वाचल्यावर कोणताही विषय त्याला समजत असे. वर्गात त्याचा नेहमी वरचा क्रमांक असे. आई भुवनेश्वरी त्याला रामायण व महाभारतातील गोष्टी सांगे. अशा गोष्टींतून नरेंद्रावर चांगले संस्कार झाले.

हा नरेंद्र म्हणजेच स्वामी विवेकानंद.

---

**शब्दार्थ :**

**संन्यासी** – संसाराचा त्याग केलेला. **कृतज्ञ** – उपकाराची जाणीव असलेला. **वयस्कर** – म्हातारा. **नित्यनेमाने** – रोज.

**वाक्प्रचार :**

**हायसे वाटणे** – संकट टळल्याचे समाधान वाटणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. संन्याशाने नरेंद्रला कोणता आशीर्वाद दिला?
२. वयस्कर कामगार मुलांजवळ का आला?
३. वडील नरेंद्रला पुस्तके का आणून देत?
४. आई नरेंद्रला कोणत्या गोष्टी सांगे?
५. नरेंद्रचे पूर्ण नाव काय?

**२) खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१. नरेंद्रने संन्याशाला शाल का दिली?
२. कामगार बेशुद्ध पडल्यावर नरेंद्रने काय केले?



पुस्तके आणून देत. ती पुस्तके तो मन लावून वाचत असे. एकदाच वाचल्यावर कोणताही विषय त्याला समजत असे. वर्गात त्याचा नेहमी वरचा क्रमांक असे. आई भुवनेश्वरी त्याला रामायण व महाभारतातील गोष्टी सांगे. अशा गोष्टींतून नरेंद्रावर चांगले संस्कार झाले.

हा नरेंद्र म्हणजेच स्वामी विवेकानंद.

**शब्दार्थ :**

**संन्यासी** – संसाराचा त्याग केलेला. **कृतज्ञ** – उपकाराची जाणीव असलेला. **वयस्कर** – म्हातारा. **नित्यनेमाने** – रोज.

**वाक्प्रचार :**

**हायसे वाटणे** – संकट टळल्याचे समाधान वाटणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. संन्याशाने नरेंद्रला कोणता आशीर्वाद दिला?
२. वयस्कर कामगार मुलांजवळ का आला?
३. वडील नरेंद्रला पुस्तके का आणून देत?
४. आई नरेंद्रला कोणत्या गोष्टी सांगे?
५. नरेंद्रचे पूर्ण नाव काय?

**२) खालील प्रश्नांची प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

१. नरेंद्रने संन्याशाला शाल का दिली?
२. कामगार बेशुद्ध पडल्यावर नरेंद्रने काय केले?

२६

**व्यवसाय :**

**खालील वाक्यांत काही घटना दिल्या आहेत. त्या घटनांचा योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिहा.**

कंडक्टरने तिकीट व उरलेले पैसे दिले.
त्याला खडकीजवळची जागा मिळाली.
सतीश शाळेत वेळेवर पोहोचला.
बस आली.
सतीश बसची वाट पाहत उभा होता.
सतीशने कंटक्टरला पैसे दिले.

**उपक्रम :**

स्वामी विवेकानंदांचे कोणतेही पाच सुविचार जमवा व लिहा.

◆◆◆



**व्यवसाय :**

**खालील वाक्यांत काही घटना दिल्या आहेत. त्या घटनांचा योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिहा.**

कंडक्टरने तिकीट व उरलेले पैसे दिले.
त्याला खडकीजवळची जागा मिळाली.
सतीश शाळेत वेळेवर पोहोचला.
बस आली.
सतीश बसची वाट पाहत उभा होता.
सतीशने कंटक्टरला पैसे दिले.

**उपक्रम :**

स्वामी विवेकानंदांचे कोणतेही पाच सुविचार जमवा व लिहा.

◆◆◆

२७

# ९. राजरमण

कदंब बसस्थानकाच्या मागच्या बाजूला पटांगणावर खूप गर्दी दिसत होती. गाड्या, फेरीवाले व बँडच्या आवाजांनी तो परिसर दणाणून जात होता. अधून मधून हत्तीचे चीत्कार, वाघसिंहाच्या डरकाळ्या ऐकू येत होत्या. हे प्राणी 'मोनाली' सर्कशीतले होते.

या मोनाली सर्कशीने खूप नाव कमावले होते. म्हणूनच ती पहायला प्रेक्षकांची रीघ लागली होती. या सर्कशीतील छोट्या छोट्या मुलींच्या शारीरिक कसरती पाहून प्रेक्षकांना त्यांचे खूप कौतुक वाटायचे. घोडे, हत्ती, वाघ, सिंह यांचे खेळ मुलांना आकर्षित करायचे. स्त्री-पुरुष, कलाकारांचे उंच झोक्यावरील खेळ पाहताना तर प्रेक्षक अवाक् व्हायचे. विशेष म्हणजे उंच, बुटके, जाडे, रंगीबेरंगी विदूषक मजेशीर हालचाली करून सर्वांना पोटभर हसवत असत. त्यांच्यामधील रमण विदूषक तर सर्कशीचे आकर्षण होते.





# ९. राजरमण

कदंब बसस्थानकाच्या मागच्या बाजूला पटांगणावर खूप गर्दी दिसत होती. गाड्या, फेरीवाले व बँडच्या आवाजांनी तो परिसर दणाणून जात होता. अधून मधून हत्तीचे चीत्कार, वाघसिंहाच्या डरकाळ्या ऐकू येत होत्या. हे प्राणी 'मोनाली' सर्कशीतले होते.

या मोनाली सर्कशीने खूप नाव कमावले होते. म्हणूनच ती पहायला प्रेक्षकांची रीघ लागली होती. या सर्कशीतील छोट्या छोट्या मुलींच्या शारीरिक कसरती पाहून प्रेक्षकांना त्यांचे खूप कौतुक वाटायचे. घोडे, हत्ती, वाघ, सिंह यांचे खेळ मुलांना आकर्षित करायचे. स्त्री-पुरुष, कलाकारांचे उंच झोक्यावरील खेळ पाहताना तर प्रेक्षक अवाक् व्हायचे. विशेष म्हणजे उंच, बुटके, जाडे, रंगीबेरंगी विदूषक मजेशीर हालचाली करून सर्वांना पोटभर हसवत असत. त्यांच्यामधील रमण विदूषक तर सर्कशीचे आकर्षण होते.



२८

''अब आ रहे है आपके सामने राजरमण!'' असा पुकारा होताच रमण राजच्या पाठीवर वेगवेगळ्या कसरती करीत करीत रिंगणात यायचा. रिंगणात राज दोन वेळा गोलाकार फिरला की रमण खाली उतरायचा. नंतर राज रिंगणात ठेवलेल्या गोल मेजावर उभा राहून पुढील दोन पाय व सोंड वर करून प्रेक्षकांना नमस्कार करायचा. नंतर तो रमणला सोंडेत धरून उंच फेकायचा. रमण हवेत कोलांट्या घेत घेत जमिनीवर येऊन उभा रहायचा. बँडचा आवाज सुरू होताच राज पुन्हा त्याला आपल्या सोंडेत घ्यायचा. टाळ्यांचा गजर करणाऱ्या लोकांना सलाम करीत निघून जायचा. अशी ही राजरमणची जोडी!

राज व रमण खास दोस्त! राजला आंघोळ घालणे, खायला देणे, त्याच्या अंगावर व सोंडेवर विविध रंगांची नक्षी काढून त्याला सजवणे यातच रमण सतत रमलेला असे. रात्री तो झोपायचादेखील राजजवळच! सकाळी रमण राजच्या पाठीवर बसून गावातून फिरून यायचा. राजही गावातून फिरताना खूश असायचा. राजरमणची ही दोस्ती सर्वांना कौतुकास्पद वाटायची.

एके दिवशी सकाळी रमण न्याहारी वगैरे आटपून राजकडे आला. बघतो तर राज झोपूनच होता. रमणने हाक मारताच राजने डोळे उघडले, पण तो नेहमीप्रमाणे उभा राहिला नाही की सोंडेने रमणला कुरवाळलेही नाही. राज आजारी नाही ना अशी शंका रमणच्या मनात आली. तो भयभीत झाला. त्याने राजला निरखून पाहिले. तेव्हा त्याला राजचे मागचे दोन्ही पाय सुजलेले दिसले. रमणने धावत जाऊन मालकाला बोलाविले. मालकाने येऊन राजला पाहिले आणि ताबडतोब डॉक्टरला बोलावून घेतले. डॉक्टर राजला तपासत होते. सर्कशीतील सर्व माणसे तिथे जमली होती. सर्कशीतील प्रत्येक प्राणी त्या सर्वांचा मित्र होता. या मित्रांशी ते मोठ्यामायेने वागत असत. राज त्यांचा सर्वात जुना वयस्कर मित्र! रमणचा तर दुसरा प्राणच होता.

डॉक्टरने राजसाठी औषध दिले व म्हणाला,''तो आता थोड्याच दिवसांचा सोबती.'' हे शब्द कानी पडताच रमण राजच्याअंगावर पडून ओक्साबोक्सी रडू लागला. राजला प्रेमाने गोंजारत तो तिथेच बसून राहिला. रमणबरोबर विदूषकाचे काम करणारे त्याचे मित्र रमणची समजूत घालू लागले. पण रमणच्या डोळ्यातून अश्रू वाहतच होते.

रमणने सर्कशीत विदूषकाचे काम करायचे सोडून दिले पण फुकटचा पगार घ्यायचा नाही म्हणून तो सर्कशीतील इतर कामे करू लागला. ही कामे करताना राजच्या सेवेत त्याने कधी खंड पडू दिला नाही. त्याचे अंग पुसणे, पायाला औषध लावणे, खायला देणे ही सगळी कामे तो स्वत: करीत असे. अखेर एक दिवस राज सर्वांना सोडून गेला. सर्कशीतील सर्व माणसे हळहळली. रमण तर अगदीच एकाकी पडल्यासारखा रडत होता.



''अब आ रहे है आपके सामने राजरमण!'' असा पुकारा होताच रमण राजच्या पाठीवर वेगवेगळ्या कसरती करीत करीत रिंगणात यायचा. रिंगणात राज दोन वेळा गोलाकार फिरला की रमण खाली उतरायचा. नंतर राज रिंगणात ठेवलेल्या गोल मेजावर उभा राहून पुढील दोन पाय व सोंड वर करून प्रेक्षकांना नमस्कार करायचा. नंतर तो रमणला सोंडेत धरून उंच फेकायचा. रमण हवेत कोलांट्या घेत घेत जमिनीवर येऊन उभा रहायचा. बँडचा आवाज सुरू होताच राज पुन्हा त्याला आपल्या सोंडेत घ्यायचा. टाळ्यांचा गजर करणाऱ्या लोकांना सलाम करीत निघून जायचा. अशी ही राजरमणची जोडी!

राज व रमण खास दोस्त! राजला आंघोळ घालणे, खायला देणे, त्याच्या अंगावर व सोंडेवर विविध रंगांची नक्षी काढून त्याला सजवणे यातच रमण सतत रमलेला असे. रात्री तो झोपायचादेखील राजजवळच! सकाळी रमण राजच्या पाठीवर बसून गावातून फिरून यायचा. राजही गावातून फिरताना खूश असायचा. राजरमणची ही दोस्ती सर्वांना कौतुकास्पद वाटायची.

एके दिवशी सकाळी रमण न्याहारी वगैरे आटपून राजकडे आला. बघतो तर राज झोपूनच होता. रमणने हाक मारताच राजने डोळे उघडले, पण तो नेहमीप्रमाणे उभा राहिला नाही की सोंडेने रमणला कुरवाळलेही नाही. राज आजारी नाही ना अशी शंका रमणच्या मनात आली. तो भयभीत झाला. त्याने राजला निरखून पाहिले. तेव्हा त्याला राजचे मागचे दोन्ही पाय सुजलेले दिसले. रमणने धावत जाऊन मालकाला बोलाविले. मालकाने येऊन राजला पाहिले आणि ताबडतोब डॉक्टरला बोलावून घेतले. डॉक्टर राजला तपासत होते. सर्कशीतील सर्व माणसे तिथे जमली होती. सर्कशीतील प्रत्येक प्राणी त्या सर्वांचा मित्र होता. या मित्रांशी ते मोठ्यामायेने वागत असत. राज त्यांचा सर्वात जुना वयस्कर मित्र! रमणचा तर दुसरा प्राणच होता.

डॉक्टरने राजसाठी औषध दिले व म्हणाला,''तो आता थोड्याच दिवसांचा सोबती.'' हे शब्द कानी पडताच रमण राजच्याअंगावर पडून ओक्साबोक्सी रडू लागला. राजला प्रेमाने गोंजारत तो तिथेच बसून राहिला. रमणबरोबर विदूषकाचे काम करणारे त्याचे मित्र रमणची समजूत घालू लागले. पण रमणच्या डोळ्यातून अश्रू वाहतच होते.

रमणने सर्कशीत विदूषकाचे काम करायचे सोडून दिले पण फुकटचा पगार घ्यायचा नाही म्हणून तो सर्कशीतील इतर कामे करू लागला. ही कामे करताना राजच्या सेवेत त्याने कधी खंड पडू दिला नाही. त्याचे अंग पुसणे, पायाला औषध लावणे, खायला देणे ही सगळी कामे तो स्वत: करीत असे. अखेर एक दिवस राज सर्वांना सोडून गेला. सर्कशीतील सर्व माणसे हळहळली. रमण तर अगदीच एकाकी पडल्यासारखा रडत होता.

२९

लवकरच सर्कशीचा मुक्काम तिथून हलणार होता. सर्वजण सामानाची आवराआवर करीत होते. रमण मात्र एकाच जागी बसून होता. त्याच्या मित्रांनी त्याला बरोबर येण्याचा आग्रह केला. मालकांनीही रमणची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! रमणने त्याच गावात रहायचे ठरवले. अखेर सर्वजण तिथून निघून गेले. रमण त्याच गावात छोटी मोठी कामे करून पोट भरू लागला.

रोज सकाळी तो राजने प्राण सोडला त्या ठिकाणी जायचा व फुले वाहायचा. हा त्याचा नित्यक्रम कधी चुकला नाही.

---

**शब्दार्थ :**

**चीत्कार –** हत्तीचे आरडणे. **डरकाळी –** वाघसिंहाचे ओरडणे. **सलाम –** नमस्कार. **कुरवाळणे –** मायेने हात फिरवणे. **एकाकी –** एकटा. **शारीरिक कसरती –** शरीराच्या सफाईदारपणे केलेल्या हालचाली.
**रीघ लागणे –** रांग लागणे.

**वाक्प्रचार :**

**नाव कमावणे –** प्रसिद्धी मिळविणे. **अवाक् होणे –** अतिशय आश्चर्य वाटणे. **खंड पडणे –** काममध्येच थांबणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. मोनाली सर्कस कुठे होती?
२. प्रेक्षकांना कोण खूप हसवायचे?
३. राज व रमण रिंगणात कसे यायचे?
४. रमण राजला कसे सजवत असे?
५. सर्कस निघून गेल्यावर रमणचा नित्यक्रम कोणता होता?

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. सर्कशीतील कोणकोणते खेळ पाहून प्रक्षकांना आश्चर्य वाटायचे?
२. राजरमणच्या खेळाचे वर्णन करा.
३. रमण व राजची मैत्री दाखवणारी चार वाक्ये लिहा.



लवकरच सर्कशीचा मुक्काम तिथून हलणार होता. सर्वजण सामानाची आवराआवर करीत होते. रमण मात्र एकाच जागी बसून होता. त्याच्या मित्रांनी त्याला बरोबर येण्याचा आग्रह केला. मालकांनीही रमणची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! रमणने त्याच गावात रहायचे ठरवले. अखेर सर्वजण तिथून निघून गेले. रमण त्याच गावात छोटी मोठी कामे करून पोट भरू लागला.

रोज सकाळी तो राजने प्राण सोडला त्या ठिकाणी जायचा व फुले वाहायचा. हा त्याचा नित्यक्रम कधी चुकला नाही.

---

**शब्दार्थ :**

**चीत्कार –** हत्तीचे आरडणे. **डरकाळी –** वाघसिंहाचे ओरडणे. **सलाम –** नमस्कार. **कुरवाळणे –** मायेने हात फिरवणे. **एकाकी –** एकटा. **शारीरिक कसरती –** शरीराच्या सफाईदारपणे केलेल्या हालचाली.
**रीघ लागणे –** रांग लागणे.

**वाक्प्रचार :**

**नाव कमावणे –** प्रसिद्धी मिळविणे. **अवाक् होणे –** अतिशय आश्चर्य वाटणे. **खंड पडणे –** काममध्येच थांबणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. मोनाली सर्कस कुठे होती?
२. प्रेक्षकांना कोण खूप हसवायचे?
३. राज व रमण रिंगणात कसे यायचे?
४. रमण राजला कसे सजवत असे?
५. सर्कस निघून गेल्यावर रमणचा नित्यक्रम कोणता होता?

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. सर्कशीतील कोणकोणते खेळ पाहून प्रक्षकांना आश्चर्य वाटायचे?
२. राजरमणच्या खेळाचे वर्णन करा.
३. रमण व राजची मैत्री दाखवणारी चार वाक्ये लिहा.

३०

**व्यवसाय :**

**१. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनाम निवडून लिहा.**

**(जो, हे, ती, तिने, तो, त्यांनी, त्याने)**

१. .......... अभ्यास करेल .......... यश मिळवेल.

२. रमण सर्कशीच्या रिंगणात आला .......... खूप कसरती केल्या.

३. सुधाचा आज वाढदिवस आहे म्हणून ..........खूप आनंदित आहे.

४. प्रेक्षक नाटक पाहून खूश झाले .......... टाळ्यांचा कडकडाट केला.

**२. खालील संभाषणात योग्य सर्वनामे लिहा.**

रमेश : गुरुजी, .......... सर्कस पाहायला जाऊया?

गुरुजी : ..........येणार सर्कस पहायला?

सर्व मुले : ..........येणार ..........येणार.

गणेश : काय रे विनय, .......... येणार नाहीस?

विनय : नाही .......... पाहिली ती सर्कस.

गणेश : केव्हा पाहिलीस ..........?

विनय : .......... शनिवारी गेलो होतो.

गणेश : गुरुजी, विनय येणार नाही .......... पाहिली ती सर्कस.

**उपक्रम :**

सर्कशीतील वेगवेगळ्या खेळांची चित्र जमवा व तुमच्या चित्रसंग्रह – वहीत चिकटवा व प्रत्येक चित्रातील प्रसंग कोणता आहे ते एका वाक्यात लिहा.

◆◆◆



**व्यवसाय :**

**१. खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनाम निवडून लिहा.**

**(जो, हे, ती, तिने, तो, त्यांनी, त्याने)**

१. .......... अभ्यास करेल .......... यश मिळवेल.

२. रमण सर्कशीच्या रिंगणात आला .......... खूप कसरती केल्या.

३. सुधाचा आज वाढदिवस आहे म्हणून ..........खूप आनंदित आहे.

४. प्रेक्षक नाटक पाहून खूश झाले .......... टाळ्यांचा कडकडाट केला.

**२. खालील संभाषणात योग्य सर्वनामे लिहा.**

रमेश : गुरुजी, .......... सर्कस पाहायला जाऊया?

गुरुजी : ..........येणार सर्कस पहायला?

सर्व मुले : ..........येणार ..........येणार.

गणेश : काय रे विनय, .......... येणार नाहीस?

विनय : नाही .......... पाहिली ती सर्कस.

गणेश : केव्हा पाहिलीस ..........?

विनय : .......... शनिवारी गेलो होतो.

गणेश : गुरुजी, विनय येणार नाही .......... पाहिली ती सर्कस.

**उपक्रम :**

सर्कशीतील वेगवेगळ्या खेळांची चित्र जमवा व तुमच्या चित्रसंग्रह – वहीत चिकटवा व प्रत्येक चित्रातील प्रसंग कोणता आहे ते एका वाक्यात लिहा.

◆◆◆

# १०. पक्षी आपले मित्र

'कुहू कुहू' असा गोड आवाज तुम्ही अनेक वेळा ऐकला असेल. हा गोड स्वर कोकिळ पक्ष्याचा. त्याच्या कुहू कुहू मंजूळ गायनाने सारा आसमंत भरून जातो आणि वसंत ऋतूची चाहूल लागते. तुम्ही तर त्याच्या आवाजाची नक्कल करीत राहता आणि कोकिळही तुम्हाला साद देत राहतो.

या पक्ष्याचे डोळे पाहिलेत का? ते माणकासारखे लाल असतात. चोच हिरवट-पिवळसर असते. पाय मात्र काळसर. कोकिळ पक्ष्याच्या रंगावरून नर-मादीतील फरक ओळखता येतो. काळ्या चमकदार रंगाचा दिसतो, तो कोकिळ.तर कोकिळा भुरकट तांबूस रंगाची असते. तिच्या सर्व अंगावर पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात.



हे पक्षी उडताना पंखांची उघडझाप फार जलद गतीने करतात. वड, पिंपळ यांची फळे, बोरे व किडे हे त्यांचे खाद्य. फुलातील मधुर रसही ते पितात. हे पक्षी कधीच घरटे बांधीत नाहीत. कोकिळा कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते. त्यामुळे कोकिळ आणि कावळे यांच्यात भांडणे होतात.



१०. पक्षी आपले मित्र

'कुहू कुहू' असा गोड आवाज तुम्ही अनेक वेळा ऐकला असेल. हा गोड स्वर कोकिळ पक्ष्याचा. त्याच्या कुहू कुहू मंजूळ गायनाने सारा आसमंत भरून जातो आणि वसंत ऋतूची चाहूल लागते. तुम्ही तर त्याच्या आवाजाची नक्कल करीत राहता आणि कोकिळही तुम्हाला साद देत राहतो.

या पक्ष्याचे डोळे पाहिलेत का? ते माणकासारखे लाल असतात. चोच हिरवट-पिवळसर असते. पाय मात्र काळसर. कोकिळ पक्ष्याच्या रंगावरून नर-मादीतील फरक ओळखता येतो. काळ्या चमकदार रंगाचा दिसतो, तो कोकिळ.तर कोकिळा भुरकट तांबूस रंगाची असते. तिच्या सर्व अंगावर पांढऱ्या रंगाचे ठिपके असतात.



हे पक्षी उडताना पंखांची उघडझाप फार जलद गतीने करतात. वड, पिंपळ यांची फळे, बोरे व किडे हे त्यांचे खाद्य. फुलातील मधुर रसही ते पितात. हे पक्षी कधीच घरटे बांधीत नाहीत. कोकिळा कावळ्याच्या घरट्यात अंडी घालते. त्यामुळे कोकिळ आणि कावळे यांच्यात भांडणे होतात.

३२



टिर्ऽर, टिर्ऽर असा आवाज काढीत झाडाच्या खोडावर चोच मारीत वर वर चढणारा पक्षी तुम्ही पाहिला आहे ना! तोच हा सुतार पक्षी. आंब्याच्या झाडांचा हा खास मित्र. आंबा, बोर किंवा बाभूळ अशी मऊ खोडाची झाडे तो घर तयार करण्यासाठी निवडतो. आपल्या टोकदार चोचीने झाडाचे खोड पोखरून तो छान घर तयार करतो. त्याचे घर तोंडाशी लहान दिसते पण आत खूप रुंद असते. दोघे नर-मादी मिळून सुंदर कोरीव घर तयार करतात. अन्न मिळविण्याची त्याची पद्धत इतर पक्ष्यांपेक्षा वेगळीच असते. चोचीचा आघात खोडावर करून खोडाचा पोकळ भाग तो अजम वतो. त्याचा शोध लागताच आपली लांबसडक वळवळणारी जीभ खोडातील पोकळीत घालून किडा, मुंगी ओढून काढतो. हेच त्याचे आवडते अन्न. झाडाच्या खोडातील किडे खाल्ल्यामुळे झाडाचे रक्षण होण्यास मदत होते.

सुतार पक्षी आकाराने लहान असला तरी त्याचे सौंदर्य मात्र त्याच्या निरनिराळ्या रंगामुळे मनमोहक वाटते. सुतार पक्ष्याच्या डोक्यावर असलेला तांबडा तुरा बसकी टोपी घातल्यासारखा दिसतो. नर-मादीच्या रंगरूपात फारसा फरक नसतो. काळसर चोच, काळ्या अंगावर पांढरे शुभ्र ठिपके व पोटाकडचा भाग पांढरा व तांबूस शेपटी. असा हा विविधरंगी पक्षी तुम्ही सहज ओळखू शकाल.

टिविटऽटिऽटिऽऽविट असा तीव्र स्वर काढीत उडत जाणारी टिटवी तुमच्या परिचयाची असेल. माळरान, शेते, नदीकिनारे तसेच म्हशींच्या पाठीवर बसून आरामात फिरताना ती आपल्याला दिसते.

तिचा रंग काळा. पण पोटाकडील भाग पांढरा असतो. पंख जरासे भुरकट, डोळे व चोच मात्र लाल असते व पाय पिवळे असतात.

टिटवी अतिशय धीट असते. तुम्ही तिच्याजवळ जाऊन पाहा. तिच्या अगदी





टिर्ऽर, टिर्ऽर असा आवाज काढीत झाडाच्या खोडावर चोच मारीत वर वर चढणारा पक्षी तुम्ही पाहिला आहे ना! तोच हा सुतार पक्षी. आंब्याच्या झाडांचा हा खास मित्र. आंबा, बोर किंवा बाभूळ अशी मऊ खोडाची झाडे तो घर तयार करण्यासाठी निवडतो. आपल्या टोकदार चोचीने झाडाचे खोड पोखरून तो छान घर तयार करतो. त्याचे घर तोंडाशी लहान दिसते पण आत खूप रुंद असते. दोघे नर-मादी मिळून सुंदर कोरीव घर तयार करतात. अन्न मिळविण्याची त्याची पद्धत इतर पक्ष्यांपेक्षा वेगळीच असते. चोचीचा आघात खोडावर करून खोडाचा पोकळ भाग तो अजम वतो. त्याचा शोध लागताच आपली लांबसडक वळवळणारी जीभ खोडातील पोकळीत घालून किडा, मुंगी ओढून काढतो. हेच त्याचे आवडते अन्न. झाडाच्या खोडातील किडे खाल्ल्यामुळे झाडाचे रक्षण होण्यास मदत होते.

सुतार पक्षी आकाराने लहान असला तरी त्याचे सौंदर्य मात्र त्याच्या निरनिराळ्या रंगामुळे मनमोहक वाटते. सुतार पक्ष्याच्या डोक्यावर असलेला तांबडा तुरा बसकी टोपी घातल्यासारखा दिसतो. नर-मादीच्या रंगरूपात फारसा फरक नसतो. काळसर चोच, काळ्या अंगावर पांढरे शुभ्र ठिपके व पोटाकडचा भाग पांढरा व तांबूस शेपटी. असा हा विविधरंगी पक्षी तुम्ही सहज ओळखू शकाल.

टिविटऽटिऽटिऽऽविट असा तीव्र स्वर काढीत उडत जाणारी टिटवी तुमच्या परिचयाची असेल. माळरान, शेते, नदीकिनारे तसेच म्हशींच्या पाठीवर बसून आरामात फिरताना ती आपल्याला दिसते.

तिचा रंग काळा. पण पोटाकडील भाग पांढरा असतो. पंख जरासे भुरकट, डोळे व चोच मात्र लाल असते व पाय पिवळे असतात.

टिटवी अतिशय धीट असते. तुम्ही तिच्याजवळ जाऊन पाहा. तिच्या अगदी

३३

जवळ जाईपर्यंत ती तुरूतुरू चालते आणि मग चटकन् आवाज काढीत उडू लागते. पण थोड्याच वेळात पुन्हा ती काही अंतरावर जमिनीवर येऊन बसते. टिटवी फळे खात नाही. शंखातील जीव-जीवाणू, खेकडे, गोगलगाई व गवतातील किडे हे तिचे अन्न.



टिटवी स्वत:चे घरटे बांधत नाही. नदीकिनारी किंवा शेताच्या बाजूला असलेला एखादा खड्डा हेच तिचे घरटे. खड्ड्याच्या बाजूला थोडेसे दगड-गोटे गोळा करून मादी अंडी घालते. अंडी व गोटे यातील फरक चटकन लक्षात येत नाही. टिटवी आपल्या अंड्यांच्या आणि पिलांच्या संरक्षणासाठी रात्री-अपरात्री ओरडत व घिरट्या घालीत असते.

तर असे पक्षी! आपल्याला हवे हवेसे वाटणारे!

---

**शब्दार्थ :**

**स्वर** – आवाज. **आसमंत** – सभोवतालचा प्रदेश. **माणिक** – लालरंगाचे एक रत्न. **अजमावणे** – अंदाज घेणे. **साद घालणे** – हाक मारणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोकिळ पक्ष्याच्या आवाजाने कशाची चाहूल लागते?
२. कोकिळ पक्ष्याचे डोळे कसे दिसतात?
३. कोकिळ पक्षी कोणती फळे खातात?
४. सुतार पक्ष्याचे आवडते अन्न कोणते?
५. टिटवीचे अन्न कोणते?
६. टिटवी आपल्याला कोठे दिसते?





जवळ जाईपर्यंत ती तुरूतुरू चालते आणि मग चटकन् आवाज काढीत उडू लागते. पण थोड्याच वेळात पुन्हा ती काही अंतरावर जमिनीवर येऊन बसते. टिटवी फळे खात नाही. शंखातील जीव-जीवाणू, खेकडे, गोगलगाई व गवतातील किडे हे तिचे अन्न.

टिटवी स्वत:चे घरटे बांधत नाही. नदीकिनारी किंवा शेताच्या बाजूला असलेला एखादा खड्डा हेच तिचे घरटे. खड्ड्याच्या बाजूला थोडेसे दगड-गोटे गोळा करून मादी अंडी घालते. अंडी व गोटे यातील फरक चटकन लक्षात येत नाही. टिटवी आपल्या अंड्यांच्या आणि पिलांच्या संरक्षणासाठी रात्री-अपरात्री ओरडत व घिरट्या घालीत असते.

तर असे पक्षी! आपल्याला हवे हवेसे वाटणारे!

**शब्दार्थ :**

**स्वर** – आवाज. **आसमंत** – सभोवतालचा प्रदेश. **माणिक** – लालरंगाचे एक रत्न. **अजमावणे** – अंदाज घेणे. **साद घालणे** – हाक मारणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोकिळ पक्ष्याच्या आवाजाने कशाची चाहूल लागते?
२. कोकिळ पक्ष्याचे डोळे कसे दिसतात?
३. कोकिळ पक्षी कोणती फळे खातात?
४. सुतार पक्ष्याचे आवडते अन्न कोणते?
५. टिटवीचे अन्न कोणते?
६. टिटवी आपल्याला कोठे दिसते?

३४

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

अ) कोकिळ व कोकिळा यांच्या रंगात कोणता फरक असतो?

ब) सुतारपक्षी आपले घर कसे तयार करतो?

क) सुतारपक्षी आपले अन्न कसे मिळवितो?

ड) टिटवी अंडी घालण्यापूर्वी दगड-गोटे का जमा करते?

**व्यवसाय :**

**खाली दोन वाक्ये दिली आहेत. ती काळजीपूर्वक वाचा.**

१. तिने आईला पत्र लिहिले.

२. ते फुले ठेवलेले पात्र सुंदर दिसत आहे.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्दांबध्ये थोडासा फरक आहे. या दोन्ही शब्दांचा अर्थ वेगळा आहे.

याप्रमाणे खालील शब्दांचा उपयोग करून वाक्ये लिहा.

| | |
|---|---|
| घट = घाट | मन = मान |
| भट = भाट | रस = रास |
| मठ = माठ | घर = घार |

**३. माणसांच्या निवासस्थानाला 'घर' असे म्हणतात. त्याप्रमाणे खालील 'अ' स्तंभात पशू-पक्ष्यांची नावे दिली आहेत आणि 'ब' स्तंभात त्यांच्या राहण्याच्या जागांची नावे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) पक्षी | अ) गोठा |
| २) कोंबडा | ब) वारूळ |
| ३) घोडा | क) गुहा |
| ४) गुरे | ड) बीळ |
| ५) सिंह | इ) घरटे |
| ६) साप | फ) तबेला |
| ७) मुंगी | ग) खुराडे |

**उपक्रम :**

विविध पक्ष्यांची चित्र गोळा करून ती तुमच्या संग्रह वहीत चिकटवा. प्रत्येक चित्राखाली त्याचे नाव, रंग, अन्न व एखादे वैशिष्ट्य लिहा.

◆◆◆



**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

अ) कोकिळ व कोकिळा यांच्या रंगात कोणता फरक असतो?

ब) सुतारपक्षी आपले घर कसे तयार करतो?

क) सुतारपक्षी आपले अन्न कसे मिळवितो?

ड) टिटवी अंडी घालण्यापूर्वी दगड-गोटे का जमा करते?

**व्यवसाय :**

**खाली दोन वाक्ये दिली आहेत. ती काळजीपूर्वक वाचा.**

१. तिने आईला पत्र लिहिले.

२. ते फुले ठेवलेले पात्र सुंदर दिसत आहे.

वरील वाक्यांतील अधोरेखित शब्दांबध्ये थोडासा फरक आहे. या दोन्ही शब्दांचा अर्थ वेगळा आहे.

याप्रमाणे खालील शब्दांचा उपयोग करून वाक्ये लिहा.

| | |
|---|---|
| घट = घाट | मन = मान |
| भट = भाट | रस = रास |
| मठ = माठ | घर = घार |

**३. माणसांच्या निवासस्थानाला 'घर' असे म्हणतात. त्याप्रमाणे खालील 'अ' स्तंभात पशू-पक्ष्यांची नावे दिली आहेत आणि 'ब' स्तंभात त्यांच्या राहण्याच्या जागांची नावे दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) पक्षी | अ) गोठा |
| २) कोंबडा | ब) वारूळ |
| ३) घोडा | क) गुहा |
| ४) गुरे | ड) बीळ |
| ५) सिंह | इ) घरटे |
| ६) साप | फ) तबेला |
| ७) मुंगी | ग) खुराडे |

**उपक्रम :**

विविध पक्ष्यांची चित्र गोळा करून ती तुमच्या संग्रह वहीत चिकटवा. प्रत्येक चित्राखाली त्याचे नाव, रंग, अन्न व एखादे वैशिष्ट्य लिहा.

◆◆◆

# ११. फुलपाखरू

फुलाफुलावर उडत जा
रंगांची उधळण करत जा
कळ्यांशी पिंगा घालत जा
सर्वांना आनंद देत जा ।।१।।

निसर्गाचे रंग किती
त्यांची स्पर्धा करशील किती
नाजूक इवले पंख किती
शांतवती मम नयन अति ।।२।।

वाऱ्यासंगे खेळशी वरी
फुलांशी पिंगा घालशी जरी
मन रिझवशी नाना परी
येशील कधी तू माझ्या घरी ।।३।।

बागेत माझ्या येतेस कधी
बसतेस नी उडतेस कधी
मधूर मध चाखतेस कधी
हाती माझ्या येशील कधी ।।४।।

**– विश्वास सोवनी**

---

**प्रश्न :**

१. फुलपाखरू सर्वांना आनंद कसा देणार आहे?
२. फुलपाखराचे पंख कसे आहेत?
३. वारा व फुलाबरोबर फुलपाखरू काय काय करीत आहे?
४. बागेत येऊन फुलपाखरू काय काय करते?

◆◆◆



# ११. फुलपाखरू

फुलाफुलावर उडत जा
रंगांची उधळण करत जा
कळ्यांशी पिंगा घालत जा
सर्वांना आनंद देत जा ।।१।।

निसर्गाचे रंग किती
त्यांची स्पर्धा करशील किती
नाजूक इवले पंख किती
शांतवती मम नयन अति ।।२।।

वाऱ्यासंगे खेळशी वरी
फुलांशी पिंगा घालशी जरी
मन रिझवशी नाना परी
येशील कधी तू माझ्या घरी ।।३।।

बागेत माझ्या येतेस कधी
बसतेस नी उडतेस कधी
मधूर मध चाखतेस कधी
हाती माझ्या येशील कधी ।।४।।

**– विश्वास सोवनी**

---

**प्रश्न :**

१. फुलपाखरू सर्वांना आनंद कसा देणार आहे?
२. फुलपाखराचे पंख कसे आहेत?
३. वारा व फुलाबरोबर फुलपाखरू काय काय करीत आहे?
४. बागेत येऊन फुलपाखरू काय काय करते?

◆◆◆

३६

# १२. प्रदूषण - एक धोका



मराठीचा तास होता. शिक्षक वर्गात आले. वर्गात नियमितपणे हजर असणारी आंतोन, रशीद, वीणा व सेंड्रा ही मुले आज गैरहजर होती शिक्षकांनी चौकशी केली. ही मुले तसेच त्यांच्या घरची माणसेही आजारी आहेत असे त्यांना कळले.सगळी एकाचवेळी आजारी कशी पडली असा शिक्षकांना प्रश्न पडला. काही मुलांना सोबत घेऊन शिक्षक आजारी विद्यार्थ्यांच्या चौकशीसाठी त्यांच्या घरी गेले.

ती आजारी मुले एकाच वाड्यावर राहत होती. ह्या वाड्यावर लहान-लहान घरे अगदी दाटीवाटीने उभी होती. ठिकठिकाणी सांडपाणी साचलेले दिसत होते. दूरच्या पठारावर नवीनच सुरू झालेला कारखाना दिसत होता. कारखान्याची धुराडी धूर ओकत होती. एकंदर परिस्थिती न्याहाळीत सर्वजण आंतोनच्या घरी पोहोचले. रशीद, वीणा व सेंड्रा यांची घरेही आंतोनच्या घराजवळच होती. शिक्षकांनी विचारपूस करण्यास सुरुवात केली.

''दोन दिवसांपूर्वी ही मुले समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेली होती. त्यांना



# १२. प्रदूषण - एक धोका



मराठीचा तास होता. शिक्षक वर्गात आले. वर्गात नियमितपणे हजर असणारी आंतोन, रशीद, वीणा व सेंड्रा ही मुले आज गैरहजर होती शिक्षकांनी चौकशी केली. ही मुले तसेच त्यांच्या घरची माणसेही आजारी आहेत असे त्यांना कळले.सगळी एकाचवेळी आजारी कशी पडली असा शिक्षकांना प्रश्न पडला. काही मुलांना सोबत घेऊन शिक्षक आजारी विद्यार्थ्यांच्या चौकशीसाठी त्यांच्या घरी गेले.

ती आजारी मुले एकाच वाड्यावर राहत होती. ह्या वाड्यावर लहान-लहान घरे अगदी दाटीवाटीने उभी होती. ठिकठिकाणी सांडपाणी साचलेले दिसत होते. दूरच्या पठारावर नवीनच सुरू झालेला कारखाना दिसत होता. कारखान्याची धुराडी धूर ओकत होती. एकंदर परिस्थिती न्याहाळीत सर्वजण आंतोनच्या घरी पोहोचले. रशीद, वीणा व सेंड्रा यांची घरेही आंतोनच्या घराजवळच होती. शिक्षकांनी विचारपूस करण्यास सुरुवात केली.

''दोन दिवसांपूर्वी ही मुले समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेली होती. त्यांना

३७

समुद्रकिनाऱ्यालगत आलेले बरेच मासे दिसले. त्यांना मजा वाटली. त्यांनी बरेचसे मासे पकडून घरी आणले.” आंतोनचे वडील म्हणाले.

“ते मासे तुम्ही खाल्ले?” शिक्षकांनी विचारले.

“हो सर, तेच आमचं चुकलं.” आंतोनची आई म्हणाली.

“दुपारी जेवणात आम्ही सगळ्यांनीच ते मास खाल्ले. संध्याकाळ होता होता प्रत्येकाच्या पोटात दुखू लागलं. काहींना वांत्या सुरू झाल्या. बऱ्याच जणांना जुलाबही सुरू झाले.” आंतोनच्या वडिलांनी अधिक माहिती पुरविली.

सर्वांची भीतीने गाळण उडाली. शेजाऱ्यांनी जाऊन डॉक्टरांना आणले. डॉक्टरांनी प्रत्येकाची तपासणी केली. काहींना इंजेक्शने दिली. काहींना औषधही घ्यायला सांगितले. या उपचाराने बहुतेकजण बरे झाले. आंतोन व वीणा यांना मात्र गुण पडला नाही. तेव्हा डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यांना एक दिवस रुग्णालयात ठेवावे लागले. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्यात त्यांना यश आले व ही मुले बरी झाली. अशी माहिती इतरांनी पुरविली.

नंतर शिक्षक व मुलांनी सेंड्रा, रशीद व वीणा यांच्या घरी जाऊन विचारपूस केली. घरी परततानासुद्धा याच विषयावर गप्पा चालू होत्या.

“सर, मासे खाऊन ते सर्वजण आजारी का पडले?” श्रुतीने शिक्षकांना विचारले.

“सहसा मासे समुद्रकिनाऱ्यालगत कधीच येत नाहीत. जलप्रदूषण झालं तरच मासे किनाऱ्यालगत येऊ लागतात. ते मासे जलप्रदूषणामुळे खाण्यास योग्य नव्हते. म्हणूनच असा वाईट परिणाम झाला.” शिक्षकांनी स्पष्टीकरण केले.

“सर जलप्रदूषण म्हणजे काय?” ईशाने प्रश्न केला.

“सर,जलप्रदूषण कशामुळं होतं?’ पीटरने मधेच विचारले.

“मुलांनो धीर धरा. सर्व काही सांगतो.” शिक्षक म्हणाले.

“जल म्हणजे पाणी. पाणी दूषित होणं म्हणजेच जलप्रदूषण. गटारातून सांडपाणी समुद्रात सोडलं जातं. तसेच काही कारखान्यातील टाकाऊ रासायनिक द्रव्येही समुद्राच्या पाण्यातच सोडली जातात. त्यामुळे होणारे जलप्रदूषण अत्यंत घातक असतं.”

“सर, आमच्या भागात कारखाने नाहीतच. त्यामुळं आम्हाला जलप्रदूषणाची भीती नाही.” अब्दुल म्हणला.



समुद्रकिनाऱ्यालगत आलेले बरेच मासे दिसले. त्यांना मजा वाटली. त्यांनी बरेचसे मासे पकडून घरी आणले.” आंतोनचे वडील म्हणाले.

“ते मासे तुम्ही खाल्ले?” शिक्षकांनी विचारले.

“हो सर, तेच आमचं चुकलं.” आंतोनची आई म्हणाली.

“दुपारी जेवणात आम्ही सगळ्यांनीच ते मास खाल्ले. संध्याकाळ होता होता प्रत्येकाच्या पोटात दुखू लागलं. काहींना वांत्या सुरू झाल्या. बऱ्याच जणांना जुलाबही सुरू झाले.” आंतोनच्या वडिलांनी अधिक माहिती पुरविली.

सर्वांची भीतीने गाळण उडाली. शेजाऱ्यांनी जाऊन डॉक्टरांना आणले. डॉक्टरांनी प्रत्येकाची तपासणी केली. काहींना इंजेक्शने दिली. काहींना औषधही घ्यायला सांगितले. या उपचाराने बहुतेकजण बरे झाले. आंतोन व वीणा यांना मात्र गुण पडला नाही. तेव्हा डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यांना एक दिवस रुग्णालयात ठेवावे लागले. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्यात त्यांना यश आले व ही मुले बरी झाली. अशी माहिती इतरांनी पुरविली.

नंतर शिक्षक व मुलांनी सेंड्रा, रशीद व वीणा यांच्या घरी जाऊन विचारपूस केली. घरी परततानासुद्धा याच विषयावर गप्पा चालू होत्या.

“सर, मासे खाऊन ते सर्वजण आजारी का पडले?” श्रुतीने शिक्षकांना विचारले.

“सहसा मासे समुद्रकिनाऱ्यालगत कधीच येत नाहीत. जलप्रदूषण झालं तरच मासे किनाऱ्यालगत येऊ लागतात. ते मासे जलप्रदूषणामुळे खाण्यास योग्य नव्हते. म्हणूनच असा वाईट परिणाम झाला.” शिक्षकांनी स्पष्टीकरण केले.

“सर जलप्रदूषण म्हणजे काय?” ईशाने प्रश्न केला.

“सर,जलप्रदूषण कशामुळं होतं?’ पीटरने मधेच विचारले.

“मुलांनो धीर धरा. सर्व काही सांगतो.” शिक्षक म्हणाले.

“जल म्हणजे पाणी. पाणी दूषित होणं म्हणजेच जलप्रदूषण. गटारातून सांडपाणी समुद्रात सोडलं जातं. तसेच काही कारखान्यातील टाकाऊ रासायनिक द्रव्येही समुद्राच्या पाण्यातच सोडली जातात. त्यामुळे होणारे जलप्रदूषण अत्यंत घातक असतं.”

“सर, आमच्या भागात कारखाने नाहीतच. त्यामुळं आम्हाला जलप्रदूषणाची भीती नाही.” अब्दुल म्हणला.

३८

‘‘छे! छे! कारखाने नाहीत तिथेही जलप्रदूषण होऊ शकते.’’ शिक्षकांनी सांगितले.

‘‘ते कसं? श्रुतीने प्रश्न केला.

‘‘गावातील काही लोक मेलेली जनावरं नदीत टाकतात. काही ठिकाणी कुजके मासेसुद्धा नदीच्या पाण्यातच टाकले जातात. लोक नदीच्या पाण्यातच कपडे धुतात. त्यामुळे जलप्रदूषण होतं?’’ पीटरने शंका विचारली.

‘‘हो तर, त्यामुळंही पाणी प्रदूषित बनतं आणि हे असं प्रदूषित पाणी आरोग्याला अपायकारक असतं. हेच आपण गावातील लोकांना पटवून द्यायला पाहिजे.’’ शिक्षकांनी अधिक स्पष्ट केले.

‘‘सर, पण गावात पिण्याच्या पाण्याची अन्य सोय नसेल तर?’’ अब्दुलने विचारले.

‘‘तसं असेल तर मग आपण त्या नदीचं पाणी स्वच्छ राखलं पाहिजे.’’ शिक्षकांनी समजावले.

‘‘जलप्रदूषणाप्रमाणेच हवाप्रदूषणही होतं बरं का मुलांनो.’’ शिक्षकांनी नवीन माहिती दिली.

‘‘हवा दूषित होणं म्हणजेच हवाप्रदूषण, हो ना सर?’’ ईशाने खात्री करण्यासाठी विचारले.

‘‘अगदी बरोबर, मग सांगा पाहू हवाप्रदूषण कशामुळं होऊ शकेल?’’ शिक्षकांनी विचारले.

‘‘कारखान्याच्या धुराड्यातून बाहेर पडणारा धूर ‘‘हवाप्रदूषण’ करतो.’’ दूरच्या कारखान्यातील धुराड्याकडे बोट दाखवीत अब्दुल म्हणाला.

‘‘मेलेली जनावरं जमिनीत न पुरता उघड्यावर टाकल्यासही हवाप्रदूषण होतं.’’ पीटरने आपले मत व्यक्त केले.

‘‘सर, सांडपाणी साचून राहिल्यासही हवाप्रदूषण होऊ शकतं.’’ ईशानेही आपले मत मांडले.

‘‘तसंच वाहनांच्या धुरामुळंही हवाप्रदूषणात भर पडते.’’ शिक्षक म्हणाले

‘‘हवाप्रदूषण आरोग्याला अपायकारक कसं?’’ श्रुतीने प्रश्न केला.

‘‘श्वास घेताना नाकावाटे ही प्रदूषित हवा आपल्या फुप्फुसात जाते. त्यामुळं अनेक रोग होऊ शकतात. म्हणूनच तर जलप्रदूषण हवाप्रदूषण यांना आळा घातला पाहिजे.



‘‘छे! छे! कारखाने नाहीत तिथेही जलप्रदूषण होऊ शकते.’’ शिक्षकांनी सांगितले.

‘‘ते कसं? श्रुतीने प्रश्न केला.

‘‘गावातील काही लोक मेलेली जनावरं नदीत टाकतात. काही ठिकाणी कुजके मासेसुद्धा नदीच्या पाण्यातच टाकले जातात. लोक नदीच्या पाण्यातच कपडे धुतात. त्यामुळे जलप्रदूषण होतं?’’ पीटरने शंका विचारली.

‘‘हो तर, त्यामुळंही पाणी प्रदूषित बनतं आणि हे असं प्रदूषित पाणी आरोग्याला अपायकारक असतं. हेच आपण गावातील लोकांना पटवून द्यायला पाहिजे.’’ शिक्षकांनी अधिक स्पष्ट केले.

‘‘सर, पण गावात पिण्याच्या पाण्याची अन्य सोय नसेल तर?’’ अब्दुलने विचारले.

‘‘तसं असेल तर मग आपण त्या नदीचं पाणी स्वच्छ राखलं पाहिजे.’’ शिक्षकांनी समजावले.

‘‘जलप्रदूषणाप्रमाणेच हवाप्रदूषणही होतं बरं का मुलांनो.’’ शिक्षकांनी नवीन माहिती दिली.

‘‘हवा दूषित होणं म्हणजेच हवाप्रदूषण, हो ना सर?’’ ईशाने खात्री करण्यासाठी विचारले.

‘‘अगदी बरोबर, मग सांगा पाहू हवाप्रदूषण कशामुळं होऊ शकेल?’’ शिक्षकांनी विचारले.

‘‘कारखान्याच्या धुराड्यातून बाहेर पडणारा धूर ‘‘हवाप्रदूषण’ करतो.’’ दूरच्या कारखान्यातील धुराड्याकडे बोट दाखवीत अब्दुल म्हणाला.

‘‘मेलेली जनावरं जमिनीत न पुरता उघड्यावर टाकल्यासही हवाप्रदूषण होतं.’’ पीटरने आपले मत व्यक्त केले.

‘‘सर, सांडपाणी साचून राहिल्यासही हवाप्रदूषण होऊ शकतं.’’ ईशानेही आपले मत मांडले.

‘‘तसंच वाहनांच्या धुरामुळंही हवाप्रदूषणात भर पडते.’’ शिक्षक म्हणाले

‘‘हवाप्रदूषण आरोग्याला अपायकारक कसं?’’ श्रुतीने प्रश्न केला.

‘‘श्वास घेताना नाकावाटे ही प्रदूषित हवा आपल्या फुप्फुसात जाते. त्यामुळं अनेक रोग होऊ शकतात. म्हणूनच तर जलप्रदूषण हवाप्रदूषण यांना आळा घातला पाहिजे.

३९

त्यासाठी तुम्ही मुलंही आपापला खारीचा वाटा उचलू शकता.'' शिक्षकांनी सांगितलं.

''आम्ही काय करू शकतो सर?'' पीटरने विचारले.

''प्रत्येकानं आपल्या घरासभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. घरातील वडिलधाऱ्यांना सांगून सांडपाण्याची योग्य व्यवस्था केली पाहिजे.'' शिक्षकांनी समजावून सांगितले.

''सर, झाडं लावल्यानंही हवाप्रदूषण रोखण्यास मदत होते का हो?'' ईशाने विचारले.

''हो ना, झाडं हवेतील कार्बन डायऑक्साईड वायू शोषून घेतात. त्यामुळे हवा शुद्ध होण्यास मदत होते. म्हणूनच 'वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन' ही आजची गरज आहे.'' शिक्षक म्हणाले.

''सर यापुढं आम्हीही प्रदूषण होणार नाही याची काळजी घेऊ.'' सर्वजण एका आवाजात म्हणाली.

---

**शब्दार्थ :**

**प्रदूषित –** दूषित, अशुद्ध. **दाटीवाटीने –** खूप जवळ. **धुराडे –** धूर जाण्यासाठी केलेला मार्ग.

**वाक्प्रचार :**

**भीतीने गाळण उडणे –** खूप भीती वाटणे. **आळा घालणे –** आटोक्यात आणणे. **प्रयत्नाची पराकाष्ठा करणे –** खूप प्रयत्न करणे.

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. रशीद शाळेत का आला नव्हता?
२. शिक्षक आंतोनच्या घरी का गेले?
३. मुले आजारी का पडली?
४. वाहनांमुळे हवाप्रदूषण कसे होते?
५. जलप्रदूषण म्हणजे काय?



त्यासाठी तुम्ही मुलंही आपापला खारीचा वाटा उचलू शकता.'' शिक्षकांनी सांगितलं.

''आम्ही काय करू शकतो सर?'' पीटरने विचारले.

''प्रत्येकानं आपल्या घरासभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. घरातील वडिलधाऱ्यांना सांगून सांडपाण्याची योग्य व्यवस्था केली पाहिजे.'' शिक्षकांनी समजावून सांगितले.

''सर, झाडं लावल्यानंही हवाप्रदूषण रोखण्यास मदत होते का हो?'' ईशाने विचारले.

''हो ना, झाडं हवेतील कार्बन डायऑक्साईड वायू शोषून घेतात. त्यामुळे हवा शुद्ध होण्यास मदत होते. म्हणूनच 'वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन' ही आजची गरज आहे.'' शिक्षक म्हणाले.

''सर यापुढं आम्हीही प्रदूषण होणार नाही याची काळजी घेऊ.'' सर्वजण एका आवाजात म्हणाली.

**शब्दार्थ :**

**प्रदूषित –** दूषित, अशुद्ध. **दाटीवाटीने –** खूप जवळ. **धुराडे –** धूर जाण्यासाठी केलेला मार्ग.

**वाक्प्रचार :**

**भीतीने गाळण उडणे –** खूप भीती वाटणे. **आळा घालणे –** आटोक्यात आणणे. **प्रयत्नाची पराकाष्ठा करणे –** खूप प्रयत्न करणे.

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. रशीद शाळेत का आला नव्हता?
२. शिक्षक आंतोनच्या घरी का गेले?
३. मुले आजारी का पडली?
४. वाहनांमुळे हवाप्रदूषण कसे होते?
५. जलप्रदूषण म्हणजे काय?

४०

**ब) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१) जलप्रदूषण कशामुळे होते?

२) हवाप्रदूषण होऊ नये म्हणून काय करता येईल?

३) प्रदूषण कसे टाळता येईल?

**व्यवसाय :**

**'शिमग्याचा उत्सव' या दोन शब्दांऐवजी शिमगोत्सव हा एक शब्द वापरतात. याप्रमाणे खालील शब्दांपासून प्रत्येकी एक शब्द बनवा.**

शारदेचा उत्सव    दीपाचा उत्सव

नवरात्रीचा उत्सव    शिवरात्रीचा उत्सव

जत्रेचा उत्सव

**उपक्रम :**

प्रदूषण कोणत्या कारणांनी होते त्यासंबंधी चित्रे गोळा करून वहीत चिकटवा व प्रत्येक चित्राखाली प्रदूषणाचा प्रकार लिहा.

◆◆◆



**ब) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१) जलप्रदूषण कशामुळे होते?

२) हवाप्रदूषण होऊ नये म्हणून काय करता येईल?

३) प्रदूषण कसे टाळता येईल?

**व्यवसाय :**

**'शिमग्याचा उत्सव' या दोन शब्दांऐवजी शिमगोत्सव हा एक शब्द वापरतात. याप्रमाणे खालील शब्दांपासून प्रत्येकी एक शब्द बनवा.**

शारदेचा उत्सव    दीपाचा उत्सव

नवरात्रीचा उत्सव    शिवरात्रीचा उत्सव

जत्रेचा उत्सव

**उपक्रम :**

प्रदूषण कोणत्या कारणांनी होते त्यासंबंधी चित्रे गोळा करून वहीत चिकटवा व प्रत्येक चित्राखाली प्रदूषणाचा प्रकार लिहा.

◆◆◆

४१

# १३. दयाळू डॉक्टर

अचानक मोठा आवाज झाला. लोकांच्या किंकाळ्या ऐकू आल्या. लोक आवाजाच्या दिशेने धावले. एक प्रवासी बस व जीप यांची समोरासमोर टक्कर झाली होती. अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले होते. काही जणांना मुका मार बसला होता. तर काहीजण गंभीररित्या जखमी झाले होते. अपाघातग्रस्तांच्या मदतीसाठी लोकांनी धावाधाव केली. जखमींना जवळच्या दवाखान्यात उपचार केले. काहीजणांना किरकोळ उपचार करून घरी पाठवून देण्यात आले. गंभीररित्या जखमी झालेल्यामध्ये एक तरुण होता. रक्तस्राव झाल्याने त्याची शुद्ध हरपली होती. त्याच्या पायाचे हाड मोडले होते. पायावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्याला डॉक्टर रमेशनी आपल्या दवाखान्यात ठेवून घेतले व नंतर शस्त्रक्रिया करण्यासाठी शहरातील रुग्णालयात नेले. तेथे त्याच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

तो तरुण आठ-दहा तासानंतर शुद्धीवर आला. त्याला वेदना होत होत्या. त्याने डोळे उघडून पाहिले. आपण बसमध्ये नसून रुग्णालयातील खाटेवर असल्याचे त्याच्या लक्षात आले.





# १३. दयाळू डॉक्टर

अचानक मोठा आवाज झाला. लोकांच्या किंकाळ्या ऐकू आल्या. लोक आवाजाच्या दिशेने धावले. एक प्रवासी बस व जीप यांची समोरासमोर टक्कर झाली होती. अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले होते. काही जणांना मुका मार बसला होता. तर काहीजण गंभीररित्या जखमी झाले होते. अपाघातग्रस्तांच्या मदतीसाठी लोकांनी धावाधाव केली. जखमींना जवळच्या दवाखान्यात उपचार केले. काहीजणांना किरकोळ उपचार करून घरी पाठवून देण्यात आले. गंभीररित्या जखमी झालेल्यामध्ये एक तरुण होता. रक्तस्राव झाल्याने त्याची शुद्ध हरपली होती. त्याच्या पायाचे हाड मोडले होते. पायावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्याला डॉक्टर रमेशनी आपल्या दवाखान्यात ठेवून घेतले व नंतर शस्त्रक्रिया करण्यासाठी शहरातील रुग्णालयात नेले. तेथे त्याच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली.

तो तरुण आठ-दहा तासानंतर शुद्धीवर आला. त्याला वेदना होत होत्या. त्याने डोळे उघडून पाहिले. आपण बसमध्ये नसून रुग्णालयातील खाटेवर असल्याचे त्याच्या लक्षात आले.



पायाकडे लक्ष जाताच त्याला दु:ख झाले. तरुण शुद्धीवर आल्याचे पाहून डॉक्टरांना समाधान वाटले. डॉक्टरांनी त्याच्या औषधोपचाराची व्यवस्था केली व ते आपल्या घरी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर रुग्णालयात आले. त्याची विचारपूस केली व त्याचा परिचय करून घेतला.

जानू नावाचा हा तरुण आंबेवाडी गावचा होता. दहावीपर्यंत शिकला होता. घरच्या गरिबीमुळे पुढे शिकू शकला नव्हता. घरी फक्त म्हातारे वडील होते. उदरनिर्वाहासाठी ते मोलमजुरी करीत असत. त्याची आई लहानपणीच वारली होती. डॉक्टरांना जानूच्या घरची माहिती समजल्यावर दया आली.

डॉक्टर रमेश 'गरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध होते. आपल्याभोवती असलेल्या गरीब, अडाणी व अर्धपोटी लोकांना ते नेहमीच मदत करीत. त्यानंतर चार दिवसांनी डॉक्टर रमेशनी जानूला रुग्णालयातून आपल्या दवाखान्यात आणले.

एके दिवशी डॉक्टर त्याच्या शस्त्रक्रियेची तपासणी करीत होते. जानू त्यांना म्हणाला,





पायाकडे लक्ष जाताच त्याला दु:ख झाले. तरुण शुद्धीवर आल्याचे पाहून डॉक्टरांना समाधान वाटले. डॉक्टरांनी त्याच्या औषधोपचाराची व्यवस्था केली व ते आपल्या घरी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर रुग्णालयात आले. त्याची विचारपूस केली व त्याचा परिचय करून घेतला.

जानू नावाचा हा तरुण आंबेवाडी गावचा होता. दहावीपर्यंत शिकला होता. घरच्या गरिबीमुळे पुढे शिकू शकला नव्हता. घरी फक्त म्हातारे वडील होते. उदरनिर्वाहासाठी ते मोलमजुरी करीत असत. त्याची आई लहानपणीच वारली होती. डॉक्टरांना जानूच्या घरची माहिती समजल्यावर दया आली.

डॉक्टर रमेश 'गरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध होते. आपल्याभोवती असलेल्या गरीब, अडाणी व अर्धपोटी लोकांना ते नेहमीच मदत करीत. त्यानंतर चार दिवसांनी डॉक्टर रमेशनी जानूला रुग्णालयातून आपल्या दवाखान्यात आणले.

एके दिवशी डॉक्टर त्याच्या शस्त्रक्रियेची तपासणी करीत होते. जानू त्यांना म्हणाला,



४३

''डॉक्टर, तुम्ही मला वाचविलेत. मी तुमचा अत्यंत आभारी आहे. पण मी जागण्याऐवजी मेलो असतो तर सुटलो असतो एकदाचा. मी तुम्हाला त्रास देण्यासाठीच जगलो आहे.''

''अरे, असं का बोलतोस? तुला एवढं दु:ख कसलं आहे? मी उपचार करतो ते माझं कर्तव्यच आहे. कसलीही चिंता करू नकोस.'' डॉक्टरांनी त्याला धीर दिला.

''डॉक्टर, मी फार गरीब. कामधंदा मिळेल या आशेने मी शहरात गेलो होतो. प्रयत्न करूनही कामधंदा मिळाला नाही. घरी परत येत असताना अपघातात सापडलो.''

''अरे जानू, निराश होऊ नकोस. सर्व काही ठीक होईल.'' डॉक्टरांनी म्हटले. असेच काही दिवस गेले. जानूला हळूहळू चालता येऊ लागले.

एके दिवशी त्याने डॉक्टरांना विचारले,

''डॉक्टर, मी आता चालू शकतो. मी जाऊ का?''

''कुठं जाणार आहेस? घरीच ना? घरी जाऊन काय करणार आहेस? इथंच रहा. दवाखान्यातील कामात मदत कर. तुला पुढं शिकावंसं वाटत असेल तर शिक.''

डॉक्टरांचे उद्गार ऐकताच जानूचे डोळे पाणावले. त्याने डॉक्टरांचे पाय धरले.

---

**शब्दार्थ :**

**भेसूर –** भीतीदायक आरडाओरड. **रक्तस्राव –** रक्त वाहणे. **शुद्ध हरपणे –** बेशुद्ध पडणे. **रुग्णालय –** आरोग्य केंद्र.

**वाक्प्रचार :**

**उदरनिर्वाह करणे –** पोट भरण्यासाठी काम करणे. **पाय धरणे–** उपकारी भावनेने शरण येणे.

**प्रश्न :**

**१) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. जानू पुढचे शिक्षण का घेऊ शकला नाही?
२. जानू शहरात कशासाठी गेला होता?
३. जानूचे डोळे केव्हा पाणावले?



''डॉक्टर, तुम्ही मला वाचविलेत. मी तुमचा अत्यंत आभारी आहे. पण मी जागण्याऐवजी मेलो असतो तर सुटलो असतो एकदाचा. मी तुम्हाला त्रास देण्यासाठीच जगलो आहे.''

''अरे, असं का बोलतोस? तुला एवढं दु:ख कसलं आहे? मी उपचार करतो ते माझं कर्तव्यच आहे. कसलीही चिंता करू नकोस.'' डॉक्टरांनी त्याला धीर दिला.

''डॉक्टर, मी फार गरीब. कामधंदा मिळेल या आशेने मी शहरात गेलो होतो. प्रयत्न करूनही कामधंदा मिळाला नाही. घरी परत येत असताना अपघातात सापडलो.''

''अरे जानू, निराश होऊ नकोस. सर्व काही ठीक होईल.'' डॉक्टरांनी म्हटले. असेच काही दिवस गेले. जानूला हळूहळू चालता येऊ लागले.

एके दिवशी त्याने डॉक्टरांना विचारले,

''डॉक्टर, मी आता चालू शकतो. मी जाऊ का?''

''कुठं जाणार आहेस? घरीच ना? घरी जाऊन काय करणार आहेस? इथंच रहा. दवाखान्यातील कामात मदत कर. तुला पुढं शिकावंसं वाटत असेल तर शिक.''

डॉक्टरांचे उद्गार ऐकताच जानूचे डोळे पाणावले. त्याने डॉक्टरांचे पाय धरले.

**शब्दार्थ :**

**भेसूर –** भीतीदायक आरडाओरड. **रक्तस्राव –** रक्त वाहणे. **शुद्ध हरपणे –** बेशुद्ध पडणे. **रुग्णालय –** आरोग्य केंद्र.

**वाक्प्रचार :**

**उदरनिर्वाह करणे –** पोट भरण्यासाठी काम करणे. **पाय धरणे–** उपकारी भावनेने शरण येणे.

**प्रश्न :**

**१) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. जानू पुढचे शिक्षण का घेऊ शकला नाही?
२. जानू शहरात कशासाठी गेला होता?
३. जानूचे डोळे केव्हा पाणावले?

४४

**२) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ वाक्यांत लिहा.**

१) अपघातग्रस्तांना लोकांनी कशी मदत केली?

२) जानूच्या पायावर डॉ. रमेश यांनी शस्त्रक्रिया करण्यासाठी कशाप्रकारे धावपळ केली?

३) जानूच्या घरची परिस्थिति कशी होती?

४) डॉ. रमेश गरिबांची सेवा करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करीत असत?

५) डॉक्टरांनी जानूला घरी का पाठविले नाही?

**व्यवसाय :**

**अ) क्रियापदांची योग्य रूपे योजून खालील मोकळ्या जागा भरा.**

**जसे : पंखा फिरतो –पंखे फिरतात.**

१. चाक फिरते – चाके ............

२. विमान उडते – विमाने ............

३. गाडी धावते – गाड्या ............

४. मुलगा पळतो – मुलगे ............

**ब) रुग्णालय हा शब्द 'रुग्ण + आलय' हे दोन शब्द एकत्र आल्याने बनलेला आहे. याप्रमाणे खालील शब्दांना एकत्र आणून एक शब्द बनवा.**

औषध + आलय ............ देव + आलय ............

पुस्तक + आलय ............ सचिव + आलय ............

भोजन + आलय ............

**उपक्रम :**

वर्तमानपत्रातून अपघाताची कारणे मिळवून त्यांची यादी करा.

◆◆◆



**२) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३ ते ४ वाक्यांत लिहा.**

१) अपघातग्रस्तांना लोकांनी कशी मदत केली?

२) जानूच्या पायावर डॉ. रमेश यांनी शस्त्रक्रिया करण्यासाठी कशाप्रकारे धावपळ केली?

३) जानूच्या घरची परिस्थिति कशी होती?

४) डॉ. रमेश गरिबांची सेवा करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करीत असत?

५) डॉक्टरांनी जानूला घरी का पाठविले नाही?

**व्यवसाय :**

**अ) क्रियापदांची योग्य रूपे योजून खालील मोकळ्या जागा भरा.**

**जसे : पंखा फिरतो –पंखे फिरतात.**

१. चाक फिरते – चाके ............

२. विमान उडते – विमाने ............

३. गाडी धावते – गाड्या ............

४. मुलगा पळतो – मुलगे ............

**ब) रुग्णालय हा शब्द 'रुग्ण + आलय' हे दोन शब्द एकत्र आल्याने बनलेला आहे. याप्रमाणे खालील शब्दांना एकत्र आणून एक शब्द बनवा.**

औषध + आलय ............ देव + आलय ............

पुस्तक + आलय ............ सचिव + आलय ............

भोजन + आलय ............

**उपक्रम :**

वर्तमानपत्रातून अपघाताची कारणे मिळवून त्यांची यादी करा.

◆◆◆

# १४. दोन पत्रे

(१)

चावडी, काणकोण,
गोवा. ४०३७०२
दि. २५ सप्टेंबर, १९९४.

तीर्थस्वरूप गणूमामा यांना,
सा.न.वि.वि.

खूप दिवस झाले. तुमचं पत्र नाही. परेशच्या वाढदिवसाला मी आलो नाही म्हणून रागावलात की काय? वादळी पाऊस पडत होता म्हणून आम्हाला बेत रद्द करावा लागला. यायला न मिळाल्यानं मी फार निराश झालो. परेशसाठी घेतलेली भेटवस्तू तशीच जपून ठेवली आहे.

येत्या महिन्याच्या १५ तारखेला माझाही वाढदिवस आहे. तुमच्या लक्षात असेलच. तुम्ही मामी, परेशसह याच.

वाढदिवसाला माझे मित्र येणार आहेतच. काका-काकू व ताईसुद्धा येणार आहेत. लाडू, बर्फी, जिलेबी बनविण्यासाठी खास मनुष्य बोलाविलेला आहे. दादा मोठा केक आणणार आहे. दादाच्या मित्रांचा आग्रह आहे म्हणून व्हिडिओ सिनेमा ठेवणार आहोत. संपूर्ण समारंभाचं व्हिडिओ शुटिंग करणार आहोत. बाबांचे मित्र येणार आहेत. त्यांच्यासाठी पार्टीचा बेत आहे.

वाढदिवसाची भेट म्हणून ताई माझ्यासाठी कपडे आणणार आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे बाबा माझ्यासाठी रेसची सायकल आणणार आहेत. काल मी व बाबा बाजारात गेलो होतो. सायकल पसंत करून आलो. मी निळ्या रंगाची सायकल पसंत केली. कालच घरी आणणार होतो, पण बाबा म्हणाले वाढदिवशीच आणू या. केव्हा एकदा सायकल घरी आणतो व चालवतो असं मला वाटतं आहे.

तुम्ही सर्व याच. सौ. मामींना सा. नमस्कार, परेशला गोडगोड पापा.

आपला भाचा,
उमेश



# १४. दोन पत्रे

(१)

चावडी, काणकोण,
गोवा. ४०३७०२
दि. २५ सप्टेंबर, १९९४.

तीर्थस्वरूप गणूमामा यांना,
सा.न.वि.वि.

खूप दिवस झाले. तुमचं पत्र नाही. परेशच्या वाढदिवसाला मी आलो नाही म्हणून रागावलात की काय? वादळी पाऊस पडत होता म्हणून आम्हाला बेत रद्द करावा लागला. यायला न मिळाल्यानं मी फार निराश झालो. परेशसाठी घेतलेली भेटवस्तू तशीच जपून ठेवली आहे.

येत्या महिन्याच्या १५ तारखेला माझाही वाढदिवस आहे. तुमच्या लक्षात असेलच. तुम्ही मामी, परेशसह याच.

वाढदिवसाला माझे मित्र येणार आहेतच. काका-काकू व ताईसुद्धा येणार आहेत. लाडू, बर्फी, जिलेबी बनविण्यासाठी खास मनुष्य बोलाविलेला आहे. दादा मोठा केक आणणार आहे. दादाच्या मित्रांचा आग्रह आहे म्हणून व्हिडिओ सिनेमा ठेवणार आहोत. संपूर्ण समारंभाचं व्हिडिओ शुटिंग करणार आहोत. बाबांचे मित्र येणार आहेत. त्यांच्यासाठी पार्टीचा बेत आहे.

वाढदिवसाची भेट म्हणून ताई माझ्यासाठी कपडे आणणार आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे बाबा माझ्यासाठी रेसची सायकल आणणार आहेत. काल मी व बाबा बाजारात गेलो होतो. सायकल पसंत करून आलो. मी निळ्या रंगाची सायकल पसंत केली. कालच घरी आणणार होतो, पण बाबा म्हणाले वाढदिवशीच आणू या. केव्हा एकदा सायकल घरी आणतो व चालवतो असं मला वाटतं आहे.

तुम्ही सर्व याच. सौ. मामींना सा. नमस्कार, परेशला गोडगोड पापा.

आपला भाचा,
उमेश

४६

(२)

'ज्ञानदासदन'
जागृतीनगर, फोंडा,
गोवा. ४०३४०१
दि. ३० सप्टेंबर, १९९४.

चिरंजीव उमेश यास,

अनेक आशीर्वाद

तुझं पत्र मिळालं. तू स्वत: पत्र लिहिल्यानं खूप कौतुक वाटलं. परेशलाही फार आनंद वाटला. असंच पत्र पाठवत जा.

चि. परेशच्या वाढदिवसादिवशी आम्ही तुमची वाट पहात होतोच, पण वादळी पावसातून आला नाहीत हे बरं झालं. आमच्याइकडे मात्र त्या दिवशी पाऊस कमीच होता.

आम्ही या वर्षी परेशचा वाढदिवस वेगळ्या पद्धतीनं साजरा केला. त्या दिवशी आम्ही परेशला घेऊन अपंग मुलांच्या शाळेत गेलो होतो. या शाळेत मुकी व बहिरी मुले शिकतात. तेथील संचालकांची परवानगी घेऊन मुलांना भेटलो. त्यांचा परिचय करून घेतला. परेश त्यांचे मुके हावभाव कुतुहलानं पहात होता. ती मुले सर्व कामे मुकाट्याने करीत होती. आम्ही त्यांच्याशी खेळ खेळलो. त्यांना एकदिवस खूप-खूप आनंद दिला. त्यांना गोड-गोड खाऊ वाटला. नंतर सर्वजण घरी परतलो. सायंकाळी वाढदिवसाचा साधासा समारंभ केला. या समारंभातसुद्धा परेश अपंग मुलांबद्दल आपल्या मित्रांना सांगत होता.

तुझाही वाढदिवस अशाच प्रकारे वेगळ्या पद्धतीनं साजरा करता येईल. गरीब वस्तीतील एखाद्या बालवाडीस भेट देता येईल. तिथे छोटी मुलं असतात त्यांना गोष्टी सांगता येतील, गाणी शिकवता येतील. त्यांना खाऊ देता येईल. पेन, वही, पुस्तक यापैकी एखादी वस्तू भेट देता येईल. त्यांना खूप आनंद होईल.

माझी ही सूचना तुला व तुझ्या मित्रांनाही आवडेल यात शंका नाही. वाढदिवस घरी साजरा करू नये असं मी म्हणत नाही. घरात साधासा समारंभ करावा. आपण अनाठाई खर्च करून वाढदिवस साजरे करतो. त्यापेक्षा गरीब व गरजू मुलांना एक दिवस आनंद दिला तर! माझा आग्रह नाही. प्रेमळ सूचना आहे. माझी ही नवीन कल्पना तुला आवडली की नाही ते कळव.

आम्ही सर्व मंडळी क्षेम आहोत. तुझ्या आईस व बाबांना नमस्कार सांग. चि. विजूदादास अनेक आशीर्वाद.

तुझा मामा,
गणू



(२)

'ज्ञानदासदन'
जागृतीनगर, फोंडा,
गोवा. ४०३४०१
दि. ३० सप्टेंबर, १९९४.

चिरंजीव उमेश यास,

अनेक आशीर्वाद

तुझं पत्र मिळालं. तू स्वत: पत्र लिहिल्यानं खूप कौतुक वाटलं. परेशलाही फार आनंद वाटला. असंच पत्र पाठवत जा.

चि. परेशच्या वाढदिवसादिवशी आम्ही तुमची वाट पहात होतोच, पण वादळी पावसातून आला नाहीत हे बरं झालं. आमच्याइकडे मात्र त्या दिवशी पाऊस कमीच होता.

आम्ही या वर्षी परेशचा वाढदिवस वेगळ्या पद्धतीनं साजरा केला. त्या दिवशी आम्ही परेशला घेऊन अपंग मुलांच्या शाळेत गेलो होतो. या शाळेत मुकी व बहिरी मुले शिकतात. तेथील संचालकांची परवानगी घेऊन मुलांना भेटलो. त्यांचा परिचय करून घेतला. परेश त्यांचे मुके हावभाव कुतुहलानं पहात होता. ती मुले सर्व कामे मुकाट्याने करीत होती. आम्ही त्यांच्याशी खेळ खेळलो. त्यांना एकदिवस खूप-खूप आनंद दिला. त्यांना गोड-गोड खाऊ वाटला. नंतर सर्वजण घरी परतलो. सायंकाळी वाढदिवसाचा साधासा समारंभ केला. या समारंभातसुद्धा परेश अपंग मुलांबद्दल आपल्या मित्रांना सांगत होता.

तुझाही वाढदिवस अशाच प्रकारे वेगळ्या पद्धतीनं साजरा करता येईल. गरीब वस्तीतील एखाद्या बालवाडीस भेट देता येईल. तिथे छोटी मुलं असतात त्यांना गोष्टी सांगता येतील, गाणी शिकवता येतील. त्यांना खाऊ देता येईल. पेन, वही, पुस्तक यापैकी एखादी वस्तू भेट देता येईल. त्यांना खूप आनंद होईल.

माझी ही सूचना तुला व तुझ्या मित्रांनाही आवडेल यात शंका नाही. वाढदिवस घरी साजरा करू नये असं मी म्हणत नाही. घरात साधासा समारंभ करावा. आपण अनाठाई खर्च करून वाढदिवस साजरे करतो. त्यापेक्षा गरीब व गरजू मुलांना एक दिवस आनंद दिला तर! माझा आग्रह नाही. प्रेमळ सूचना आहे. माझी ही नवीन कल्पना तुला आवडली की नाही ते कळव.

आम्ही सर्व मंडळी क्षेम आहोत. तुझ्या आईस व बाबांना नमस्कार सांग. चि. विजूदादास अनेक आशीर्वाद.

तुझा मामा,
गणू

४७

**शब्दार्थ :**

**क्षेम** – सुखरूप. **पार्टी** – मेजवानी, पाहुण्यासाठी खास बनविलेले जेवण. **कुतूहल** – नवल. **शुटिंग** – व्हिडिओ कॅमेऱ्यातून करावयाचे छायाचित्रण. **अनाठाई** – विनाकारण. **रेसची सायकल** – शर्यतीसाठी बनविलेली खास सायकल.

**वाक्प्रचार :**

**उदरनिर्वाह करणे** – पोट भरण्यासाठी काम करणे. **पाय धरणे**– उपकारी भावनेने शरण येणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. परेशच्या वाढदिवसासाठी उमेश हजर का राहू शकला नाही?
२. उमेशचा वाढदिवस कशाप्रकारे साजरा करण्यात येणार आहे?
३. उमेशचे बाबा त्याच्यासाठी कोणती भेटवस्तू घेणार आहेत?
४. परेशचा वाढदिवस अपंग मुलांच्या शाळेत कसा साजरा करण्यात आला?

**व्यवसाय :**

**कंसातील शब्दांची योग्यरूपे घालून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. मी आज येथे ................ (असणे).
२. मी काल बाहेरगावी........... (असणे).
३. मी उद्या मुंबईस............... (असणे).

**उपक्रम :**

तुमच्या गावच्या जत्रोत्सवास उपस्थित राहण्यासाठी तुमच्या मित्रास पत्र लिहून कळवा.

◆◆◆



**शब्दार्थ :**

**क्षेम** – सुखरूप. **पार्टी** – मेजवानी, पाहुण्यासाठी खास बनविलेले जेवण. **कुतूहल** – नवल. **शुटिंग** – व्हिडिओ कॅमेऱ्यातून करावयाचे छायाचित्रण. **अनाठाई** – विनाकारण. **रेसची सायकल** – शर्यतीसाठी बनविलेली खास सायकल.

**वाक्प्रचार :**

**उदरनिर्वाह करणे** – पोट भरण्यासाठी काम करणे. **पाय धरणे**– उपकारी भावनेने शरण येणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. परेशच्या वाढदिवसासाठी उमेश हजर का राहू शकला नाही?
२. उमेशचा वाढदिवस कशाप्रकारे साजरा करण्यात येणार आहे?
३. उमेशचे बाबा त्याच्यासाठी कोणती भेटवस्तू घेणार आहेत?
४. परेशचा वाढदिवस अपंग मुलांच्या शाळेत कसा साजरा करण्यात आला?

**व्यवसाय :**

**कंसातील शब्दांची योग्यरूपे घालून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. मी आज येथे ................ (असणे).
२. मी काल बाहेरगावी........... (असणे).
३. मी उद्या मुंबईस............... (असणे).

**उपक्रम :**

तुमच्या गावच्या जत्रोत्सवास उपस्थित राहण्यासाठी तुमच्या मित्रास पत्र लिहून कळवा.

◆◆◆

# १५. थोर गोमन्तकीय

**१. भजनसम्राट मनोहरबुवा शिरगावकर :**

स्वर्गीय मनोहरबुवा हे डिचोली तालुक्यातील शिरगावचे! त्यांना गाण्याची आवड लागली ती त्यांच्या वडिलांमुळे! गावात जेव्हा निरनिराळे उत्सव, नाटके व कीर्तने होत असत तेव्हा ते आपल्या वडिलांबरोबर त्या कार्यक्रमांना जात असत. ऐकलेली गाणी ते घरी गुणगुणत असत. त्यांची गायनाची आवड लक्षात घेऊन वडिलांनी त्यांना गायन शिकविण्याची व्यवस्था केली. मनोहरबुवांनी थोड्याच दिवसात गायनकला आत्मसात केली. नंतर ते संगीत नाटकातून भूमिका करू लागले. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या नाटक कंपनीत त्यांना प्रमुख भूमिका करण्याची संधीही मिळाली.

काही वर्षानंतर ते आपल्या गावी परत आले. त्यांनी भजनाकडे आपले लक्ष वळवले. त्यानंतर गावातील काही लोकांना एकत्र करून त्यांना मनोहरबुवा भजन शिकवू लागले. मनोहरबुवा संतांचे अभंग इतके आळवून म्हणत की लोक त्या भजनात दंग होऊन जात. बालगंधर्वांनी देखील भजन ऐकून त्यांचे कौतुक केले. त्यांनी गावातील लोकांचे एक चांगले भजनीमंडळ तयार केले. नंतर त्यांनी अनेक गावात जाऊन तेथील तरुणांना भजन शिकविले. मनोहरबुवांनी कितीतरी चांगले भजनी कलाकार तयार केले.

शास्त्रशुद्ध पद्धतीने भजन म्हणण्याची कला मनोहरबुवांनी गोमंतकात सर्वत्र रुजविली. गोमंतकीय जनतेने त्यांना 'भजनसम्राट' ही पदवी दिली. अशा या थोर कलावंताचे निधनसुद्धा भजनसेवा करता करता हृदयविकाराच्या झटक्याने झाले.



आज गोव्यात विविध ठिकाणी भजनस्पर्धा आयोजित केल्या जातात. अखिल गोमंतक पातळीवरकला अकादमीतर्फे भजनीस्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेसाठी प्रथम क्रम ंकाची ढाल भजनसम्राट कै. मनोहरबुवा शिरगावकर यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आली आहे.




# १५. थोर गोमन्तकीय

**१. भजनसम्राट मनोहरबुवा शिरगावकर :**

स्वर्गीय मनोहरबुवा हे डिचोली तालुक्यातील शिरगावचे! त्यांना गाण्याची आवड लागली ती त्यांच्या वडिलांमुळे! गावात जेव्हा निरनिराळे उत्सव, नाटके व कीर्तने होत असत तेव्हा ते आपल्या वडिलांबरोबर त्या कार्यक्रमांना जात असत. ऐकलेली गाणी ते घरी गुणगुणत असत. त्यांची गायनाची आवड लक्षात घेऊन वडिलांनी त्यांना गायन शिकविण्याची व्यवस्था केली. मनोहरबुवांनी थोड्याच दिवसात गायनकला आत्मसात केली. नंतर ते संगीत नाटकातून भूमिका करू लागले. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या नाटक कंपनीत त्यांना प्रमुख भूमिका करण्याची संधीही मिळाली.

काही वर्षानंतर ते आपल्या गावी परत आले. त्यांनी भजनाकडे आपले लक्ष वळवले. त्यानंतर गावातील काही लोकांना एकत्र करून त्यांना मनोहरबुवा भजन शिकवू लागले. मनोहरबुवा संतांचे अभंग इतके आळवून म्हणत की लोक त्या भजनात दंग होऊन जात. बालगंधर्वांनी देखील भजन ऐकून त्यांचे कौतुक केले. त्यांनी गावातील लोकांचे एक चांगले भजनीमंडळ तयार केले. नंतर त्यांनी अनेक गावात जाऊन तेथील तरुणांना भजन शिकविले. मनोहरबुवांनी कितीतरी चांगले भजनी कलाकार तयार केले.

शास्त्रशुद्ध पद्धतीने भजन म्हणण्याची कला मनोहरबुवांनी गोमंतकात सर्वत्र रुजविली. गोमंतकीय जनतेने त्यांना 'भजनसम्राट' ही पदवी दिली. अशा या थोर कलावंताचे निधनसुद्धा भजनसेवा करता करता हृदयविकाराच्या झटक्याने झाले.



आज गोव्यात विविध ठिकाणी भजनस्पर्धा आयोजित केल्या जातात. अखिल गोमंतक पातळीवरकला अकादमीतर्फे भजनीस्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेसाठी प्रथम क्रम ंकाची ढाल भजनसम्राट कै. मनोहरबुवा शिरगावकर यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आली आहे.

४९

**२. गानपंडिता मोगूबाई कुर्डीकर :**

सांगे तालुक्यातील 'कुर्डी' या गावात मोगूबाई कुर्डीकर या थोर गायिकेचा जन्म झाला. त्यांच्या घरात गायन-वादनाची पिढीजात परंपरा होती. मोगूबाईंची आई जयश्रीबाई यांची आपल्या मुलीने थोर गायिका व्हावे अशी इच्छा होती. मोगूबाईंना पण बालपणापासून गाण्याची आवड होती. गाणे शिकण्यासाठी आई व मोगूबाई या दोघी गावोगाव हिंडत होत्या. मोगूबाईंनी प्रथम नाटककंपनीतून छोटी छोटी कामे केली. पण त्यांच्या गायनाच्या शिक्षणास प्रथम सुरुवात झाली ती इनायतखाँ पठाण यांच्याकडे.



मोगूबाई कुर्डीकर

एके दिवशी मोगूबाई एक चीज आळवत होत्या. त्यांचा गोड व लयदार आवाज ऐकून गानसम्राट अल्लादियाखाँ स्वतः त्यांच्या घरी आले. खाँसाहेबांनी त्यांचा शिष्या म्हणून स्वीकार केला. मोगूबाईंची ग्रहणशक्ती दांडगी होती. त्यामुळे खाँसाहेब त्यांना आत्मीयतेने शिकवित असत. मोगूबाईंनी एका वर्षात संगीतातील अनेक अवघड राग आत्मसात केले. अर्थात हे शिक्षण त्यांना सहज मिळाले नाही. यासाठी त्यांना खूप कष्ट सोसावे लागले.

पुढे त्या गाण्याच्या मैफलीत गाऊ लागल्या. एकदा एका मैफलीत मोगूबाई व खाँसाहेबांचे इतर शिष्य गात होते. त्यावेळी श्रोत्यांनी मोगूबाईंच्या गायनाला खूप दाद दिली. ही शिष्या आपल्या घराण्याचे नाव उज्ज्वल करेल याची अल्लादियाखाँना खात्री वाटली. त्यांनी अंतरोली (जयपूर) घराण्याची सर्वश्रेष्ठ गायिका म्हणून मोगूबाईंचा गौरव केला. मोगूबाईंच्या लयकारीचे खाप्रूमाम पर्वतकारांनीही अमाप कौतुक केले. श्रीमती मोगूबाई कुर्डीकरांना भारतातील थोर



**२. गानपंडिता मोगूबाई कुर्डीकर :**

सांगे तालुक्यातील 'कुर्डी' या गावात मोगूबाई कुर्डीकर या थोर गायिकेचा जन्म झाला. त्यांच्या घरात गायन-वादनाची पिढीजात परंपरा होती. मोगूबाईंची आई जयश्रीबाई यांची आपल्या मुलीने थोर गायिका व्हावे अशी इच्छा होती. मोगूबाईंना पण बालपणापासून गाण्याची आवड होती. गाणे शिकण्यासाठी आई व मोगूबाई या दोघी गावोगाव हिंडत होत्या. मोगूबाईंनी प्रथम नाटककंपनीतून छोटी छोटी कामे केली. पण त्यांच्या गायनाच्या शिक्षणास प्रथम सुरुवात झाली ती इनायतखाँ पठाण यांच्याकडे.



मोगूबाई कुर्डीकर

एके दिवशी मोगूबाई एक चीज आळवत होत्या. त्यांचा गोड व लयदार आवाज ऐकून गानसम्राट अल्लादियाखाँ स्वतः त्यांच्या घरी आले. खाँसाहेबांनी त्यांचा शिष्या म्हणून स्वीकार केला. मोगूबाईंची ग्रहणशक्ती दांडगी होती. त्यामुळे खाँसाहेब त्यांना आत्मीयतेने शिकवित असत. मोगूबाईंनी एका वर्षात संगीतातील अनेक अवघड राग आत्मसात केले. अर्थात हे शिक्षण त्यांना सहज मिळाले नाही. यासाठी त्यांना खूप कष्ट सोसावे लागले.


पुढे त्या गाण्याच्या मैफलीत गाऊ लागल्या. एकदा एका मैफलीत मोगूबाई व खाँसाहेबांचे इतर शिष्य गात होते. त्यावेळी श्रोत्यांनी मोगूबाईंच्या गायनाला खूप दाद दिली. ही शिष्या आपल्या घराण्याचे नाव उज्ज्वल करेल याची अल्लादियाखाँना खात्री वाटली. त्यांनी अंतरोली (जयपूर) घराण्याची सर्वश्रेष्ठ गायिका म्हणून मोगूबाईंचा गौरव केला. मोगूबाईंच्या लयकारीचे खाप्रूमाम पर्वतकारांनीही अमाप कौतुक केले. श्रीमती मोगूबाई कुर्डीकरांना भारतातील थोर

५०

गायिका म्हणून ओळखले जाते.

**३. नाट्यकलाकार तातोबा वेलींगकर :**

गोमंतक ही कलाकारांची भूमी. गोमंतकातील लोकांची एक खास आवड म्हणजे नाटक. गोमंतकातील नाट्यक्षेत्रात जे अनेक कलाकार होऊन गेले, त्यात



स्वर्गीय तातोबा वेलींगकर हे एक श्रेष्ठ नाट्यकलाकार होते. त्यांचे पूर्ण नाव श्री. मंगेश सीताराम वेलींगकर. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईत झाले. नाट्यकलाकार होण्याची त्यांची जबरदस्त इच्छा होती. गायन-वादनाचे शिक्षण त्यांनी श्री. परशुराम पार्सेकर यांच्याकडून घेतले. गिरणी कामगारांनी बसविलेल्या नाटकांतून ते छोट्या छोट्या भूमिका करू लागले.

तातोबा वयाच्या सव्विसाव्या वर्षी गोव्यात आले. गोव्यातही ते विविध नाटकातून भूमिका करू लागले. खानापूर येथील एका नाट्यसंस्थेतर्फे त्यांनी अनेक गावांमध्ये नाट्यप्रयोग केले. तातोबांनी वेलींग येथे नवयुग नाट्यमंदिर या नाट्यसंस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या नाटकामध्ये गोव्यातील अनेक नवीन कलाकारांना त्यांनी वाव दिला. तातोबाही नाटकातून स्वत: कामे करीत. कधी विनोदी तर कधी खलनायकाची भूमिका उत्तम वठवित असत. त्यांनी जवळ जवळ दोनशे भूमिका केल्या तर सुमारे अडीचशे नाटकांचे दिग्दर्शनही केले. नाट्यशिबिरे भरवून त्यांनी अनेक कलाकारांना मार्गदर्शन केले.

तातोबांनी 'सुना देव्हारा देवाविना' हे नाटक लिहिले. या नाटकाला कला अकादमीच्या नाट्यलेखन स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले. त्यांच्या या नाट्यप्रवासात त्यांना यशस्वी साथ मिळाली ती त्यांच्या पत्नी श्रीमती अलका वेलींगकर यांची. १९९१ साली पणजी येथील 'गोमंतक मराठी अकादमी' या संस्थेने तातोबांचा गौरव केला. असे ज्येष्ठ, श्रेष्ठ नाट्यकलाकार तातोबा वेलींगकर १६ मार्च १९९४ रोजी स्वर्गवासी झाले.

◆◆◆



गायिका म्हणून ओळखले जाते.

**३. नाट्यकलाकार तातोबा वेलींगकर :**

गोमंतक ही कलाकारांची भूमी. गोमंतकातील लोकांची एक खास आवड म्हणजे नाटक. गोमंतकातील नाट्यक्षेत्रात जे अनेक कलाकार होऊन गेले, त्यात



स्वर्गीय तातोबा वेलींगकर हे एक श्रेष्ठ नाट्यकलाकार होते. त्यांचे पूर्ण नाव श्री. मंगेश सीताराम वेलींगकर. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईत झाले. नाट्यकलाकार होण्याची त्यांची जबरदस्त इच्छा होती. गायन-वादनाचे शिक्षण त्यांनी श्री. परशुराम पार्सेकर यांच्याकडून घेतले. गिरणी कामगारांनी बसविलेल्या नाटकांतून ते छोट्या छोट्या भूमिका करू लागले.

तातोबा वयाच्या सव्विसाव्या वर्षी गोव्यात आले. गोव्यातही ते विविध नाटकातून भूमिका करू लागले. खानापूर येथील एका नाट्यसंस्थेतर्फे त्यांनी अनेक गावांमध्ये नाट्यप्रयोग केले. तातोबांनी वेलींग येथे नवयुग नाट्यमंदिर या नाट्यसंस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या नाटकामध्ये गोव्यातील अनेक नवीन कलाकारांना त्यांनी वाव दिला. तातोबाही नाटकातून स्वत: कामे करीत. कधी विनोदी तर कधी खलनायकाची भूमिका उत्तम वठवित असत. त्यांनी जवळ जवळ दोनशे भूमिका केल्या तर सुमारे अडीचशे नाटकांचे दिग्दर्शनही केले. नाट्यशिबिरे भरवून त्यांनी अनेक कलाकारांना मार्गदर्शन केले.

तातोबांनी 'सुना देव्हारा देवाविना' हे नाटक लिहिले. या नाटकाला कला अकादमीच्या नाट्यलेखन स्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले. त्यांच्या या नाट्यप्रवासात त्यांना यशस्वी साथ मिळाली ती त्यांच्या पत्नी श्रीमती अलका वेलींगकर यांची. १९९१ साली पणजी येथील 'गोमंतक मराठी अकादमी' या संस्थेने तातोबांचा गौरव केला. असे ज्येष्ठ, श्रेष्ठ नाट्यकलाकार तातोबा वेलींगकर १६ मार्च १९९४ रोजी स्वर्गवासी झाले.

◆◆◆

# १६. वारा

अंग नाही, रंग नाही
विचित्र हा वारा
घर नाही दार नाही
नाही कोठे थारा ।।

नभातून अवतरे
धरेवर धावे
धर्म याचा धावण्याचा
थांबणे ना ठावे ।।

दांडगा हा जंगलाच्या
निबिडात घुसे
फांदी फांदी वाकवून
झोका घेत बसे ।।

सागराच्या सरितेच्या
लाटांवर खेळे
गोंजारित गवताला
माळावर पळे ।।

देवळात शिरे कधी
घुमे गाभाऱ्यात
भयभीत कापतसे
दिव्यातील वात ।।

कधी येता क्रोध त्याला
धावे पिशापरी
वनातून, जनातून
मोडतोड करी ।।

उन्हाळ्यात वारा पण
देवदूत होतो
अमृताचा स्पर्श साऱ्या
जगताला देतो ।।

**– कुसुमाग्रज**

**शब्दार्थ :**

**धरा** – पृथ्वी. **निबिड** – गडद अंधार. **सरिता** – नदी. **क्रोध** – राग.

**प्रश्न :**

१. वाऱ्याला कोणकोणत्या गोष्टी नाहीत?
२. वारा झोका कसा घेतो?
३. देवळात शिरून वारा काय करतो?
४. वाऱ्याला देवदूत का म्हटले आहे?
५. वारा लाटा व माळावरकाय काय करतो?

◆◆◆



# १६. वारा

अंग नाही, रंग नाही
विचित्र हा वारा
घर नाही दार नाही
नाही कोठे थारा ।।

नभातून अवतरे
धरेवर धावे
धर्म याचा धावण्याचा
थांबणे ना ठावे ।।

दांडगा हा जंगलाच्या
निबिडात घुसे
फांदी फांदी वाकवून
झोका घेत बसे ।।

सागराच्या सरितेच्या
लाटांवर खेळे
गोंजारित गवताला
माळावर पळे ।।

देवळात शिरे कधी
घुमे गाभाऱ्यात
भयभीत कापतसे
दिव्यातील वात ।।

कधी येता क्रोध त्याला
धावे पिशापरी
वनातून, जनातून
मोडतोड करी ।।

उन्हाळ्यात वारा पण
देवदूत होतो
अमृताचा स्पर्श साऱ्या
जगताला देतो ।।

**– कुसुमाग्रज**

**शब्दार्थ :**

**धरा** – पृथ्वी. **निबिड** – गडद अंधार. **सरिता** – नदी. **क्रोध** – राग.

**प्रश्न :**

१. वाऱ्याला कोणकोणत्या गोष्टी नाहीत?
२. वारा झोका कसा घेतो?
३. देवळात शिरून वारा काय करतो?
४. वाऱ्याला देवदूत का म्हटले आहे?
५. वारा लाटा व माळावरकाय काय करतो?

◆◆◆

५२

# १७. माणसातील देव

एक होता गाव. मुख्य रस्त्यापासून दूर. गावात जाण्यासाठी कच्चा रस्ता होता. कधीतरी एखादी सायकल किंवा बैलगाडी या रस्त्यावरून जाताना दिसे. गाव तसा लहानच. वीस-पंचवीस घरे. काही दगडी तर काही मातीची. गावात शेतजमीन फारच थोडी. हंगामातच गावात काम मिळे. इतरवेळी कामासाठी शेजारच्या गावात जावे लागे. काही मुलेही आई-वडिलांसोबत मजुरीला जात. काही मुले घरकाम करीत तर काही छोट्या भावंडांना सांभाळीत. त्यामुळे शाळेत मुलांची उपस्थिती कमी होती.

गावात एक देशी दारूचे दुकान होते. या दुकानात संध्याकाळी गर्दी असे. दारूने झिंगलेले काहीजण अंधारातून धडपडत आपले घर गाठीत. एखादा उशिरापर्यंत घरी पोचला नाही तर त्याची शोधाशोध होई. रस्त्याच्या कडेला पडलेल्या एखाद्या दारूड्याला आधार देऊन घराकडे नेले जाई. दारूच्या नशेत किरकोळ कारणांवरून घरात भांडणे होत. भांड्यांची आदळआपट होई कधी कधी बायको-मुलांना मारहाण होई. शेजाऱ्या-पाजाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली जाई. भांडणे हातघाईवर येत. कोणीतरी अशी भांडणे मिटवी.

नाना हे त्याच गावचे रहिवासी. त्यांची आर्थिक स्थिती बरी होती. ते पंढरीची वारी करीत. अधूनमधून शेजारच्या गावातील स्वामीमहाराजांकडे जात. त्यांच्या सहवासात नाना देवाची भक्ती करीत. देवाच्या भजनात ते दंग होत. गरीब लोकांविषयी नानांना कळवळा होता. व्यसनाधीन झालेल्या आपल्या गावातील लोकांना सुधारावे म्हणून ते प्रयत्न करीत पण त्यात नानांना यश येत नसे. त्यामुळे ते दु:खी होत.

एके दिवशी नानांनी स्वामीमहाराजांना आपल्या घरी आमंत्रित केले. अनेक ग्रामस्थांना बोलाविले. नानांच्या आग्रहामुळे अनेक दारूबाजही स्वामीमहाराजांच्या प्रवचनास हजर राहिले.

'व्यसनामुळे माणसाचे जीवन उद्ध्वस्त होते.'

या विषयावर महाराजांनी प्रवचन केले. दारूच्या व्यसनामुळे मनुष्य दरिद्री बनतो. कधी कधी चोऱ्याही करतो. दारूच्या नशेत घरात तसेच समाजात भांडणे व मारामाऱ्या होतात. दारूमुळे आरोग्य बिघडते. कष्ट करून मिळविलेला पैसा व्यसनात खर्च होतो. असा विचार त्यांनी मांडला. महाराजांच्या या प्रवचनाचा श्रोत्यांवर चांगला परिणाम झाला. प्रवचनानंतर महाराजांनी सर्वांना भजनात गुंतवून ठेवले.

नानांनी सर्व उपस्थितांना जेवणासाठी थांबण्याचा आग्रह केला. अनेकांनी जेवण



# १७. माणसातील देव

एक होता गाव. मुख्य रस्त्यापासून दूर. गावात जाण्यासाठी कच्चा रस्ता होता. कधीतरी एखादी सायकल किंवा बैलगाडी या रस्त्यावरून जाताना दिसे. गाव तसा लहानच. वीस-पंचवीस घरे. काही दगडी तर काही मातीची. गावात शेतजमीन फारच थोडी. हंगामातच गावात काम मिळे. इतरवेळी कामासाठी शेजारच्या गावात जावे लागे. काही मुलेही आई-वडिलांसोबत मजुरीला जात. काही मुले घरकाम करीत तर काही छोट्या भावंडांना सांभाळीत. त्यामुळे शाळेत मुलांची उपस्थिती कमी होती.

गावात एक देशी दारूचे दुकान होते. या दुकानात संध्याकाळी गर्दी असे. दारूने झिंगलेले काहीजण अंधारातून धडपडत आपले घर गाठीत. एखादा उशिरापर्यंत घरी पोचला नाही तर त्याची शोधाशोध होई. रस्त्याच्या कडेला पडलेल्या एखाद्या दारूड्याला आधार देऊन घराकडे नेले जाई. दारूच्या नशेत किरकोळ कारणांवरून घरात भांडणे होत. भांड्यांची आदळआपट होई कधी कधी बायको-मुलांना मारहाण होई. शेजाऱ्या-पाजाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली जाई. भांडणे हातघाईवर येत. कोणीतरी अशी भांडणे मिटवी.

नाना हे त्याच गावचे रहिवासी. त्यांची आर्थिक स्थिती बरी होती. ते पंढरीची वारी करीत. अधूनमधून शेजारच्या गावातील स्वामीमहाराजांकडे जात. त्यांच्या सहवासात नाना देवाची भक्ती करीत. देवाच्या भजनात ते दंग होत. गरीब लोकांविषयी नानांना कळवळा होता. व्यसनाधीन झालेल्या आपल्या गावातील लोकांना सुधारावे म्हणून ते प्रयत्न करीत पण त्यात नानांना यश येत नसे. त्यामुळे ते दु:खी होत.

एके दिवशी नानांनी स्वामीमहाराजांना आपल्या घरी आमंत्रित केले. अनेक ग्रामस्थांना बोलाविले. नानांच्या आग्रहामुळे अनेक दारूबाजही स्वामीमहाराजांच्या प्रवचनास हजर राहिले.

'व्यसनामुळे माणसाचे जीवन उद्ध्वस्त होते.'

या विषयावर महाराजांनी प्रवचन केले. दारूच्या व्यसनामुळे मनुष्य दरिद्री बनतो. कधी कधी चोऱ्याही करतो. दारूच्या नशेत घरात तसेच समाजात भांडणे व मारामाऱ्या होतात. दारूमुळे आरोग्य बिघडते. कष्ट करून मिळविलेला पैसा व्यसनात खर्च होतो. असा विचार त्यांनी मांडला. महाराजांच्या या प्रवचनाचा श्रोत्यांवर चांगला परिणाम झाला. प्रवचनानंतर महाराजांनी सर्वांना भजनात गुंतवून ठेवले.

नानांनी सर्व उपस्थितांना जेवणासाठी थांबण्याचा आग्रह केला. अनेकांनी जेवण

५३



वाढण्याचे काम केले. भेदभाव विसरून सर्वजण एका पंक्तीस बसले. स्वामीमहाराजही त्यात सहभागी झाले.

नानांच्या विनंतीनुसार स्वामीमहाराजांनी आपला मुक्काम वाढविला. रोज भजनाचा व प्रवचनाचा कार्यक्रम आखला. दुसऱ्या दिवशी पुरुषांची उपस्थिती कमी होती. महाराजांनी यावर विचार केला. ''उद्यापासून भजन-प्रवचनाचा कार्यक्रम तुमच्यापैकी एकेकाच्या घरी होईल.'' महाराज म्हणाले. अनेकांचे चेहरे आनंदाने उजळले. रोज एक घर स्वच्छ होऊ लागले. परिसराची झाडलोट झाली. घराघरात आनंदोत्सव साजरा होऊ लागला. रोज संध्याकाळपासून रात्रीपर्यंत लोक भजनात दंग होऊ लागले. गावातील दारू पिणाऱ्यांची संख्या कमी कमी होत गेली. गिऱ्हाईकांची वाट पहात बसणाऱ्या दारूदुकानाच्या मालकाने दारूचे दुकान कायमचे बंद केले. महाराजांच्या भक्तीसेवाकार्यात तोही सहभागी झाला.

स्वामीमहाराजांच्या प्रेरणेने हळूहळू गावात विकासकामे होऊ लागली. श्रमदानाने रस्त्याची दुरुस्ती झाली. विहिरी, पाणवठ्यांची सफाई झाली. गावात इतरही खूप बदल झाले. शाळेत न येणारी मुले नियमित शाळेत येऊ लागली. प्रौढ साक्षरता वर्ग सुरू झाला. गावाचा चेहरामोहरा बदलून गेला.

भक्तीसेवा अखंड चालू रहावी म्हणून सर्व ग्रामस्थांच्या मदतीने एका मंदिराचे बांधकाम





वाढण्याचे काम केले. भेदभाव विसरून सर्वजण एका पंक्तीस बसले. स्वामीमहाराजही त्यात सहभागी झाले.

नानांच्या विनंतीनुसार स्वामीमहाराजांनी आपला मुक्काम वाढविला. रोज भजनाचा व प्रवचनाचा कार्यक्रम आखला. दुसऱ्या दिवशी पुरुषांची उपस्थिती कमी होती. महाराजांनी यावर विचार केला. ''उद्यापासून भजन-प्रवचनाचा कार्यक्रम तुमच्यापैकी एकेकाच्या घरी होईल.'' महाराज म्हणाले. अनेकांचे चेहरे आनंदाने उजळले. रोज एक घर स्वच्छ होऊ लागले. परिसराची झाडलोट झाली. घराघरात आनंदोत्सव साजरा होऊ लागला. रोज संध्याकाळपासून रात्रीपर्यंत लोक भजनात दंग होऊ लागले. गावातील दारू पिणाऱ्यांची संख्या कमी कमी होत गेली. गिऱ्हाईकांची वाट पहात बसणाऱ्या दारूदुकानाच्या मालकाने दारूचे दुकान कायमचे बंद केले. महाराजांच्या भक्तीसेवाकार्यात तोही सहभागी झाला.

स्वामीमहाराजांच्या प्रेरणेने हळूहळू गावात विकासकामे होऊ लागली. श्रमदानाने रस्त्याची दुरुस्ती झाली. विहिरी, पाणवठ्यांची सफाई झाली. गावात इतरही खूप बदल झाले. शाळेत न येणारी मुले नियमित शाळेत येऊ लागली. प्रौढ साक्षरता वर्ग सुरू झाला. गावाचा चेहरामोहरा बदलून गेला.

भक्तीसेवा अखंड चालू रहावी म्हणून सर्व ग्रामस्थांच्या मदतीने एका मंदिराचे बांधकाम

सुरू झाले. बांधकाम पूर्ण होताच मंदिरात मूर्तीची स्थापना करण्याचा गावकऱ्यांचा हेतू होता. त्यांनी आपला विचार महाराजांना सांगितला. स्वामी महाराजांनी आनंदाने मान्यता दिली व सर्व जबाबदारी आपण स्वीकारली.

स्थापनेचा दिवस उजाडला. त्यानुसार गावाच्या सीमेवर लोक स्वामीमहाराजांची वाट पाहू लागले. महाराज गाडीतून खाली उतरले. कागदी वेष्टनातील तसबीर पालखीत ठेवली. टाळमृदंगाच्या गजरात व लेझिमच्या आवाजात पालखी मिरवणूक मंदिराकडे निघाली. रस्त्याच्या दुतर्फा रंगीबेरंगी पताका लावल्या होत्या. मिरवणुकीत अनेक स्त्री-पुरुष व मुले सहभागी झाली होती. स्वामीमहाराज पालखीपुढे पायी चालत होते. मिरवणूक मंदिरासमोर पोचली. मंदिरात रोषणाई केली होती.

महाराजांनी पालखीतील तसबीर उचलून मंदिरातील गाभाऱ्यात ठेवली. सर्वांनी जयजयकार केला. तसबिरीवरील आवरण बाजूला काढले तोच सर्व लोक आश्चर्यचकित झाले. तो एक भला मोठा आरसा होता. स्वामीमहाराज म्हणाले, ''समोरच्या गाभाऱ्यातील आरशात जे दिसेल तोच तुमचा देव. देव प्रत्येक सजिवात आहे. तुम्ही स्वत: देव आहात. सदाचाराने वागा. ज्ञानसंपादन करा आणि सुखी व्हा.''

---

**शब्दार्थ :**

**हंगाम –** मोसम. **ज्ञानसंपादन करणे –** ज्ञान मिळविणे. **झिंगलेले –** दारूच्या धुंदीत असलेले. **व्यसन –** वाईट सवय. **नशा –** धुंदी. **प्रवचन –** उपदेशपर भाषण. **अखंड –** सतत. **उद्ध्वस्त –** नाश. **तसबीर –** चित्र.

**वाक्प्रचार :**

**हातघाईवर येणे –** मारामारी करणे. **चेहरामोहरा बदलणे –** पूर्णपणे बदलणे. **चेहरा उजळणे –** आनंदीत होणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. गावातील रस्ता कसा होता?
२. स्वामीमहाराजांच्या सहवासात राहून नाना काय करीत असत?
३. नाना कशासाठी प्रयत्न करीत असत?
४. गावातील दारूचे दुकान बंद का पडले.
५. महाराजांनी देव कोणास म्हटले?



सुरू झाले. बांधकाम पूर्ण होताच मंदिरात मूर्तीची स्थापना करण्याचा गावकऱ्यांचा हेतू होता. त्यांनी आपला विचार महाराजांना सांगितला. स्वामी महाराजांनी आनंदाने मान्यता दिली व सर्व जबाबदारी आपण स्वीकारली.

स्थापनेचा दिवस उजाडला. त्यानुसार गावाच्या सीमेवर लोक स्वामीमहाराजांची वाट पाहू लागले. महाराज गाडीतून खाली उतरले. कागदी वेष्टनातील तसबीर पालखीत ठेवली. टाळमृदंगाच्या गजरात व लेझिमच्या आवाजात पालखी मिरवणूक मंदिराकडे निघाली. रस्त्याच्या दुतर्फा रंगीबेरंगी पताका लावल्या होत्या. मिरवणुकीत अनेक स्त्री-पुरुष व मुले सहभागी झाली होती. स्वामीमहाराज पालखीपुढे पायी चालत होते. मिरवणूक मंदिरासमोर पोचली. मंदिरात रोषणाई केली होती.

महाराजांनी पालखीतील तसबीर उचलून मंदिरातील गाभाऱ्यात ठेवली. सर्वांनी जयजयकार केला. तसबिरीवरील आवरण बाजूला काढले तोच सर्व लोक आश्चर्यचकित झाले. तो एक भला मोठा आरसा होता. स्वामीमहाराज म्हणाले, ''समोरच्या गाभाऱ्यातील आरशात जे दिसेल तोच तुमचा देव. देव प्रत्येक सजिवात आहे. तुम्ही स्वत: देव आहात. सदाचाराने वागा. ज्ञानसंपादन करा आणि सुखी व्हा.''

---

**शब्दार्थ :**

**हंगाम –** मोसम. **ज्ञानसंपादन करणे –** ज्ञान मिळविणे. **झिंगलेले –** दारूच्या धुंदीत असलेले. **व्यसन –** वाईट सवय. **नशा –** धुंदी. **प्रवचन –** उपदेशपर भाषण. **अखंड –** सतत. **उद्ध्वस्त –** नाश. **तसबीर –** चित्र.

**वाक्प्रचार :**

**हातघाईवर येणे –** मारामारी करणे. **चेहरामोहरा बदलणे –** पूर्णपणे बदलणे. **चेहरा उजळणे –** आनंदीत होणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. गावातील रस्ता कसा होता?
२. स्वामीमहाराजांच्या सहवासात राहून नाना काय करीत असत?
३. नाना कशासाठी प्रयत्न करीत असत?
४. गावातील दारूचे दुकान बंद का पडले.
५. महाराजांनी देव कोणास म्हटले?

५५

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१. गावात भांडणे का होत असत?
२. महाराजांनी आपल्या प्रवचनातून कोणता उपदेश केला?
३. गावच्या विकासासाठी लोकांनी काय केले?
४. गाभाऱ्यात आरसा ठेवल्यानंतर महाराजांनी लोकांना काय सांगितले?

**व्यवसाय :**

**योग्य विरामचिन्हे वापरून उतारा पुन्हा लिहा.**

मामाने हातात दिलेले पैसे त्याने हातातच धरून ठेवले रस्त्याने जाताना कुणाचा तरी धक्का लागला ते पैसे रस्त्यात पडले बाळूच्या लक्षात आले नाही घरी गेल्यावर पाहतो तर हातात पैसे नाहीत आई रागावली आणि म्हणाली मामानं पैसे सांभाळून ने म्हणून सांगितलं होतं ना मग ते खिशात घालून नाही का आणायचे.

◆◆◆



**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन ते चार वाक्यांत लिहा.**

१. गावात भांडणे का होत असत?
२. महाराजांनी आपल्या प्रवचनातून कोणता उपदेश केला?
३. गावच्या विकासासाठी लोकांनी काय केले?
४. गाभाऱ्यात आरसा ठेवल्यानंतर महाराजांनी लोकांना काय सांगितले?

**व्यवसाय :**

**योग्य विरामचिन्हे वापरून उतारा पुन्हा लिहा.**

मामाने हातात दिलेले पैसे त्याने हातातच धरून ठेवले रस्त्याने जाताना कुणाचा तरी धक्का लागला ते पैसे रस्त्यात पडले बाळूच्या लक्षात आले नाही घरी गेल्यावर पाहतो तर हातात पैसे नाहीत आई रागावली आणि म्हणाली मामानं पैसे सांभाळून ने म्हणून सांगितलं होतं ना मग ते खिशात घालून नाही का आणायचे.

◆◆◆

५६

# १८. सत्यनिष्ठ मोहन

मोहन १५ वर्षांचा असतानाची गोष्ट. तो व त्याचा मोठा भाऊ उसनवारी करून खाणावळीत जाऊन जेवले. उसनी घेतलेली रक्कम तशी फार नव्हती. पण ती परत करायला हवीच होती. भावाभावानी बसून आपापसात विचारविनिमय केला. मोहनच्या भावाजवळ एक सोन्याचे कडे होते. त्याचा एक तुकडा कापायचा, तो विकायचा आणि त्यातून ती उसनी घेतलेली रक्कम चुकती करून टाकायची असा बेत ठरला. तो बेत त्यांनी गुपचूपपणे पारही पाडला. त्यांच्या आईवडिलांना याचा पत्ता नव्हता. पण आपण काहीतरी चूक केली आहे असे मोहनला वाटले. त्यामुळे त्याचे मन त्याला खाऊ लागले.

त्या रात्री आईच्या ध्यानात आले की कड्याचा लहानसा तुकडा काढलेला आहे. तिने मुलांकडे त्यासंबंधी चोकशी केली. दोघांनीही कानावर हात ठेवले.

मोहनला मात्र काही केला चैन पडेना. अनेक विचारांनी त्याच्या डोक्यात थैमान घातले होते. शेवटी त्याने आईला खरा प्रकार सांगून टाकला. आईचे अंत:करण हळहळले. आईचा मोहनवर फार जीव होता. त्याने अशी चूक करावी याचे तिला फार वाईट वाटले.

''वडिलांजवळ जा आणि सगळे मोकळ्या मनाने सांगून टाक.'' तिने मोहनला सल्ला दिला.

मोहनने आईचे म्हणणे मान्य केले, पण वडिलांसमोर जाण्याची हिंमत त्याला होईना.

त्याचे वडील मुलांना कधीच मारीत नसत. ते आपणास चोप देतील, शिक्षा करतील ही भीती त्याच्या मनात नव्हती. चुकीबद्दल आपणास त्यांनी चोप दिला तरी चालेल, पण आपण केलेल्या चोरीमुळे त्यांना खूप वाईट वाटेल, आपल्या मुलाने विश्वासाला तडा दिला हे कळल्यावर त्यांना मनस्वी दु:ख होईल या कल्पनेने मोहनच्या अंगावर भीतीने काटा उभा राहिला.

मोहनजवळ एकच मार्ग शिल्लक होता. आपली चूक कबूल करणे, अपराध केल्याची कबुली देणे व पुन्हा तशी गोष्ट न करणे.

मोहनने एक कागद घेतला. ''बाबा, मी फार अपराधी आहे. मी सोन्याच्या कड्याचा तुकडा कापून विकला. माझ्या हातून फार मोठी चूक झाली आहे. मला क्षमा करा. झालेल्या अपराधाबद्दल मला शिक्ष द्या. यापुढे माझ्या हातून अशी चूक कधीही होणार नाही अशी मी प्रतिज्ञा करतो.'' कबुलीजबाब लिहून काढला.



# १८. सत्यनिष्ठ मोहन

मोहन १५ वर्षांचा असतानाची गोष्ट. तो व त्याचा मोठा भाऊ उसनवारी करून खाणावळीत जाऊन जेवले. उसनी घेतलेली रक्कम तशी फार नव्हती. पण ती परत करायला हवीच होती. भावाभावानी बसून आपापसात विचारविनिमय केला. मोहनच्या भावाजवळ एक सोन्याचे कडे होते. त्याचा एक तुकडा कापायचा, तो विकायचा आणि त्यातून ती उसनी घेतलेली रक्कम चुकती करून टाकायची असा बेत ठरला. तो बेत त्यांनी गुपचूपपणे पारही पाडला. त्यांच्या आईवडिलांना याचा पत्ता नव्हता. पण आपण काहीतरी चूक केली आहे असे मोहनला वाटले. त्यामुळे त्याचे मन त्याला खाऊ लागले.

त्या रात्री आईच्या ध्यानात आले की कड्याचा लहानसा तुकडा काढलेला आहे. तिने मुलांकडे त्यासंबंधी चोकशी केली. दोघांनीही कानावर हात ठेवले.

मोहनला मात्र काही केला चैन पडेना. अनेक विचारांनी त्याच्या डोक्यात थैमान घातले होते. शेवटी त्याने आईला खरा प्रकार सांगून टाकला. आईचे अंत:करण हळहळले. आईचा मोहनवर फार जीव होता. त्याने अशी चूक करावी याचे तिला फार वाईट वाटले.

''वडिलांजवळ जा आणि सगळे मोकळ्या मनाने सांगून टाक.'' तिने मोहनला सल्ला दिला.

मोहनने आईचे म्हणणे मान्य केले, पण वडिलांसमोर जाण्याची हिंमत त्याला होईना.

त्याचे वडील मुलांना कधीच मारीत नसत. ते आपणास चोप देतील, शिक्षा करतील ही भीती त्याच्या मनात नव्हती. चुकीबद्दल आपणास त्यांनी चोप दिला तरी चालेल, पण आपण केलेल्या चोरीमुळे त्यांना खूप वाईट वाटेल, आपल्या मुलाने विश्वासाला तडा दिला हे कळल्यावर त्यांना मनस्वी दु:ख होईल या कल्पनेने मोहनच्या अंगावर भीतीने काटा उभा राहिला.

मोहनजवळ एकच मार्ग शिल्लक होता. आपली चूक कबूल करणे, अपराध केल्याची कबुली देणे व पुन्हा तशी गोष्ट न करणे.

मोहनने एक कागद घेतला. ''बाबा, मी फार अपराधी आहे. मी सोन्याच्या कड्याचा तुकडा कापून विकला. माझ्या हातून फार मोठी चूक झाली आहे. मला क्षमा करा. झालेल्या अपराधाबद्दल मला शिक्ष द्या. यापुढे माझ्या हातून अशी चूक कधीही होणार नाही अशी मी प्रतिज्ञा करतो.'' कबुलीजबाब लिहून काढला.

५७

मोहनने भीतभीतच त्यांच्या खोलीत प्रवेश केला. वडील आजारी होते. त्यांना वेदना होत होत्या. ते अंथरुणात पडून होते. थरथरत्या हाताने तो कागद मोहनने त्यांच्या हाती दिला व खाली मान घालून एका बाजूला उभा राहिला. वडिलांनी तो मजकूर वाचला. मुलाचा कबुलीजबाब वाचून त्यांच्या मनाला धक्का बसला. हा धक्का आजारपणाच्या वेदनेपेक्षाही जास्त होता. मोहन थरथर कापत होता. वडिलांनी पाणावलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले. मोहन रडत-रडत त्यांच्या पायाजवळ जाऊन बसला. आता जे काय होईल ते सहन करण्यासाठी त्याने मन घट्ट केले. आपण गुन्हेगार आहोत. लाज वाटावी असे काम करून बसलो आहोत. या जाणिवेने त्याचे मन दु:खाने बेचैन झाले.



वडील संतापाने भडकले नाहीत, कडक शब्दात त्याची कानउघाडणी केली नाही. मात्र त्यांच्या चेहऱ्यावर दु:ख होते. डोळ्यांत आसवे होती. क्षणभर त्यांनी डोळे मिटून घेतले. कसलातरी विचार केला. त्यांनी त्या कागदाचे फाडून तुकडे तुकडे करून टाकले. मोहन हे सर्व डबडबलेल्या डोळ्यांनी पहात होता. दोघांनाही रडू आवरेना. वडिलांनी त्याला छातीशी कवटाळले. वडिलांच्या प्रेमाश्रूंनी मोहनचे अंत:करण धुऊन निघाले.

---

**शब्दार्थ :**

**उसनवारी –** उधारी. **बेत –** योजना. **हिंमत –** धैर्य. **मनस्वी –** मनापासून. **अपराध –** गुन्हा. **कबुली –** होकार, मान्यता. **मनस्ताप –** मनाला होणारा त्रास. **पत्ता नसणे –** माहीत नसणे. **जीव असणे –** माया असणे.



मोहनने भीतभीतच त्यांच्या खोलीत प्रवेश केला. वडील आजारी होते. त्यांना वेदना होत होत्या. ते अंथरुणात पडून होते. थरथरत्या हाताने तो कागद मोहनने त्यांच्या हाती दिला व खाली मान घालून एका बाजूला उभा राहिला. वडिलांनी तो मजकूर वाचला. मुलाचा कबुलीजबाब वाचून त्यांच्या मनाला धक्का बसला. हा धक्का आजारपणाच्या वेदनेपेक्षाही जास्त होता. मोहन थरथर कापत होता. वडिलांनी पाणावलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले. मोहन रडत-रडत त्यांच्या पायाजवळ जाऊन बसला. आता जे काय होईल ते सहन करण्यासाठी त्याने मन घट्ट केले. आपण गुन्हेगार आहोत. लाज वाटावी असे काम करून बसलो आहोत. या जाणिवेने त्याचे मन दु:खाने बेचैन झाले.



वडील संतापाने भडकले नाहीत, कडक शब्दात त्याची कानउघाडणी केली नाही. मात्र त्यांच्या चेहऱ्यावर दु:ख होते. डोळ्यांत आसवे होती. क्षणभर त्यांनी डोळे मिटून घेतले. कसलातरी विचार केला. त्यांनी त्या कागदाचे फाडून तुकडे तुकडे करून टाकले. मोहन हे सर्व डबडबलेल्या डोळ्यांनी पहात होता. दोघांनाही रडू आवरेना. वडिलांनी त्याला छातीशी कवटाळले. वडिलांच्या प्रेमाश्रूंनी मोहनचे अंत:करण धुऊन निघाले.

---

**शब्दार्थ :**

**उसनवारी –** उधारी. **बेत –** योजना. **हिंमत –** धैर्य. **मनस्वी –** मनापासून. **अपराध –** गुन्हा. **कबुली –** होकार, मान्यता. **मनस्ताप –** मनाला होणारा त्रास. **पत्ता नसणे –** माहीत नसणे. **जीव असणे –** माया असणे.

५८

**वाक्प्रचार :**

**मन खाऊ लागणे –** मन अस्वस्थ होणे. **कानावर हात ठेवणे –** माहीत नसल्याचे भासवणे. **चैन न पडणे –** करमेनासे होणे. **अंगावर काटा उभा राहणे –** खूप घाबरणे. **कान उघाडणी करणे –** बजावून सांगणे. **मन घट्ट करणे –** मनाची तयारी करणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. रात्री आईच्या ध्यानात कोणती गोष्ट आली?
२. मोहनच्या आईचे मन केव्हा हळहळले?
३. मोहनने आपली चूक कशा प्रकारे कबूल केली?

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. उसनवारीचे पैसे परत करण्यासाठी मोहन व त्याच्या भावाने कोणती योजना आखली?
२. मोहन बेचैन का झाला होता?
३. आईने मोहनला कोणता सल्ला दिला?
४. मोहनला वडिलांसमोर जाण्याची हिंमत का होत नव्हती?
५. मोहनच्या अंगावर काटा केव्हा उभा राहिला?
६. वडिलांकडे दिलेल्या कागदावर मोहनने काय लिहिले होते?
७. मुलाचा कबुलीजबाब वाचून वडिलांनी काय केले?

**व्यवसाय :**

अ) **'पवित्र'** या शब्दामागे **'अ'** हे अक्षर लावल्याने **'अपवित्र'** हा विरुद्ध अर्थाचा शब्द तयार होतो. यांप्रमाणे खालील शब्दांच्या मागे **'अ'** हे अक्षर लावून विरुद्धार्थी शब्द तयार करा.

| | |
|---|---|
| नियमित | निश्चित |
| पूर्ण | संभव |
| मर्यादित | परिचित |

**ब) खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करून अर्थपर्ण वाक्ये बनवा.**

पात्र, स्वच्छ, वेदना, पहिला, चैन, सल्ला.



**वाक्प्रचार :**

**मन खाऊ लागणे –** मन अस्वस्थ होणे. **कानावर हात ठेवणे –** माहीत नसल्याचे भासवणे. **चैन न पडणे –** करमेनासे होणे. **अंगावर काटा उभा राहणे –** खूप घाबरणे. **कान उघाडणी करणे –** बजावून सांगणे. **मन घट्ट करणे –** मनाची तयारी करणे.

**प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. रात्री आईच्या ध्यानात कोणती गोष्ट आली?
२. मोहनच्या आईचे मन केव्हा हळहळले?
३. मोहनने आपली चूक कशा प्रकारे कबूल केली?

**२) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. उसनवारीचे पैसे परत करण्यासाठी मोहन व त्याच्या भावाने कोणती योजना आखली?
२. मोहन बेचैन का झाला होता?
३. आईने मोहनला कोणता सल्ला दिला?
४. मोहनला वडिलांसमोर जाण्याची हिंमत का होत नव्हती?
५. मोहनच्या अंगावर काटा केव्हा उभा राहिला?
६. वडिलांकडे दिलेल्या कागदावर मोहनने काय लिहिले होते?
७. मुलाचा कबुलीजबाब वाचून वडिलांनी काय केले?

**व्यवसाय :**

अ) **'पवित्र'** या शब्दामागे **'अ'** हे अक्षर लावल्याने **'अपवित्र'** हा विरुद्ध अर्थाचा शब्द तयार होतो. यांप्रमाणे खालील शब्दांच्या मागे **'अ'** हे अक्षर लावून विरुद्धार्थी शब्द तयार करा.

| | |
|---|---|
| नियमित | निश्चित |
| पूर्ण | संभव |
| मर्यादित | परिचित |

**ब) खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करून अर्थपर्ण वाक्ये बनवा.**

पात्र, स्वच्छ, वेदना, पहिला, चैन, सल्ला.

५९

**क) खाली दिलेल्या वाक्ये वाचा. वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसात दिलेला योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(स्वत:, अंत:करण, दु:ख, मन:पूर्वक, अध:पात)

१. वीणाने शिक्षकांचे मनापासून आभार मानले.

२. घरातील सर्व कामे रमेश आपणच करीत असे.

३. जॉनच्या अपघाताची बातमी ऐकून माझे मन कळवळले.

४. ज्या देशातील लोकांमध्ये एकी नसते त्या देशाचा नाश होतो.

५. आईवडिलांना खेद होईल असे कोणतेही काम मुलांनी करू नये.

**उपक्रम :**

पाच नेत्यांची चित्रे गोळा करून वहीत चिकटवा व त्यांची नावे लिहा.

◆◆◆



**क) खाली दिलेल्या वाक्ये वाचा. वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसात दिलेला योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(स्वत:, अंत:करण, दु:ख, मन:पूर्वक, अध:पात)

१. वीणाने शिक्षकांचे मनापासून आभार मानले.

२. घरातील सर्व कामे रमेश आपणच करीत असे.

३. जॉनच्या अपघाताची बातमी ऐकून माझे मन कळवळले.

४. ज्या देशातील लोकांमध्ये एकी नसते त्या देशाचा नाश होतो.

५. आईवडिलांना खेद होईल असे कोणतेही काम मुलांनी करू नये.

**उपक्रम :**

पाच नेत्यांची चित्रे गोळा करून वहीत चिकटवा व त्यांची नावे लिहा.

◆◆◆

# १९. खो - खो सामना



ग्रामपंचायतीच्या मैदानावर आज गर्दी दिसत होती. आदर्श विद्यालय व स्वस्तिक विद्यालय या दोन संघात खो-खोचा अंतिम सामना होणार होता. दोन्ही संघ तुल्यबळ होते. कोणता संघ जिंकेल हे नक्की सांगणे कठीण होते.

सामन्याची वेळ झाली. पंच क्रीडांगणात आले. नाणेफेक केली. आदर्श विद्यालयाच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकली. त्याने पाठलाग करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे आठ खेळाडू मधल्या पाटीवर ठराविक ठिकाणी उलट सुलट दिशेला तोंड करून बसले. नकूळ पाठलाग करण्यासाठी खांबाजवळ उभा राहिला. स्वस्तिक विद्यालयाचे तीन खेळाडू पळण्यासाठी क्रीडांगणात आले.

पंचांनी शिटी वाजवली. नकूळने पाठलाग करायला सुरुवात केली. नारायणचा पाठलाग सुरू झाला. नारायण हा स्वस्तिक विद्यालयाच पटाईत खेळडू. तो फार धावत नसे, पण पाठलाग करणाऱ्याला सहज चकवत असे. मधली पाटी ओलांडून तो नकूळच्या विरुद्ध दिशेला



# १९. खो - खो सामना



ग्रामपंचायतीच्या मैदानावर आज गर्दी दिसत होती. आदर्श विद्यालय व स्वस्तिक विद्यालय या दोन संघात खो-खोचा अंतिम सामना होणार होता. दोन्ही संघ तुल्यबळ होते. कोणता संघ जिंकेल हे नक्की सांगणे कठीण होते.

सामन्याची वेळ झाली. पंच क्रीडांगणात आले. नाणेफेक केली. आदर्श विद्यालयाच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकली. त्याने पाठलाग करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे आठ खेळाडू मधल्या पाटीवर ठराविक ठिकाणी उलट सुलट दिशेला तोंड करून बसले. नकूळ पाठलाग करण्यासाठी खांबाजवळ उभा राहिला. स्वस्तिक विद्यालयाचे तीन खेळाडू पळण्यासाठी क्रीडांगणात आले.

पंचांनी शिटी वाजवली. नकूळने पाठलाग करायला सुरुवात केली. नारायणचा पाठलाग सुरू झाला. नारायण हा स्वस्तिक विद्यालयाच पटाईत खेळडू. तो फार धावत नसे, पण पाठलाग करणाऱ्याला सहज चकवत असे. मधली पाटी ओलांडून तो नकूळच्या विरुद्ध दिशेला

६१

गेला. नकूळला खो देणे भाग पडले. नारायण आता कासिमसमोर होता. नकूळने कासिमला खो दिला. कासिमने नारायणच्या दिशेने धाव घेतली. पण नारायणने हुलकावणी दिली व विरुद्ध दिशेला सरकला. कासिमला त्यांच्याच दिशेने पुढे जाऊन खो द्यावा लागला.

''शाबास नारायण.'' गर्दीतून आवाज आला.

आदर्श विद्यालयाच्या संघाला कसेही करून नारायणला बाद करावयाचे होते. त्यासाठी त्याला दमवणे गरजेचे होते. तो बाद झाल्यावर इतरांना बाद करणे फारसे कठीण नव्हते. त्यंनी नारायणचा जोरदार पाठलाग सुरू केला. भराभर खो देत राहिले. नारायणला उसंत म्हणून दिली नाही. शेवटी नारायण दमला व केशवने त्याला बाद केले. उरलेले दोन खेळाडू थोड्याच वेळात बाद झाले. तीन खेळाडूंचा दुसरा गट क्रीडांगणात आला.

''बाळू खांबाजवळ जाऊ नकोस, कासिमपासून दूर रहा.'' प्रेक्षकातून सूचना येत होत्या.

प्रेक्षकांच्या प्रोत्साहनाने आदर्श विद्यालयाच्या संघाचा उत्साह वाढला होता. त्यांना जास्तीत जास्त गुण मिळवावयाचे होते. त्यांनी पाठलाग करण्यात कसूर केला नाही. त्यांनी बाळूलाही बाद केले. पहिल्या डावाची वेळ संपली. आदर्श विद्यालयाला चार गुण मिळाले.

स्वस्तिक विद्यालयाचा संघ पाठलाग करण्यासाठी बसला. खेळ सुरू झाला. नकूळचा पाठलाग सुरू झाला. नकूळ हा चपळ खेळाडू पण पळता पळता तो खांबापलीकडे गेला. बाबू त्याच्या पाठलागावर होता.

''पकड, पकड!'' कोणीतरी जोराने ओरडला. बाबू वेगाने धावला. नकूळ वळण्यापूर्वीच त्याने त्याला बाद केले.

नकूळ लवकर बाद झाल्यामुळे स्वस्तिक विद्यालयाच्या संघाचा विश्वास वाढला. खेळाचा वेग वाढला. प्रेक्षकांच्या टाळ्या शिट्यांनी मैदान दणाणून गेले. पण स्वस्तिक विद्यालयाला प्रयासाने आणखी दोन गुण मिळविण्यात यश आले.

दुसऱ्या डावात नारायण अतिशय काळजीपूर्वक खेळला. तो नाबाद राहिला. त्यामुळे आदर्श विद्यालयाच्या गुणात आणखी भर पडू शकली नाही.

आता शेवटचा डाव सुरू झाला. जिंकण्यासाठी स्वस्तिक विद्यालयाला फक्त दोन गुणांची गरज होती. आदर्श विद्यालयाचे खेळाडू पळू लागले. स्वस्तिक विद्यालयाचे खेळाडू त्यांचा पाठलाग करू लागले. नकूळचा पाठलाग सुरू केला. नकूळही जिद्दीने खेळू लागला. तो कसाच दाद देईना. मागच्या डावातील चूक परत होणार नाही याची काळजी घेऊन तो खेळत होता. त्याचा खेळ पाहून प्रेक्षक त्याला प्रोत्साहन देत होते.



गेला. नकूळला खो देणे भाग पडले. नारायण आता कासिमसमोर होता. नकूळने कासिमला खो दिला. कासिमने नारायणच्या दिशेने धाव घेतली. पण नारायणने हुलकावणी दिली व विरुद्ध दिशेला सरकला. कासिमला त्यांच्याच दिशेने पुढे जाऊन खो द्यावा लागला.

''शाबास नारायण.'' गर्दीतून आवाज आला.

आदर्श विद्यालयाच्या संघाला कसेही करून नारायणला बाद करावयाचे होते. त्यासाठी त्याला दमवणे गरजेचे होते. तो बाद झाल्यावर इतरांना बाद करणे फारसे कठीण नव्हते. त्यंनी नारायणचा जोरदार पाठलाग सुरू केला. भराभर खो देत राहिले. नारायणला उसंत म्हणून दिली नाही. शेवटी नारायण दमला व केशवने त्याला बाद केले. उरलेले दोन खेळाडू थोड्याच वेळात बाद झाले. तीन खेळाडूंचा दुसरा गट क्रीडांगणात आला.

''बाळू खांबाजवळ जाऊ नकोस, कासिमपासून दूर रहा.'' प्रेक्षकातून सूचना येत होत्या.

प्रेक्षकांच्या प्रोत्साहनाने आदर्श विद्यालयाच्या संघाचा उत्साह वाढला होता. त्यांना जास्तीत जास्त गुण मिळवावयाचे होते. त्यांनी पाठलाग करण्यात कसूर केला नाही. त्यांनी बाळूलाही बाद केले. पहिल्या डावाची वेळ संपली. आदर्श विद्यालयाला चार गुण मिळाले.

स्वस्तिक विद्यालयाचा संघ पाठलाग करण्यासाठी बसला. खेळ सुरू झाला. नकूळचा पाठलाग सुरू झाला. नकूळ हा चपळ खेळाडू पण पळता पळता तो खांबापलीकडे गेला. बाबू त्याच्या पाठलागावर होता.

''पकड, पकड!'' कोणीतरी जोराने ओरडला. बाबू वेगाने धावला. नकूळ वळण्यापूर्वीच त्याने त्याला बाद केले.

नकूळ लवकर बाद झाल्यामुळे स्वस्तिक विद्यालयाच्या संघाचा विश्वास वाढला. खेळाचा वेग वाढला. प्रेक्षकांच्या टाळ्या शिट्यांनी मैदान दणाणून गेले. पण स्वस्तिक विद्यालयाला प्रयासाने आणखी दोन गुण मिळविण्यात यश आले.

दुसऱ्या डावात नारायण अतिशय काळजीपूर्वक खेळला. तो नाबाद राहिला. त्यामुळे आदर्श विद्यालयाच्या गुणात आणखी भर पडू शकली नाही.

आता शेवटचा डाव सुरू झाला. जिंकण्यासाठी स्वस्तिक विद्यालयाला फक्त दोन गुणांची गरज होती. आदर्श विद्यालयाचे खेळाडू पळू लागले. स्वस्तिक विद्यालयाचे खेळाडू त्यांचा पाठलाग करू लागले. नकूळचा पाठलाग सुरू केला. नकूळही जिद्दीने खेळू लागला. तो कसाच दाद देईना. मागच्या डावातील चूक परत होणार नाही याची काळजी घेऊन तो खेळत होता. त्याचा खेळ पाहून प्रेक्षक त्याला प्रोत्साहन देत होते.

६२

''शाबास नकूळ, आणखी थोडा वेळ.'' प्रेक्षकातून आवाज आला.

सतत धावल्यामुळे नकूळ थकला आणि तो बाद झाला. दोन्ही संघांचे गुण समान झाले. आता फक्त एक गुण मिळवला की झाले. स्वस्तिक विद्यालयाच्या संघाने आणखी जोरदार पाठलाग करायला सुरुवात केली, पण वेळ संपत आलेली होती. आता सामना बरोबरीत सुटणार असे सर्वांना वाटू लागले. इतक्यात नारायणला खो मिळाला. झटक्यात जागेवरूनच त्याने केशवच्या दिशेने झेप घेतली. केशव बाद झाला. स्वस्तिक विद्यालयाचा संघ विजयी झाला. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांचे अभिनंदन केले. प्रेक्षकही चांगला खेळ पहायला मिळाला म्हणून खूश झाले.

---

**शब्दार्थ :**

**अंतिम** – शेवटचा. **तुल्यबळ** – समान शक्तीचे. **कर्णधार** – संघाचा प्रमुख. **पटाईत** – कुशल. **उसंत** – विश्रांती. **हुलकावणी देणे** – चकवणे. **प्रोत्साहन** – उत्तेजन.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. अंतिम सामना कोणकोणत्या संघात होणार होता?
२. कोणता संघ जिंकेल हे सांगणे कठीण का होते?
३. नाणेफेक कोणी जिंकली?
४. नकूळ खांबाजवळ कशासाठी उभा राहिला होता?
५. कासिम नारायणला बाद का करू शकला नाही?
६. स्वस्तिक विद्यालयाच्या संघाचा विश्वास का वाढला?
७. नारायण दुसऱ्या डावात का बाद होऊ शकला नाही?
८. प्रेक्षक खूश का झाले?



''शाबास नकूळ, आणखी थोडा वेळ.'' प्रेक्षकातून आवाज आला.

सतत धावल्यामुळे नकूळ थकला आणि तो बाद झाला. दोन्ही संघांचे गुण समान झाले. आता फक्त एक गुण मिळवला की झाले. स्वस्तिक विद्यालयाच्या संघाने आणखी जोरदार पाठलाग करायला सुरुवात केली, पण वेळ संपत आलेली होती. आता सामना बरोबरीत सुटणार असे सर्वांना वाटू लागले. इतक्यात नारायणला खो मिळाला. झटक्यात जागेवरूनच त्याने केशवच्या दिशेने झेप घेतली. केशव बाद झाला. स्वस्तिक विद्यालयाचा संघ विजयी झाला. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी एकमेकांचे अभिनंदन केले. प्रेक्षकही चांगला खेळ पहायला मिळाला म्हणून खूश झाले.

**शब्दार्थ :**

**अंतिम** – शेवटचा. **तुल्यबळ** – समान शक्तीचे. **कर्णधार** – संघाचा प्रमुख. **पटाईत** – कुशल. **उसंत** – विश्रांती. **हुलकावणी देणे** – चकवणे. **प्रोत्साहन** – उत्तेजन.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. अंतिम सामना कोणकोणत्या संघात होणार होता?
२. कोणता संघ जिंकेल हे सांगणे कठीण का होते?
३. नाणेफेक कोणी जिंकली?
४. नकूळ खांबाजवळ कशासाठी उभा राहिला होता?
५. कासिम नारायणला बाद का करू शकला नाही?
६. स्वस्तिक विद्यालयाच्या संघाचा विश्वास का वाढला?
७. नारायण दुसऱ्या डावात का बाद होऊ शकला नाही?
८. प्रेक्षक खूश का झाले?

६३

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. आदर्श विद्यालयाच्या संघाने नारायणचाच पाठलाग करायचे का ठरवले?

२. प्रेक्षकांनी नकूळला शाबासकी का दिली?

३. सामना बरोबरीत सुटणार असे सर्वांना का वाटले?

**व्यवसाय :**

दोन संघात खेळल्या जाणाऱ्या इतर खेळांची नावे लिहा.

**उपक्रम :**

निरनिराळ्या खेळांची चित्र गोळा करून त्यांची माहिती लिहा.

◆◆◆



**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. आदर्श विद्यालयाच्या संघाने नारायणचाच पाठलाग करायचे का ठरवले?

२. प्रेक्षकांनी नकूळला शाबासकी का दिली?

३. सामना बरोबरीत सुटणार असे सर्वांना का वाटले?

**व्यवसाय :**

दोन संघात खेळल्या जाणाऱ्या इतर खेळांची नावे लिहा.

**उपक्रम :**

निरनिराळ्या खेळांची चित्र गोळा करून त्यांची माहिती लिहा.

◆◆◆

६४

# २०. मनोगत

या, या मुलांनो. आज मुद्दाम माझी भेट घ्यायला आलात. खूप आनंद झाला. तसं पाहिलं तर इथं दररोज हजारो लोक येतात, पण प्रत्येकजण आपल्याच घाईत. कुणी प्रवासाला जायच्या गडबडीत, तर कुणी प्रवासातून आल्यावर घरी पोचण्याच्या गडबडीत. मग माझ्याशी बोलायला वेळ आहे कुणाला? मी आज खूप खूप गप्पा मारणार आहे तुमच्याशी.

ऐका, हा आवाज ओळखलांत? अगदी बरोबर. हा आवाजा आहे त्या येणाऱ्या आगगाडीचा. जरा बाजूलाच उभे राहा हं. त्या बाईसाहेब आल्या की माझ्या ह्या फलाटावर ही जत्रा भरेल बघा.

ते बघा, त्या गेटपाशी कोण येऊन उभे राहिले ते. हां, हां, तेच ते. पांढरी पँट, काळा कोट, टाय आणि डोक्यावर हॅट, किती रुबाबदार दिसतात नाही! तिकीट तपासनीस म्हणतात त्यांना. गाडीतून उतरणाऱ्या प्रवाशांची तिकीटं तपासून विनातिकिट प्रवाशांकडून दंडही वसूल करतात ते.

ही पाहा आलीच गाडी धडधड करीत. बघा, बघा कशी धांदल उडाली आहे सगळ्यांची. तो बघा एक प्रवासी. किती सामान आहे त्यांच्याकडं. पण त्याला चिंता करण्यचं कारणच नाही. ते पाहा आलेच दोन-तीन लाल डगलेवाले. 'कुली' म्हणतात त्यांना. त्यांच्या त्या रंगीत कपड्यामुळं माझ्या फलाटाची मात्र शोभा वाढली आहे. बघा, एकेकटा कुली किती सामान नेतो वाहून.

ते बघा, प्रत्येक डब्यापाशी हातगाडीवाले. काय ओरडतात ऐकलंत? चायऽ गरम चाऽय वडाऽ चायऽ! गाडी फलाटाला लागली रे लागली की हे लोक आलेच फळे, थंड पेये, चहा, खाद्य पदार्थ इत्यादी घेऊन प्रवाशांच्या सेवेसाठी.

इतका वेळ वाट पाहात बसलेले ह्या गाडीने जाणारे प्रवासी आता डब्यात चढतील आणि निघून जातील. मग मला मात्र खूप सुनं सुनं वाटेल. पण मला आता सवयच झाली आहे ह्या सगळ्याची. हा ऐका घंटेचा आवाज. गाडी सुटायची वेळ झाली. तो पाहा गाडीच्या एका टोकाला एक मनुष्य हातातील हिरवा बावटा हालवीत आहे. ऐका ही गाडीची शिटी. गाडी निघालीसुद्धा.

आता मी तुम्हाला सावकाश फिरवून आणते हं. ही बघा लोकांची रांग. ही रांग आहे तिकीट खरेदी करणाऱ्यांची, तर ती तिकडे दुसरी आहे ना ती आहे आरक्षण करणाऱ्यांची. दूरच्या प्रवासाला जाणारे लोक आपली तिकीटे अगोदरच काही दिवस आरक्षण करून ठेवतात.




# २०. मनोगत

या, या मुलांनो. आज मुद्दाम माझी भेट घ्यायला आलात. खूप आनंद झाला. तसं पाहिलं तर इथं दररोज हजारो लोक येतात, पण प्रत्येकजण आपल्याच घाईत. कुणी प्रवासाला जायच्या गडबडीत, तर कुणी प्रवासातून आल्यावर घरी पोचण्याच्या गडबडीत. मग माझ्याशी बोलायला वेळ आहे कुणाला? मी आज खूप खूप गप्पा मारणार आहे तुमच्याशी.

ऐका, हा आवाज ओळखलांत? अगदी बरोबर. हा आवाजा आहे त्या येणाऱ्या आगगाडीचा. जरा बाजूलाच उभे राहा हं. त्या बाईसाहेब आल्या की माझ्या ह्या फलाटावर ही जत्रा भरेल बघा.

ते बघा, त्या गेटपाशी कोण येऊन उभे राहिले ते. हां, हां, तेच ते. पांढरी पँट, काळा कोट, टाय आणि डोक्यावर हॅट, किती रुबाबदार दिसतात नाही! तिकीट तपासनीस म्हणतात त्यांना. गाडीतून उतरणाऱ्या प्रवाशांची तिकीटं तपासून विनातिकिट प्रवाशांकडून दंडही वसूल करतात ते.

ही पाहा आलीच गाडी धडधड करीत. बघा, बघा कशी धांदल उडाली आहे सगळ्यांची. तो बघा एक प्रवासी. किती सामान आहे त्यांच्याकडं. पण त्याला चिंता करण्यचं कारणच नाही. ते पाहा आलेच दोन-तीन लाल डगलेवाले. 'कुली' म्हणतात त्यांना. त्यांच्या त्या रंगीत कपड्यामुळं माझ्या फलाटाची मात्र शोभा वाढली आहे. बघा, एकेकटा कुली किती सामान नेतो वाहून.

ते बघा, प्रत्येक डब्यापाशी हातगाडीवाले. काय ओरडतात ऐकलंत? चायऽ गरम चाऽय वडाऽ चायऽ! गाडी फलाटाला लागली रे लागली की हे लोक आलेच फळे, थंड पेये, चहा, खाद्य पदार्थ इत्यादी घेऊन प्रवाशांच्या सेवेसाठी.

इतका वेळ वाट पाहात बसलेले ह्या गाडीने जाणारे प्रवासी आता डब्यात चढतील आणि निघून जातील. मग मला मात्र खूप सुनं सुनं वाटेल. पण मला आता सवयच झाली आहे ह्या सगळ्याची. हा ऐका घंटेचा आवाज. गाडी सुटायची वेळ झाली. तो पाहा गाडीच्या एका टोकाला एक मनुष्य हातातील हिरवा बावटा हालवीत आहे. ऐका ही गाडीची शिटी. गाडी निघालीसुद्धा.

आता मी तुम्हाला सावकाश फिरवून आणते हं. ही बघा लोकांची रांग. ही रांग आहे तिकीट खरेदी करणाऱ्यांची, तर ती तिकडे दुसरी आहे ना ती आहे आरक्षण करणाऱ्यांची. दूरच्या प्रवासाला जाणारे लोक आपली तिकीटे अगोदरच काही दिवस आरक्षण करून ठेवतात.

६५


ह्या फलकावर बघा गाड्यांची वेळापत्रके व निरनिराळ्या गाड्यांसंबंधी माहिती दिलेली आहे.

आता आपण आत फलाटावर जाऊ या. हे बघा काही लोक एका काचेच्या फलकावर लावलेली काही माहिती वाचत आहेत. ज्या प्रवाशांनी आरक्षण केलेलं असतं, त्यांची नावे, डबा क्रमांक, आसन क्रमांक इत्यादी माहिती ह्या फलकावर गाडी येण्यापूर्वी काही वेळ लावली जाते.

चला आता पुढच्या बाजूला. ही खोली आहे ना ती प्रवाशांचे सामान सुरक्षित ठेवण्याची. प्रवासी आपलं सामान इथं ठेवतात व त्याबद्दलची पावती घेतात. ह्या बाजूला ही आहे प्रवाशांकरिता विश्रांतीची खोली. जे प्रवासी गाडीसाठी फार वेळ वाट पाहत थांबतात, त्यांच्यासाठी ही सोय आहे. प्रथम वर्गाच्या प्रवाशांसाठीही एक स्वतंत्र खोली आहे.

चला, आता त्या पुस्तकाच्या दुकानावर. ह्या ठिकाणी प्रवासी वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं वगैरे वाचन साहित्य खरेदी करतात. प्रवासात त्यांना वाचनासाठी उपयोगी पडतं हे साहित्य.

आता बघा, लोकांची हालचाल सुरू झाली. तो एक फलक पहा. त्याला 'इंडिकेटर' म्हणतात. आत येणाऱ्या गाडीची सूचना त्यावर दाखविली जाते. थोड्या वेळात गाडी येईल. पुन्हा तीच धावपळ, तीच गडबड.







ह्या फलकावर बघा गाड्यांची वेळापत्रके व निरनिराळ्या गाड्यांसंबंधी माहिती दिलेली आहे.

आता आपण आत फलाटावर जाऊ या. हे बघा काही लोक एका काचेच्या फलकावर लावलेली काही माहिती वाचत आहेत. ज्या प्रवाशांनी आरक्षण केलेलं असतं, त्यांची नावे, डबा क्रमांक, आसन क्रमांक इत्यादी माहिती ह्या फलकावर गाडी येण्यापूर्वी काही वेळ लावली जाते.

चला आता पुढच्या बाजूला. ही खोली आहे ना ती प्रवाशांचे सामान सुरक्षित ठेवण्याची. प्रवासी आपलं सामान इथं ठेवतात व त्याबद्दलची पावती घेतात. ह्या बाजूला ही आहे प्रवाशांकरिता विश्रांतीची खोली. जे प्रवासी गाडीसाठी फार वेळ वाट पाहत थांबतात, त्यांच्यासाठी ही सोय आहे. प्रथम वर्गाच्या प्रवाशांसाठीही एक स्वतंत्र खोली आहे.

चला, आता त्या पुस्तकाच्या दुकानावर. ह्या ठिकाणी प्रवासी वर्तमानपत्रं, मासिकं, पुस्तकं वगैरे वाचन साहित्य खरेदी करतात. प्रवासात त्यांना वाचनासाठी उपयोगी पडतं हे साहित्य.

आता बघा, लोकांची हालचाल सुरू झाली. तो एक फलक पहा. त्याला 'इंडिकेटर' म्हणतात. आत येणाऱ्या गाडीची सूचना त्यावर दाखविली जाते. थोड्या वेळात गाडी येईल. पुन्हा तीच धावपळ, तीच गडबड.



**प्रश्न :**

१. हे मनोगत कुणाचे आहे.
२. लाल डगलेवाले कुली कोणते काम करतात?
३. हातगाडीवाले प्रवाशांची सेवा कशी करतात?
४. प्रवाशांच्या सोईसाठी कोणकोणत्या गोष्टी असतात?

**व्यवसाय :**

**एखाद्या शब्दामागे 'विना' हा शब्द जोडल्यावर 'शिवाय' अर्थ होतो. जसे – तिकिट – विनातिकीट. ह्याप्रमाणे खालील शब्द बनवा.**

(१) कारण (२) सायास (३) खर्च

**उपक्रम :**

एखाद्या बस स्टेशनवर तुम्ही गेला असालच. त्या ठिकाणी प्रवाशांच्या सोईसाठी कोणोणत्या गोष्टी आहेत याची यादी तयार करा.

◆◆◆



**प्रश्न :**

१. हे मनोगत कुणाचे आहे.
२. लाल डगलेवाले कुली कोणते काम करतात?
३. हातगाडीवाले प्रवाशांची सेवा कशी करतात?
४. प्रवाशांच्या सोईसाठी कोणकोणत्या गोष्टी असतात?

**व्यवसाय :**

**एखाद्या शब्दामागे 'विना' हा शब्द जोडल्यावर 'शिवाय' अर्थ होतो. जसे – तिकिट – विनातिकीट. ह्याप्रमाणे खालील शब्द बनवा.**

(१) कारण (२) सायास (३) खर्च

**उपक्रम :**

एखाद्या बस स्टेशनवर तुम्ही गेला असालच. त्या ठिकाणी प्रवाशांच्या सोईसाठी कोणोणत्या गोष्टी आहेत याची यादी तयार करा.

◆◆◆

६७

# २१. ध्वज उंच धरू

ध्वज उंच धरू, ध्वज उंच धरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
सैनिक आम्ही या देशाचे,
सेवक आम्ही या देशाचे,
थोर आमच्या परंपरेला मनी स्मरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
या हातांनी शेते पिकवू,
या हातांनी झाडे उगवू,
घाम गाळुनी भूमी हिरवीगार करू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
हात आमुचे अश्रू पुसतिल,
न्यायासाठी निर्भय लढतिल,
प्रगतीचा हा प्रवास आता होय सुरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू

**– मंगेश पाडगांवकर**

**शब्दार्थ :**

**इवल्या** – छोट्या. **भूमी** – जमीन.

**प्रश्न :**

१. आम्ही ह्या देशाचे कोण आहोत?
२. आम्ही ही भूमी हिरवीगार कशी करणार आहोत?
३. आमचे हात देशासाठी काय करणार आहेत?
४. आम्ही मनांमध्ये कोणती गोष्ट स्मरणार आहोत?

◆◆◆



# २१. ध्वज उंच धरू

ध्वज उंच धरू, ध्वज उंच धरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
सैनिक आम्ही या देशाचे,
सेवक आम्ही या देशाचे,
थोर आमच्या परंपरेला मनी स्मरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
या हातांनी शेते पिकवू,
या हातांनी झाडे उगवू,
घाम गाळुनी भूमी हिरवीगार करू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू
हात आमुचे अश्रू पुसतिल,
न्यायासाठी निर्भय लढतिल,
प्रगतीचा हा प्रवास आता होय सुरू
इवल्या इवल्या हातांनी ध्वज उंच धरू

**– मंगेश पाडगांवकर**

**शब्दार्थ :**

**इवल्या** – छोट्या. **भूमी** – जमीन.

**प्रश्न :**

१. आम्ही ह्या देशाचे कोण आहोत?
२. आम्ही ही भूमी हिरवीगार कशी करणार आहोत?
३. आमचे हात देशासाठी काय करणार आहेत?
४. आम्ही मनांमध्ये कोणती गोष्ट स्मरणार आहोत?

◆◆◆

६८

# २२. महर्षी व्यास



यमुना नदीमध्ये एक बेट होते. वेली, झाडे, झुडपे यांनी ते भरलेले होते. तऱ्हेतऱ्हेने पक्षी तिथे किलबिलत होते. अशा ह्या सुंदर आणि शांत बेटावर व्यासांचा जन्म झाला. व्यासांच्या जन्मानंतर व्यासांचे पिता पराशरमुनी तपश्चर्या करण्यासाठी निघून गेले. व्यासांची आई सत्यवती व्यासांसह या बेटावर राहू लागली.

व्यास लहानपणापासूनच शांत व अभ्यासू होते. ते नेहमी ज्ञानसाधनेत रमत असत. आपला वेळ इतर कामात वाया दवडत नसत. आपली अभ्यासू वृत्ती त्यांनी कधीच सोडली नाही. व्यासांनी आपले ज्ञान उत्तम रितीने वाढविले. ते देशभर फिरले. अनेक ग्रंथांची त्यांनी रचना केली. अठरा पुराणे, अठरा उपपुराणे, भागवत, ब्रह्मसुत्रे यासारखे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले.

हे ग्रंथ लिहून झाल्यावर सर्व विषयांचे थोडक्यात ज्ञान देणारा एखादा ग्रंथ लिहावा अशी इच्छा व्यासांना झाली. आपल्या जीवनात प्रत्यक्ष पाहिलेल्या अनेक गोष्टींची त्यांनी जुळवाजुळव केली. शेवटी त्यांच्या मनात एका मोठ्या ग्रंथाची कथा तयार झाली. आता त्यांच्या मनात एक विचार आला. 'हा एवढा मोठा ग्रंथ लिहून कसा काढायचा?' कारण



# २२. महर्षी व्यास



यमुना नदीमध्ये एक बेट होते. वेली, झाडे, झुडपे यांनी ते भरलेले होते. तऱ्हेतऱ्हेने पक्षी तिथे किलबिलत होते. अशा ह्या सुंदर आणि शांत बेटावर व्यासांचा जन्म झाला. व्यासांच्या जन्मानंतर व्यासांचे पिता पराशरमुनी तपश्चर्या करण्यासाठी निघून गेले. व्यासांची आई सत्यवती व्यासांसह या बेटावर राहू लागली.

व्यास लहानपणापासूनच शांत व अभ्यासू होते. ते नेहमी ज्ञानसाधनेत रमत असत. आपला वेळ इतर कामात वाया दवडत नसत. आपली अभ्यासू वृत्ती त्यांनी कधीच सोडली नाही. व्यासांनी आपले ज्ञान उत्तम रितीने वाढविले. ते देशभर फिरले. अनेक ग्रंथांची त्यांनी रचना केली. अठरा पुराणे, अठरा उपपुराणे, भागवत, ब्रह्मसुत्रे यासारखे अनेक ग्रंथ त्यांनी लिहिले.

हे ग्रंथ लिहून झाल्यावर सर्व विषयांचे थोडक्यात ज्ञान देणारा एखादा ग्रंथ लिहावा अशी इच्छा व्यासांना झाली. आपल्या जीवनात प्रत्यक्ष पाहिलेल्या अनेक गोष्टींची त्यांनी जुळवाजुळव केली. शेवटी त्यांच्या मनात एका मोठ्या ग्रंथाची कथा तयार झाली. आता त्यांच्या मनात एक विचार आला. 'हा एवढा मोठा ग्रंथ लिहून कसा काढायचा?' कारण

६९

व्यासमुनी आता वृद्ध झाले होते. त्यांनी ब्रह्मदेवाला आपली अडचण सांगितली.

त्यानंतर काही दिवसांनी एकदा गणपती व्यासांकडे आले व म्हणाले, ''व्यासमुनी''! ब्रह्मदेवांच्या सूचनेवरून मी तुमच्याकडे आलो आहे. मी तुमच्या ग्रंथाचे लेखन करण्यास तयार आहे पण एका अटीवर.''

''कोणती अट?'' व्यासमुनींनी विचारले.

''आपण कथा सांगताना मध्ये एक क्षणही थांबता कामा नये. म्हणजे माझ्या लिखाणात खंड पडणार नाही.'' गणपतीनी आपली अट सांगितली. व्यासांनी अट मान्य केली पण व्यास म्हणाले, ''माझीही आपणाला एक विनंती आहे. जे काही लिहाल त्यातील प्रत्येक वाक्याचा अर्थ जाणून घेऊन तुम्ही ते लिहावे. अर्थ समजल्याशिवाय लेखन करू नये.''

व्यासांची विनंती गणपतीनीही मान्य केली.

लगेच गणपती लिहिण्यासाठी आसन ठोकून बसले. लेखणी हातात घेतली. व्यासमुनी कथा सांगू लागले. लेखन सुरू झाले. व्यासमुनी अधूनमधून गणपतीस गूढ अर्थ असलेले श्लोक सांगत असत. या श्लोकांचे अर्थ समजून घेण्याकरिता गणपतीला विचार करवा लागे. त्यामुळे लेखनकाम आपोआपच थांबत असे. इतक्या अवधीत व्यास मनात नव्या श्लोकांची जुळवाजुळव करीत असत.

महर्षी व्यासांनी सांगितलेले व गणतीनी लिहून घेतलेले श्लोकबद्ध महाकाव्य म्हणजेच 'महाभारत'. 'महाभारत' ग्रंथाची रचना करून व्यासमुनी अमर झाले.

---

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची प्रत्येकी एका शब्दत उत्तरे लिहा.**

१. व्यासमुनींच्या आईचे नाव काय होते?
२. व्यासमुनींच्या वडिलांचे नाव काय?
३. व्यासमुनी कोणता ग्रंथ रचून अमर झाले?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. व्यासमुनींनी कोणकोणते ग्रंथ लिहिले?
२. गणपतीनी व्यासांना कोणती अट घातली?
३. व्यासांनी गणपतीला कोणती विनंती केली?



व्यासमुनी आता वृद्ध झाले होते. त्यांनी ब्रह्मदेवाला आपली अडचण सांगितली.

त्यानंतर काही दिवसांनी एकदा गणपती व्यासांकडे आले व म्हणाले, ''व्यासमुनी''! ब्रह्मदेवांच्या सूचनेवरून मी तुमच्याकडे आलो आहे. मी तुमच्या ग्रंथाचे लेखन करण्यास तयार आहे पण एका अटीवर.''

''कोणती अट?'' व्यासमुनींनी विचारले.

''आपण कथा सांगताना मध्ये एक क्षणही थांबता कामा नये. म्हणजे माझ्या लिखाणात खंड पडणार नाही.'' गणपतीनी आपली अट सांगितली. व्यासांनी अट मान्य केली पण व्यास म्हणाले, ''माझीही आपणाला एक विनंती आहे. जे काही लिहाल त्यातील प्रत्येक वाक्याचा अर्थ जाणून घेऊन तुम्ही ते लिहावे. अर्थ समजल्याशिवाय लेखन करू नये.''

व्यासांची विनंती गणपतीनीही मान्य केली.

लगेच गणपती लिहिण्यासाठी आसन ठोकून बसले. लेखणी हातात घेतली. व्यासमुनी कथा सांगू लागले. लेखन सुरू झाले. व्यासमुनी अधूनमधून गणपतीस गूढ अर्थ असलेले श्लोक सांगत असत. या श्लोकांचे अर्थ समजून घेण्याकरिता गणपतीला विचार करवा लागे. त्यामुळे लेखनकाम आपोआपच थांबत असे. इतक्या अवधीत व्यास मनात नव्या श्लोकांची जुळवाजुळव करीत असत.

महर्षी व्यासांनी सांगितलेले व गणतीनी लिहून घेतलेले श्लोकबद्ध महाकाव्य म्हणजेच 'महाभारत'. 'महाभारत' ग्रंथाची रचना करून व्यासमुनी अमर झाले.

---

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची प्रत्येकी एका शब्दत उत्तरे लिहा.**

१. व्यासमुनींच्या आईचे नाव काय होते?
२. व्यासमुनींच्या वडिलांचे नाव काय?
३. व्यासमुनी कोणता ग्रंथ रचून अमर झाले?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. व्यासमुनींनी कोणकोणते ग्रंथ लिहिले?
२. गणपतीनी व्यासांना कोणती अट घातली?
३. व्यासांनी गणपतीला कोणती विनंती केली?

७०

**व्यवसाय :**

१) **खाली 'अ' गटात ग्रंथांची नावे दिली आहेत व 'ब' गटात त्यांच्या रचनाकारांची नावे दिली आहेत. ग्रंथ व ग्रंथरचनाकार त्यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

**जसे : महाभारत – महर्षी व्यास**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. रामायण | अ) लो. टिळक |
| २. दासबोध | ब) संत तुकाराम |
| ३. ज्ञानेश्वरी | क) महर्षी वाल्मिकी/वाल्मिकी मुनी |
| ४. गीतारहस्य | ड) समर्थ रामदास |
| | इ) संत ज्ञानेश्वर |

**२) एकलव्याची कथा मिळवून वर्गात वाचून दाखवा / सांगा.**

◆◆◆



**व्यवसाय :**

१) **खाली 'अ' गटात ग्रंथांची नावे दिली आहेत व 'ब' गटात त्यांच्या रचनाकारांची नावे दिली आहेत. ग्रंथ व ग्रंथरचनाकार त्यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

**जसे : महाभारत – महर्षी व्यास**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. रामायण | अ) लो. टिळक |
| २. दासबोध | ब) संत तुकाराम |
| ३. ज्ञानेश्वरी | क) महर्षी वाल्मिकी/वाल्मिकी मुनी |
| ४. गीतारहस्य | ड) समर्थ रामदास |
| | इ) संत ज्ञानेश्वर |

**२) एकलव्याची कथा मिळवून वर्गात वाचून दाखवा / सांगा.**


◆◆◆

७१

# २३. निसर्गाच्या सान्निध्यात

दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या शाळेची सहल निघणार होती. सकाळी आठ वाजता सगळी मुले शाळेच्या पटांगणात जमली. प्रत्येकजण आनंदात होता. सहलीची बस आली. शिक्षकांनी सगळ्यांना रांगेत उभे केले. मुले बसमध्ये चढली. सगळे शिक्षक-शिक्षिका बसमध्ये चढल्या. बस सुरू झाली. आम्ही जोरजोरात गाणी म्हणू लागलो.

आमची बस 'तांबडीसुर्ल' येथे येऊन पोहोचली. झाडी व वृक्षवेलींच्या कुशीत श्रीमहादेवाचे प्राचीन मंदिर दिसले.



या देवालयाची रचना इतर देवालयांहून बरीच वेगळी आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराच्या भिंतीवर अनेक मूर्ती कोरलेल्या आम्हाला दिसल्या. आम्ही सभामंडपात प्रवेश केला. देवालयात येण्यासाठी या मंडपाच्या तीन बाजूला पायऱ्या आहेत. मंडपामध्ये एक दगडी नंदी आहे. जवळच एक दगडी कासवही आहे. सभमंडपातून आम्ही गाभाऱ्यात गेला. तेथे शिवलिंग आहे. दगडावर नागांच्या व देवांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. छतावर अष्टदल रेखीव कमळ कोरलेले आहे. ते पाहून आम्हाला फारच नवल वाटले.


मंदिरातून बाहेर आल्यावर शिक्षकांनी आम्हाला मंदिराच्या बांधकामाबद्दल माहिती



# २३. निसर्गाच्या सान्निध्यात

दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या शाळेची सहल निघणार होती. सकाळी आठ वाजता सगळी मुले शाळेच्या पटांगणात जमली. प्रत्येकजण आनंदात होता. सहलीची बस आली. शिक्षकांनी सगळ्यांना रांगेत उभे केले. मुले बसमध्ये चढली. सगळे शिक्षक-शिक्षिका बसमध्ये चढल्या. बस सुरू झाली. आम्ही जोरजोरात गाणी म्हणू लागलो.

आमची बस 'तांबडीसुर्ल' येथे येऊन पोहोचली. झाडी व वृक्षवेलींच्या कुशीत श्रीमहादेवाचे प्राचीन मंदिर दिसले.



या देवालयाची रचना इतर देवालयांहून बरीच वेगळी आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराच्या भिंतीवर अनेक मूर्ती कोरलेल्या आम्हाला दिसल्या. आम्ही सभामंडपात प्रवेश केला. देवालयात येण्यासाठी या मंडपाच्या तीन बाजूला पायऱ्या आहेत. मंडपामध्ये एक दगडी नंदी आहे. जवळच एक दगडी कासवही आहे. सभमंडपातून आम्ही गाभाऱ्यात गेला. तेथे शिवलिंग आहे. दगडावर नागांच्या व देवांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. छतावर अष्टदल रेखीव कमळ कोरलेले आहे. ते पाहून आम्हाला फारच नवल वाटले.

मंदिरातून बाहेर आल्यावर शिक्षकांनी आम्हाला मंदिराच्या बांधकामाबद्दल माहिती

७२

सांगितली. ते म्हणाले, ''अकराव्या शतकाच्या सुमारास गोव्यात कदंब राजांची राजवट होती. कदंब राजांनीच हे मंदिर बांधून घेतले. या बांधकामात कुठेही चुना अगर सिमेंट यांचा वापर केलेला नाही. एकावर एक दगड रचूनच या देवालयाची रचना केली गेली आहे. या मंदिराचे छप्परही दगडी आहे. संपूर्ण मंदिराची बांधणी हेमाडपंती आहे.''

मंदिरापुढील खळखळ वाहणाऱ्या ओहोळात आम्ही हातपाय धुतले. शिक्षक व आम्ही सर्वांनी सहभोजन केले. जेवताना खूपच मजा आली. जेवणानंतर थोड्या वेळाने तिथून निघायची शिक्षकांनी सूचना केली. आम्हाला तेथून निघवेसेच वाटेना. नाईलाजाने बसमध्ये चढलो.

आता आमची बस साळावली धरणाकडे निघाली. हे धरण सांगे शहरापासून सुमारे चार कि. मी. अंतरावर आहे. साळावली धरणाजवळ बस पोहोचली. हा परिसर नयनरम्य आहे. दोन डोंगरामधून वाहणाऱ्या साळावली नदीवर हे धरण बांधले आहे. चालत चालत आम्ही बंधाऱ्यावर पोहोचलो. धरणावरून खाली नजर टाकल्यास रमणीय देखावा दिसतो. धरणाच्या झडपांमधून पडलेले पाणी अर्धवर्तुळाकार कुंडातून पुढे वाहत जाते. पाणी कुंडात पडताना उडणारे तुषार मन प्रसन्न करीत होते. दूरवर पाण्याची भली मोठी टाकी दिसत होती. शिक्षकांनी सांगितले की तिथे जलशुद्धिकरण प्रकल्प आहे. धरणाचे पाणी तिथे शुद्ध केले जाते. दक्षिण गोव्याला या पाण्याचा पुरवठा होतो.

या धरणाच्या परिसरात पर्यटकांसाठी बांधण्यात आलेले विश्रामधाम आम्ही पाहिले. तिथे एक सुंदर बाग आहे. बागेत आकर्षक कारंजे आहे. बागेत मौजमजा करून आम्ही संध्याकाळी आनंदाने घरी परतलो.

---

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. सहलीसाठी मुले कोणकोणत्या ठिकाणी गेली होती?

२. गाभाऱ्यात छतावर काय कोरले आहे?

३. तांबडीसुर्ल येथील मंदिर कोणत्या काळांत बांधले आहे?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. हेमाडपंती रचना म्हणजे काय?

२. साळावली धरणाच्या परिसरात पर्यटकांसाठी कोणकोणत्या सोयी आहेत?



सांगितली. ते म्हणाले, ''अकराव्या शतकाच्या सुमारास गोव्यात कदंब राजांची राजवट होती. कदंब राजांनीच हे मंदिर बांधून घेतले. या बांधकामात कुठेही चुना अगर सिमेंट यांचा वापर केलेला नाही. एकावर एक दगड रचूनच या देवालयाची रचना केली गेली आहे. या मंदिराचे छप्परही दगडी आहे. संपूर्ण मंदिराची बांधणी हेमाडपंती आहे.''

मंदिरापुढील खळखळ वाहणाऱ्या ओहोळात आम्ही हातपाय धुतले. शिक्षक व आम्ही सर्वांनी सहभोजन केले. जेवताना खूपच मजा आली. जेवणानंतर थोड्या वेळाने तिथून निघायची शिक्षकांनी सूचना केली. आम्हाला तेथून निघवेसेच वाटेना. नाईलाजाने बसमध्ये चढलो.

आता आमची बस साळावली धरणाकडे निघाली. हे धरण सांगे शहरापासून सुमारे चार कि. मी. अंतरावर आहे. साळावली धरणाजवळ बस पोहोचली. हा परिसर नयनरम्य आहे. दोन डोंगरामधून वाहणाऱ्या साळावली नदीवर हे धरण बांधले आहे. चालत चालत आम्ही बंधाऱ्यावर पोहोचलो. धरणावरून खाली नजर टाकल्यास रमणीय देखावा दिसतो. धरणाच्या झडपांमधून पडलेले पाणी अर्धवर्तुळाकार कुंडातून पुढे वाहत जाते. पाणी कुंडात पडताना उडणारे तुषार मन प्रसन्न करीत होते. दूरवर पाण्याची भली मोठी टाकी दिसत होती. शिक्षकांनी सांगितले की तिथे जलशुद्धिकरण प्रकल्प आहे. धरणाचे पाणी तिथे शुद्ध केले जाते. दक्षिण गोव्याला या पाण्याचा पुरवठा होतो.

या धरणाच्या परिसरात पर्यटकांसाठी बांधण्यात आलेले विश्रामधाम आम्ही पाहिले. तिथे एक सुंदर बाग आहे. बागेत आकर्षक कारंजे आहे. बागेत मौजमजा करून आम्ही संध्याकाळी आनंदाने घरी परतलो.

---

**प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. सहलीसाठी मुले कोणकोणत्या ठिकाणी गेली होती?

२. गाभाऱ्यात छतावर काय कोरले आहे?

३. तांबडीसुर्ल येथील मंदिर कोणत्या काळांत बांधले आहे?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. हेमाडपंती रचना म्हणजे काय?

२. साळावली धरणाच्या परिसरात पर्यटकांसाठी कोणकोणत्या सोयी आहेत?

७३

**व्यवसाय :**

**१) कंसात काही शब्द दिले आहेत. त्यातील योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण करून लिहा.**

**(शिवलिंग, अर्धवर्तुळाकार, विश्रामधाम, पूर्वाभिमुख, नयनरम्य)**

१. तांबडीसुर्ल येथील श्रीशिवमंदिर ............ आहे.
२. मंदिराच्या गाभाऱ्यात ............ आहे.
३. साळावली येथे पर्यटकांसाठी खास ............ बांधलेले आहे.
४. साळावली धरणात केली गेलेली ............ रचना फारच मोहक आहे.
५. साळावली धरणासभोवतालचा परिसर ............ आहे.

**२) 'गाभारा + आत' असे दोन शब्द मिळून 'गाभाऱ्यात' हा शब्द बनतो. याप्रमाणे खालील शब्द लिहा.**

देव्हारा + आत मनोरा + आत
पेटारा + आत नगारा + आत

**३) पूर्व दिशेकडे तोंड करून आहे त्याला 'पूर्वाभिमुख' म्हणतात. त्याप्रमाणे खालील शब्द लिहा.**

पश्चिमेकडे तोंड करून असणारे ............
दक्षिणेकडे तोंड करून असणारे ............
उत्तरेकडे तोंड करून असणारे ............

◆◆◆



**व्यवसाय :**

**१) कंसात काही शब्द दिले आहेत. त्यातील योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण करून लिहा.**

**(शिवलिंग, अर्धवर्तुळाकार, विश्रामधाम, पूर्वाभिमुख, नयनरम्य)**

१. तांबडीसुर्ल येथील श्रीशिवमंदिर ............ आहे.
२. मंदिराच्या गाभाऱ्यात ............ आहे.
३. साळावली येथे पर्यटकांसाठी खास ............ बांधलेले आहे.
४. साळावली धरणात केली गेलेली ............ रचना फारच मोहक आहे.
५. साळावली धरणासभोवतालचा परिसर ............ आहे.

**२) 'गाभारा + आत' असे दोन शब्द मिळून 'गाभाऱ्यात' हा शब्द बनतो. याप्रमाणे खालील शब्द लिहा.**

देव्हारा + आत मनोरा + आत
पेटारा + आत नगारा + आत


**३) पूर्व दिशेकडे तोंड करून आहे त्याला 'पूर्वाभिमुख' म्हणतात. त्याप्रमाणे खालील शब्द लिहा.**

पश्चिमेकडे तोंड करून असणारे ............
दक्षिणेकडे तोंड करून असणारे ............
उत्तरेकडे तोंड करून असणारे ............

◆◆◆

७४

# २४. आदर्श ग्रामपंचायत





पूर्वी पत्र पाठवून कळविल्याप्रमाणे पत्रकारांचे आगमन झाले. सरपंचांनी त्यांचे स्वागत केले. उपस्थित ग्रामस्थांशी त्यांचा परिचय करून दिला. चहापानाचा कार्यक्रम चालू असताना पत्रकारांनी सरपंचांना विचारले,

''सरपंच, तुमचा गाव पूर्ण साक्षर झाला आहे. तुम्ही यावर्षी बक्षीसही मिळविले आहे. त्याबद्दल अभिनंदन. आता आम्हाला सांगा, तुमचा गाव साक्षर करण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या गोष्टी केल्या?

''साक्षरतेची योजना यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्वांनी जिद्दीने काम केलं. सर्व पंचांनी आपापल्या वाड्यातील निरक्षरांची माहिती गोळा केली. तरुण मुलांनी या कामात फार मोठी मदत केली. 'एकाने एकास शिकवावे' या उपक्रमानुसार हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील निरक्षरांना शिकविले. गावात प्रौढ साक्षरता केंद्रे होती. त्यांना लागणारे साहित्य अपुरे होते. जागेची व दिवाबत्तीची अडचण होती. ती आम्ही दूर केली. त्यांना लागणारे साहित्य ग्रामपंचायतीमार्फत पुरविले. प्रौढांना साक्षरतावर्गाची गोडी लागावी म्हणून दूरदर्शन संचाची सोय केली. सर्व प्रौढ साक्षरांचा एक मेळावा आयोजित केला. त्यांच्यासाठी



# २४. आदर्श ग्रामपंचायत



पूर्वी पत्र पाठवून कळविल्याप्रमाणे पत्रकारांचे आगमन झाले. सरपंचांनी त्यांचे स्वागत केले. उपस्थित ग्रामस्थांशी त्यांचा परिचय करून दिला. चहापानाचा कार्यक्रम चालू असताना पत्रकारांनी सरपंचांना विचारले,

''सरपंच, तुमचा गाव पूर्ण साक्षर झाला आहे. तुम्ही यावर्षी बक्षीसही मिळविले आहे. त्याबद्दल अभिनंदन. आता आम्हाला सांगा, तुमचा गाव साक्षर करण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या गोष्टी केल्या?

''साक्षरतेची योजना यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्वांनी जिद्दीने काम केलं. सर्व पंचांनी आपापल्या वाड्यातील निरक्षरांची माहिती गोळा केली. तरुण मुलांनी या कामात फार मोठी मदत केली. 'एकाने एकास शिकवावे' या उपक्रमानुसार हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील निरक्षरांना शिकविले. गावात प्रौढ साक्षरता केंद्रे होती. त्यांना लागणारे साहित्य अपुरे होते. जागेची व दिवाबत्तीची अडचण होती. ती आम्ही दूर केली. त्यांना लागणारे साहित्य ग्रामपंचायतीमार्फत पुरविले. प्रौढांना साक्षरतावर्गाची गोडी लागावी म्हणून दूरदर्शन संचाची सोय केली. सर्व प्रौढ साक्षरांचा एक मेळावा आयोजित केला. त्यांच्यासाठी

७५

स्पर्धा ठेवल्या. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे दिली. या सर्व गोष्टी करताना थोडासा त्रास झाला खरा. पण सर्वांची जिद्द, मेहनत व गावाबद्दलचा अभिमान या गोष्टी एकत्र आल्याने आम्ही शंभर टक्के यशस्वी उद्दिष्ट गाठू शकलो.'' सरपंच उत्साहाने म्हणाले.

''ही योजना यशस्वी करण्यासाठी तुम्ही बराच पैसा खर्च केलेला दिसतो. हा सर्व खर्च तुम्हीच केला की सरकारने मदत दिली?'' पत्रकारांनी विचारले.

''सरकारने तर मदत केलीच. शिवाय ग्रामपंचायत फंडातून आम्ही खूप पैसे खर्च केलेत. आमच्या ग्रामपंचायतीचा फंड फार कमी होता. फंड कमी असेल तर विकास करणे अवघड असते. यासाठी आम्ही एक योजना आखली. सार्वजनिक जागेत एक फळबाग तयार केली आहे. १०/१२ वर्षे झाली या योजनेला. या बागेत आम्ही माड लावले. आंब्याची कलमे लावली. देखरेखीसाठी नोकर ठेवला आहे. आता या झाडांचे उत्पन्न मिळू लागले आहे. पंचायतीच्या फंडात वाढ झाली आहे. या फंडातून आम्ही बालोद्यान व क्रीडांगणाचीही सोय केली आहे. गावकऱ्यांचा आणखी एक फायदा झाला आहे. गेली कित्येक वर्षे घरपट्टीचा दर आम्ही वाढविलेला नाही.''

''चला आपण सर्वजण आमची फळबाग पहायला जाऊ.'' सरपंचांनी विनंती केली.

सर्वजण बागेजवळ पोहोचले.

''तुमची बाग चांगली आहे. अशाप्रकारची योजना आणखी कुठल्या गावात असेल असे वाटत नाही. माड व आंब्याच्या झाडांना मुबलक पाणी लागतं नाही का? मग तुम्ही या बागेसाठी पाणी कुठून आणता?'' फळबागेची स्तुती करत पत्रकारांनी विचारले.

''आमच्या गावाच्या शेजारी नदी आहे. ही नदी गावाला वरदान ठरली आहे. नदीत बाराही महिने पाणी असते. सरकारी योजनेतून नदीवर मोठे पंप बसविले आहेत. पंपांच्या सहाय्याने नदीचे पाणी वर खेचले जाते. त्या उंच टेकडीवर एक मोठी टाकी बांधली आहे या टाकीत पाण्याचा साठा करण्यात येतो. हेच पाणी आम्हाला या बागेसाठी मिळते. शेतकरी उन्हाळ्यात या पाण्याचा उपयोग करतात. या योजनेमुळे आमची पिण्याच्या पाण्याचीही सोय झाली आहे.'' उंच टाकीकडे बाट दाखवत सरपंच म्हणाले.

''सरपंच गावात आणखी कोणकोणत्या सुधारणा झाल्या आहेत? आणि कोणकोणत्या व्हायच्या आहेत?''

''सुधारणेच्या बाबतीत म्हणायचे तर गावात पक्के रस्ते आहेत. वाहतुकीची सोय आहे. वाचनालय, सहकारी सोसायटी, डाकघर यांची सोय आहे. गावात सगळीकडे वीज पुरवठा झालेला आहे. पण आमच्या गावात सार्वजनिक सभागृह नसल्याने मोठी गैरसोय होते. यासाठी एक समाजमंदिर बांधण्याचा विचार आहे. गावातील वाचनालय चांगले चालते



स्पर्धा ठेवल्या. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे दिली. या सर्व गोष्टी करताना थोडासा त्रास झाला खरा. पण सर्वांची जिद्द, मेहनत व गावाबद्दलचा अभिमान या गोष्टी एकत्र आल्याने आम्ही शंभर टक्के यशस्वी उद्दिष्ट गाठू शकलो.'' सरपंच उत्साहाने म्हणाले.

''ही योजना यशस्वी करण्यासाठी तुम्ही बराच पैसा खर्च केलेला दिसतो. हा सर्व खर्च तुम्हीच केला की सरकारने मदत दिली?'' पत्रकारांनी विचारले.

''सरकारने तर मदत केलीच. शिवाय ग्रामपंचायत फंडातून आम्ही खूप पैसे खर्च केलेत. आमच्या ग्रामपंचायतीचा फंड फार कमी होता. फंड कमी असेल तर विकास करणे अवघड असते. यासाठी आम्ही एक योजना आखली. सार्वजनिक जागेत एक फळबाग तयार केली आहे. १०/१२ वर्षे झाली या योजनेला. या बागेत आम्ही माड लावले. आंब्याची कलमे लावली. देखरेखीसाठी नोकर ठेवला आहे. आता या झाडांचे उत्पन्न मिळू लागले आहे. पंचायतीच्या फंडात वाढ झाली आहे. या फंडातून आम्ही बालोद्यान व क्रीडांगणाचीही सोय केली आहे. गावकऱ्यांचा आणखी एक फायदा झाला आहे. गेली कित्येक वर्षे घरपट्टीचा दर आम्ही वाढविलेला नाही.''

''चला आपण सर्वजण आमची फळबाग पहायला जाऊ.'' सरपंचांनी विनंती केली.

सर्वजण बागेजवळ पोहोचले.

''तुमची बाग चांगली आहे. अशाप्रकारची योजना आणखी कुठल्या गावात असेल असे वाटत नाही. माड व आंब्याच्या झाडांना मुबलक पाणी लागतं नाही का? मग तुम्ही या बागेसाठी पाणी कुठून आणता?'' फळबागेची स्तुती करत पत्रकारांनी विचारले.

''आमच्या गावाच्या शेजारी नदी आहे. ही नदी गावाला वरदान ठरली आहे. नदीत बाराही महिने पाणी असते. सरकारी योजनेतून नदीवर मोठे पंप बसविले आहेत. पंपांच्या सहाय्याने नदीचे पाणी वर खेचले जाते. त्या उंच टेकडीवर एक मोठी टाकी बांधली आहे या टाकीत पाण्याचा साठा करण्यात येतो. हेच पाणी आम्हाला या बागेसाठी मिळते. शेतकरी उन्हाळ्यात या पाण्याचा उपयोग करतात. या योजनेमुळे आमची पिण्याच्या पाण्याचीही सोय झाली आहे.'' उंच टाकीकडे बाट दाखवत सरपंच म्हणाले.

''सरपंच गावात आणखी कोणकोणत्या सुधारणा झाल्या आहेत? आणि कोणकोणत्या व्हायच्या आहेत?''

''सुधारणेच्या बाबतीत म्हणायचे तर गावात पक्के रस्ते आहेत. वाहतुकीची सोय आहे. वाचनालय, सहकारी सोसायटी, डाकघर यांची सोय आहे. गावात सगळीकडे वीज पुरवठा झालेला आहे. पण आमच्या गावात सार्वजनिक सभागृह नसल्याने मोठी गैरसोय होते. यासाठी एक समाजमंदिर बांधण्याचा विचार आहे. गावातील वाचनालय चांगले चालते

७६



पण जागा अपुरी पडते. समाजमंदिर झाल्यावर वाचनालयासाठी प्रशस्त जागा उपलब्ध होईल. समाजमंदिरासाठी सरकारकडे पत्रव्यवहार चालू आहे.''

''सरपंच, ही समोर दिसते ती इमारत कसली?'' नवीन इमारतीकडे बोट दाखवत पत्रकारांनी विचारले.

''ही इमारत आरोग्य केंद्राची. हल्लीच ही इमारत बांधण्यात आली आहे. पण आरोग्य केंद्र अद्याप सुरू झालेले नाही. आरोग्यकेंद्र सुरू झाल्यावर आमची औषधोपचाराची सोय होईल. कायमचा डॉक्टर इथे असेल.''

''बरं सरपंच, आम्ही तुमचा बराच वेळ घेतला. तुमचा गाव आम्हाला खूप आवडला. निघतो आम्ही आता.''

''बरं, अशीच आठवण ठेवा. पुन्हा या केव्हातरी. नमस्कार.''





पण जागा अपुरी पडते. समाजमंदिर झाल्यावर वाचनालयासाठी प्रशस्त जागा उपलब्ध होईल. समाजमंदिरासाठी सरकारकडे पत्रव्यवहार चालू आहे.''

''सरपंच, ही समोर दिसते ती इमारत कसली?'' नवीन इमारतीकडे बोट दाखवत पत्रकारांनी विचारले.

''ही इमारत आरोग्य केंद्राची. हल्लीच ही इमारत बांधण्यात आली आहे. पण आरोग्य केंद्र अद्याप सुरू झालेले नाही. आरोग्यकेंद्र सुरू झाल्यावर आमची औषधोपचाराची सोय होईल. कायमचा डॉक्टर इथे असेल.''

''बरं सरपंच, आम्ही तुमचा बराच वेळ घेतला. तुमचा गाव आम्हाला खूप आवडला. निघतो आम्ही आता.''

''बरं, अशीच आठवण ठेवा. पुन्हा या केव्हातरी. नमस्कार.''

७७

**शब्दार्थ :**

**ग्रामस्थ –** गावचे रहिवासी. **साक्षर –** लिहिता वाचता येणारा.

**वाक्प्रचार :**

**उद्दिष्ट गाठणे –** ठरविलेली गोष्ट साध्य करणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. सरपंचांनी पत्रकारांचा परिचय कोणाशी करून दिला?
२. सरपंचांचे पत्रकारांनी अभिनंदन का केले?
३. साक्षरता योजनेचा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कोणता उपक्रम राबवला?
४. समाजमंदिरामुळे वाचनालयाला कोणता फायदा होणार आहे?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन/चार वाक्यांत लिहा.**

१. प्रौढ साक्षरता योजना यशस्वी करण्यास कोणी कोणी मदत केली?
२. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ कशी झाली?
३. घरपट्टीच्या दरात वाढ का करण्यात आली नाही?
४. गावात शिक्षणाच्या कोणकोणत्या सोयी आहेत?

**व्यवसाय :**

**खालील वाक्ये वाचा.**

मुलगा पुस्तक वाचतो.
मुलाने पुस्तक वाचले.
मुलगा पुस्तक वाचेल.

या तीनही वाक्यांतून क्रिया कोणत्या वेळी घडते याचा बोध होतो.
पहिल्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'आता' घडते असे कळते.
दुसऱ्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'पूर्वी' घडली हे कळते.
तिसऱ्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'पुढे' घडेल असे कळते.

क्रियापदावरून क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो त्यास 'काळ' असे म्हणतात. असे मुख्य काळ तीन आहेत.



**शब्दार्थ :**

**ग्रामस्थ –** गावचे रहिवासी. **साक्षर –** लिहिता वाचता येणारा.

**वाक्प्रचार :**

**उद्दिष्ट गाठणे –** ठरविलेली गोष्ट साध्य करणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

१. सरपंचांनी पत्रकारांचा परिचय कोणाशी करून दिला?
२. सरपंचांचे पत्रकारांनी अभिनंदन का केले?
३. साक्षरता योजनेचा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कोणता उपक्रम राबवला?
४. समाजमंदिरामुळे वाचनालयाला कोणता फायदा होणार आहे?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी तीन/चार वाक्यांत लिहा.**

१. प्रौढ साक्षरता योजना यशस्वी करण्यास कोणी कोणी मदत केली?
२. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात वाढ कशी झाली?
३. घरपट्टीच्या दरात वाढ का करण्यात आली नाही?
४. गावात शिक्षणाच्या कोणकोणत्या सोयी आहेत?

**व्यवसाय :**

**खालील वाक्ये वाचा.**

मुलगा पुस्तक वाचतो.
मुलाने पुस्तक वाचले.
मुलगा पुस्तक वाचेल.

या तीनही वाक्यांतून क्रिया कोणत्या वेळी घडते याचा बोध होतो.
पहिल्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'आता' घडते असे कळते.
दुसऱ्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'पूर्वी' घडली हे कळते.
तिसऱ्या वाक्यात वाचण्याची क्रिया 'पुढे' घडेल असे कळते.

क्रियापदावरून क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो त्यास 'काळ' असे म्हणतात. असे मुख्य काळ तीन आहेत.

७८

क्रियापदावरून क्रिया चालू आहे असे जेव्हा समजते, तेव्हा क्रियापद वर्तमानकाळी असते. क्रियापदावरून क्रिया पूर्वी झाली असे जेव्हा समजते तेव्हा क्रियापद भूतकाळी असते व क्रियापदावरून क्रिया पुढे व्हावयाची आहे असे जेव्हा समजते, तेव्हा क्रियापद भविष्यकाळी असते.

उदा. अरुण शाळेत जातो. (वर्तमानकाळ)
अरुण शाळेत गेला. (भूतकाळ)
अरुण शाळेत जाईल. (भविष्यकाळ)

**उपक्रम :**

तुमच्या गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात भेट देऊन खालील माहिती मिळवा व नोंद करा.

१) ग्रामपंचायतीचे नाव, २) गावचे क्षेत्रफळ, ३) लोकसंख्या, ४) गावातील महत्त्वाचे उद्योगधंदे, ५) क्रीडासंस्था, ६) गावातील सार्वजनिक संस्था, ७) महत्त्वाची धार्मिक स्थळे.

◆◆◆



क्रियापदावरून क्रिया चालू आहे असे जेव्हा समजते, तेव्हा क्रियापद वर्तमानकाळी असते. क्रियापदावरून क्रिया पूर्वी झाली असे जेव्हा समजते तेव्हा क्रियापद भूतकाळी असते व क्रियापदावरून क्रिया पुढे व्हावयाची आहे असे जेव्हा समजते, तेव्हा क्रियापद भविष्यकाळी असते.

उदा. अरुण शाळेत जातो. (वर्तमानकाळ)
अरुण शाळेत गेला. (भूतकाळ)
अरुण शाळेत जाईल. (भविष्यकाळ)

**उपक्रम :**

तुमच्या गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात भेट देऊन खालील माहिती मिळवा व नोंद करा.

१) ग्रामपंचायतीचे नाव, २) गावचे क्षेत्रफळ, ३) लोकसंख्या, ४) गावातील महत्त्वाचे उद्योगधंदे, ५) क्रीडासंस्था, ६) गावातील सार्वजनिक संस्था, ७) महत्त्वाची धार्मिक स्थळे.

◆◆◆

७९

# २५. घोडेमोडणी

घोडेमोडणी ही एक लोककला. गोव्यातील अनेक लहानमोठ्या गावात घोडेमोडणी होते. काही गावातील घोडेमोडणी ही शिमगोत्सवातील प्रमुख आकर्षण आहे. मोरजी, डिचोली, ठाणे-सत्तरी वगैरे गावातील घोडेमोडणी प्रसिद्ध आहे. आजूबाजूच्या गावातील बरीच मंडळी घोडेमोडणी पाहण्यासाठी मंदिराच्या परिसरात जमा होतात. मंदिर व परिसर विद्युत रोषणाईने सजवितात. अनेक प्रकारच्या दुकानांनी परिसर गजबजलेला असतो.

घोडेमोडणी या खेळाचा घोड्यांशी संबंध आहे. घोडेस्वारांचे युद्धनृत्य त्यात असते. घोडेस्वाराचा पोशाख रंगीबेरंगी असतो. सलवार, अंगात बाराबंदी, डोक्याला फेटा किंवा पगडी असते. गळ्यात मण्यांच्या माळा घालतात. भरजरी पोशाखात स्वार रुबाबदार दिसतो. ऐतिहासिक प्रसंगानुसार वेषभूषा व रंगभूषा असते.

ढोल, ताशा, समेळ, तुतारी या रणवाद्यांच्या आवाजात घोड्यांची मिरवणूक निघते. सुरवातीला अवघेच घोडेस्वार मिरवणुकीत असतात. थोड्या थोड्या वेळाने बाकीचे घोडेस्वार मिरवणुकीत सामील होतात. घोडेस्वारापैकी एकजण नेता बनतो. बाकीचे नेत्याचे रक्षण करण्याकरिता सज्ज राहतात. ते हातात उघड्या तलवारी घेऊन नेत्यासभोवती नाचतात. काहीजण नेत्याचे अंगरक्षक बनतात, तर काहीजण टेहळणीसाठी दूरवर नाचतात. ते नेत्याला वेळोवेळी संदेश पाठवितात. घोडेस्वार कधी एकाच जागी थयथय नाचतो तर कधी दूरपर्यंत नाचत जातो व गरकन फिरकी घेऊन मागे वळतो. युद्धाचा प्रसंग असेल तर खेळात रंगत येते. शत्रूची चाहूल लागल्याचे समजून काही घोडेस्वार शत्रूवर तुटून पडतात व शत्रुपक्षाला गारद करतात. कधी आक्रमक पवित्रा तर कधी माघारही घेतली जाते. शत्रुपक्षाचा पाठलाग करणारे घोडेस्वार इकडून-तिकडे तिकडून-इकडे भरधाव वेगाने पळतात. हा खेळ बराच वेळ चालतो. यासाठी खूप जोम आवश्यक असतो. एखादा घोडेस्वार नवखा असेल तर त्याला खेळापूर्वी अनेक दिवस सराव दिला जातो. त्यासाठी जाणकाराची मदत घेतली जाते.

या खेळाच्या पूर्वी बरीच तयारी करावी लागते. घोड्याचा लाकडी मुखवटा तयार असतो. त्याच्या शरीराचा भाग बांबूपासून बनवितात. गावातील एखादा जाणकार व कसबी कारागीर सांगाडा बनवितो. हा सांगाडा स्वाराच्या कंबरेला बांधता यावा म्हणून मध्यभाग पोकळ ठेवतात.

खेळाला सुरुवात करण्यापूर्वी घोडेस्वार सजविले जातात. स्वाराच्या कंबरेला सांगाडा घट्ट बांधतात. पुढच्या बाजूला घोड्याचा मुखवटा व मागच्या बाजूस शेपूट असते. सांगाड्यावर



# २५. घोडेमोडणी

घोडेमोडणी ही एक लोककला. गोव्यातील अनेक लहानमोठ्या गावात घोडेमोडणी होते. काही गावातील घोडेमोडणी ही शिमगोत्सवातील प्रमुख आकर्षण आहे. मोरजी, डिचोली, ठाणे-सत्तरी वगैरे गावातील घोडेमोडणी प्रसिद्ध आहे. आजूबाजूच्या गावातील बरीच मंडळी घोडेमोडणी पाहण्यासाठी मंदिराच्या परिसरात जमा होतात. मंदिर व परिसर विद्युत रोषणाईने सजवितात. अनेक प्रकारच्या दुकानांनी परिसर गजबजलेला असतो.

घोडेमोडणी या खेळाचा घोड्यांशी संबंध आहे. घोडेस्वारांचे युद्धनृत्य त्यात असते. घोडेस्वाराचा पोशाख रंगीबेरंगी असतो. सलवार, अंगात बाराबंदी, डोक्याला फेटा किंवा पगडी असते. गळ्यात मण्यांच्या माळा घालतात. भरजरी पोशाखात स्वार रुबाबदार दिसतो. ऐतिहासिक प्रसंगानुसार वेषभूषा व रंगभूषा असते.

ढोल, ताशा, समेळ, तुतारी या रणवाद्यांच्या आवाजात घोड्यांची मिरवणूक निघते. सुरवातीला अवघेच घोडेस्वार मिरवणुकीत असतात. थोड्या थोड्या वेळाने बाकीचे घोडेस्वार मिरवणुकीत सामील होतात. घोडेस्वारापैकी एकजण नेता बनतो. बाकीचे नेत्याचे रक्षण करण्याकरिता सज्ज राहतात. ते हातात उघड्या तलवारी घेऊन नेत्यासभोवती नाचतात. काहीजण नेत्याचे अंगरक्षक बनतात, तर काहीजण टेहळणीसाठी दूरवर नाचतात. ते नेत्याला वेळोवेळी संदेश पाठवितात. घोडेस्वार कधी एकाच जागी थयथय नाचतो तर कधी दूरपर्यंत नाचत जातो व गरकन फिरकी घेऊन मागे वळतो. युद्धाचा प्रसंग असेल तर खेळात रंगत येते. शत्रूची चाहूल लागल्याचे समजून काही घोडेस्वार शत्रूवर तुटून पडतात व शत्रुपक्षाला गारद करतात. कधी आक्रमक पवित्रा तर कधी माघारही घेतली जाते. शत्रुपक्षाचा पाठलाग करणारे घोडेस्वार इकडून-तिकडे तिकडून-इकडे भरधाव वेगाने पळतात. हा खेळ बराच वेळ चालतो. यासाठी खूप जोम आवश्यक असतो. एखादा घोडेस्वार नवखा असेल तर त्याला खेळापूर्वी अनेक दिवस सराव दिला जातो. त्यासाठी जाणकाराची मदत घेतली जाते.

या खेळाच्या पूर्वी बरीच तयारी करावी लागते. घोड्याचा लाकडी मुखवटा तयार असतो. त्याच्या शरीराचा भाग बांबूपासून बनवितात. गावातील एखादा जाणकार व कसबी कारागीर सांगाडा बनवितो. हा सांगाडा स्वाराच्या कंबरेला बांधता यावा म्हणून मध्यभाग पोकळ ठेवतात.

खेळाला सुरुवात करण्यापूर्वी घोडेस्वार सजविले जातात. स्वाराच्या कंबरेला सांगाडा घट्ट बांधतात. पुढच्या बाजूला घोड्याचा मुखवटा व मागच्या बाजूस शेपूट असते. सांगाड्यावर

८०



रंगीबेरंगी कापड घालतात. घोडा पूर्ण सजविल्यानंतर स्वार अश्वारूढ असल्यासारखा वाटतो. स्वाराचे पाय दिसू नयेत म्हणून घोड्याच्या पाठीवरून लांबलचक झालर सोडतात. या झालरीवरून घोड्याचा रंग ठरतो.

भारताच्या प्रजासत्ताकदिनी डिचोलीतील घोडेमोडणी दिल्लीच्या राजपथावर सादर केल्याने या लोककलेला राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी लाभली आहे.

---

**शब्दार्थ :**

**बाराबंदी –** सदरा. **घोडेस्वार –** घोड्यावर बसलेला माणूस. **संदेश –** निरोप. **टेहळणी –** दुरून केलेले निरीक्षण. **अश्व –** घोडा. **अश्वारूढ –** घोड्यावर बसलेला.

**वाक्प्रचार :**

**तुटून पडणे –** एकदम हल्ला करणे. **गारद करणे –** पराभव करणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणकोणत्या गावातील घोडेमोडणी प्रसिद्ध आहेत?
२. घोडेमोडणीच्या मिरवणुकीच्या वेळी कोणकोणती वाद्ये वाजवतात?
३. प्रजासत्ताकदिनी डिचोलीची घोडेमोडणी कुठे सादर केली होती?





रंगीबेरंगी कापड घालतात. घोडा पूर्ण सजविल्यानंतर स्वार अश्वारूढ असल्यासारखा वाटतो. स्वाराचे पाय दिसू नयेत म्हणून घोड्याच्या पाठीवरून लांबलचक झालर सोडतात. या झालरीवरून घोड्याचा रंग ठरतो.

भारताच्या प्रजासत्ताकदिनी डिचोलीतील घोडेमोडणी दिल्लीच्या राजपथावर सादर केल्याने या लोककलेला राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी लाभली आहे.

**शब्दार्थ :**

**बाराबंदी –** सदरा. **घोडेस्वार –** घोड्यावर बसलेला माणूस. **संदेश –** निरोप. **टेहळणी –** दुरून केलेले निरीक्षण. **अश्व –** घोडा. **अश्वारूढ –** घोड्यावर बसलेला.

**वाक्प्रचार :**

**तुटून पडणे –** एकदम हल्ला करणे. **गारद करणे –** पराभव करणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणकोणत्या गावातील घोडेमोडणी प्रसिद्ध आहेत?
२. घोडेमोडणीच्या मिरवणुकीच्या वेळी कोणकोणती वाद्ये वाजवतात?
३. प्रजासत्ताकदिनी डिचोलीची घोडेमोडणी कुठे सादर केली होती?

८१

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. घोडेमोडणीतील घोडेस्वाराचा पोशाख कसा असतो?

२. घोडेस्वार आपल्या नेत्याचे रक्षण कसे करतात?

**व्यवसाय :**

**खाली कंसात विशेषणे दिली आहेत. त्यांचा योग्य उपयोग करून वाक्ये पूर्ण करून लिहा.**

(मंजूळ, दयाळू, रंगीबेरंगी, लाकडी, लांबलचक)

१. सरस्वतीपूजनाच्या वेळी मुलांनी ......... पताका लावल्या.

२. मतदान केंद्रावर मतदारांच्या ......... रांगा लागल्या होत्या.

३. सुतार ......... खुर्च्या बनवतो.

४. कोकिळ ......... आवाजात गातो.

५. गरिबांना ......... माणसेच मदत करतात.

**उपक्रम :**

वेगवेगळ्या प्रकारची धालोगीते व फुगडीगीते मिळवून तुमच्या गाण्याच्या वहीत लिहा.

◆◆◆



**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३/४ वाक्यांत लिहा.**

१. घोडेमोडणीतील घोडेस्वाराचा पोशाख कसा असतो?

२. घोडेस्वार आपल्या नेत्याचे रक्षण कसे करतात?

**व्यवसाय :**

**खाली कंसात विशेषणे दिली आहेत. त्यांचा योग्य उपयोग करून वाक्ये पूर्ण करून लिहा.**

(मंजूळ, दयाळू, रंगीबेरंगी, लाकडी, लांबलचक)

१. सरस्वतीपूजनाच्या वेळी मुलांनी ......... पताका लावल्या.

२. मतदान केंद्रावर मतदारांच्या ......... रांगा लागल्या होत्या.

३. सुतार ......... खुर्च्या बनवतो.

४. कोकिळ ......... आवाजात गातो.

५. गरिबांना ......... माणसेच मदत करतात.

**उपक्रम :**

वेगवेगळ्या प्रकारची धालोगीते व फुगडीगीते मिळवून तुमच्या गाण्याच्या वहीत लिहा.

◆◆◆

८२

# २६. उरूस



इस्लाम धर्मात अनेक साधू-संत होऊन गेले. त्या प्रत्येकाचा शिष्य-परिवार असतो. हे शिष्य आपआपल्या गुरूच्या शिकवणुकीचा प्रचार करतात. त्यासाठी ते गावोगाव फिरतात, मात्र मुख्य शिष्य संताच्या समाधीजवळ राहतो. त्याला त्या समाधीचा खलिफा म्हणतात, तर समाधीला दरगाह म्हणतात. खलिफा दरगाहची देखभाल करतो.

मुस्लीम धर्मातील अनेक संतांचे दरगाह श्रद्धास्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याठिकाणी दरवर्षी त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. यालाच 'उरूस' असे म्हणतात. उरूसाच्या दिवशी निरनिराळ्या ठिकाणी विविध कार्यक्रम केले जातात. या दिवशी सर्व शिष्य व त्या धर्मातील लोक दरगाहच्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमा होतात.

या दिवशी दरगाह सुगंधित पाण्याने धुतात. हे काम काही शिष्य किंवा निकटवर्ती



# २६. उरूस



इस्लाम धर्मात अनेक साधू-संत होऊन गेले. त्या प्रत्येकाचा शिष्य-परिवार असतो. हे शिष्य आपआपल्या गुरूच्या शिकवणुकीचा प्रचार करतात. त्यासाठी ते गावोगाव फिरतात, मात्र मुख्य शिष्य संताच्या समाधीजवळ राहतो. त्याला त्या समाधीचा खलिफा म्हणतात, तर समाधीला दरगाह म्हणतात. खलिफा दरगाहची देखभाल करतो.

मुस्लीम धर्मातील अनेक संतांचे दरगाह श्रद्धास्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याठिकाणी दरवर्षी त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. यालाच 'उरूस' असे म्हणतात. उरूसाच्या दिवशी निरनिराळ्या ठिकाणी विविध कार्यक्रम केले जातात. या दिवशी सर्व शिष्य व त्या धर्मातील लोक दरगाहच्या ठिकाणी मोठ्या संख्येने जमा होतात.

या दिवशी दरगाह सुगंधित पाण्याने धुतात. हे काम काही शिष्य किंवा निकटवर्ती

८३

करतात. काहीजण आजूबाजूचा परिसर स्वच्छ करतात. दरगाहची इमारत विद्युत रोषणाईने सुशोभित करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण करते.

रात्री फार मोठी मिरवणूक काढतात. हिरव्या रंगाची चादर, सुवासिक फुले, उगाळलेले सुगंधित चंदन आणि मलिदासारखे गोडधोड पदार्थ व फळे एका भल्या मोठ्या परातीत भरून दरगाहच्या ठिकाणी आणतात. या मिरवणुकीत संतांचे शिष्य तसेच इतर लोकही सहभागी होतात. मिरवणुकीतील सर्व लेक हातपाय धुऊन दरगाहजवळ जातात.

दरगाहच्या मुख्य पुजाऱ्याला मुजावर म्हणतात. मिरवणुकीने आणलेली नवी चादर मुजावर स्व:त उचलून इतरांच्या मदतीने समाधीवर घालतात, त्याच वेळी पूर्वीची चादर मागे ओढतात व तिची घडी करून व्यवस्थित ठेवतात. नवी चादर समाधीवर नीट घातल्यानंतर त्या चादरीवर सुगंधित अत्तर शिंपडतात. नंतर सुवासिक फुलांची जाळीदार चादर अनेक शिष्यांच्या मदतीने दरगाहवर पसरवतात. या चादरीवर मुजावर चंदन लावतो. त्यानंतर इतर शिष्य क्रमाक्रमाने चंदन लावतात. चंदन लेपनाच्या या रात्रीला 'संदल की रात' असे म्हणतात. हा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतो. या कार्यक्रमाच्यावेळी सगळे मिळून गुरूची थोरवी वर्णन करणारे काव्य म्हणतात व शेवटी समाधीला नमन करतात. त्यानंतर जमलेल्या सर्वांना फळफळावळ व मिठाई प्रसाद म्हणून वाटतात.

दुसऱ्या दिवशी दुपारी मांसाहारी भोजनाचा खास कार्यक्रम असतो. अनेक भाविक स्वखुशीने एकत्र येऊन जेवण तयार करतात. भाविकांनी दिलेल्या देणगीतून किंवा दरगाहच्या उत्पन्नातून जेवणाचा खर्च केला जातो. सर्व उपस्थितांना जेवण दिले जाते. काही ठिकाणी जेवणाऐवजी साखरभात 'प्रसाद' म्हणून दिला जातो.

रात्री कव्वालीचा खास कार्यक्रम असतो. कव्वालीमध्ये संतांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे वर्णन असते. कव्वाली गायनात अनेक स्त्री व पुरुष कलाकार भाग घेतात. कार्यक्रमास इतर धर्मीय रसिकांची बरीच गर्दी असते. गायकाला योग्य बिदागी देऊन त्याचा आदर केला जातो. उत्कृष्ट गायकाला रसिकांकडून रोख बक्षिसे दिली जातात. कव्वाली गायनाचा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतो. शेवटी इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर यांना सलाम करून या कार्यक्रमाची सांगता होते.

---

**शब्दार्थ :**

**मलिदा –** गूळ व गव्हाच्या पिठापासून केलेला खाद्यपदार्थ. **बिदागी –** देणगी. **निकटवर्ती –** नात्यातील. **कव्वाली –** उर्दू काव्याचा एक प्रकार.



करतात. काहीजण आजूबाजूचा परिसर स्वच्छ करतात. दरगाहची इमारत विद्युत रोषणाईने सुशोभित करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण करते.

रात्री फार मोठी मिरवणूक काढतात. हिरव्या रंगाची चादर, सुवासिक फुले, उगाळलेले सुगंधित चंदन आणि मलिदासारखे गोडधोड पदार्थ व फळे एका भल्या मोठ्या परातीत भरून दरगाहच्या ठिकाणी आणतात. या मिरवणुकीत संतांचे शिष्य तसेच इतर लोकही सहभागी होतात. मिरवणुकीतील सर्व लेक हातपाय धुऊन दरगाहजवळ जातात.

दरगाहच्या मुख्य पुजाऱ्याला मुजावर म्हणतात. मिरवणुकीने आणलेली नवी चादर मुजावर स्व:त उचलून इतरांच्या मदतीने समाधीवर घालतात, त्याच वेळी पूर्वीची चादर मागे ओढतात व तिची घडी करून व्यवस्थित ठेवतात. नवी चादर समाधीवर नीट घातल्यानंतर त्या चादरीवर सुगंधित अत्तर शिंपडतात. नंतर सुवासिक फुलांची जाळीदार चादर अनेक शिष्यांच्या मदतीने दरगाहवर पसरवतात. या चादरीवर मुजावर चंदन लावतो. त्यानंतर इतर शिष्य क्रमाक्रमाने चंदन लावतात. चंदन लेपनाच्या या रात्रीला 'संदल की रात' असे म्हणतात. हा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतो. या कार्यक्रमाच्यावेळी सगळे मिळून गुरूची थोरवी वर्णन करणारे काव्य म्हणतात व शेवटी समाधीला नमन करतात. त्यानंतर जमलेल्या सर्वांना फळफळावळ व मिठाई प्रसाद म्हणून वाटतात.

दुसऱ्या दिवशी दुपारी मांसाहारी भोजनाचा खास कार्यक्रम असतो. अनेक भाविक स्वखुशीने एकत्र येऊन जेवण तयार करतात. भाविकांनी दिलेल्या देणगीतून किंवा दरगाहच्या उत्पन्नातून जेवणाचा खर्च केला जातो. सर्व उपस्थितांना जेवण दिले जाते. काही ठिकाणी जेवणाऐवजी साखरभात 'प्रसाद' म्हणून दिला जातो.

रात्री कव्वालीचा खास कार्यक्रम असतो. कव्वालीमध्ये संतांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे वर्णन असते. कव्वाली गायनात अनेक स्त्री व पुरुष कलाकार भाग घेतात. कार्यक्रमास इतर धर्मीय रसिकांची बरीच गर्दी असते. गायकाला योग्य बिदागी देऊन त्याचा आदर केला जातो. उत्कृष्ट गायकाला रसिकांकडून रोख बक्षिसे दिली जातात. कव्वाली गायनाचा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतो. शेवटी इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत महंमद पैगंबर यांना सलाम करून या कार्यक्रमाची सांगता होते.

**शब्दार्थ :**

**मलिदा –** गूळ व गव्हाच्या पिठापासून केलेला खाद्यपदार्थ. **बिदागी –** देणगी. **निकटवर्ती –** नात्यातील. **कव्वाली –** उर्दू काव्याचा एक प्रकार.

८४

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी उत्तरे लिहा.**

१. खलिफा कोणते काम करतो?
२. उरूस कशाला म्हणतात?
३. दरगाहच्या पुजाऱ्याला काय म्हणतात?
४. उरूसाच्या रात्री प्रसाद म्हणून कोणते पदार्थ वाटतात?
५. उरूसाच्या दुसऱ्या दिवशी रात्री कोणता कार्यक्रम असतो?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

१. उरूसाच्या तयारीसाठी दरगाहजवळ कोणकोणती कामे केली जातात?
२. मिरवणुकीने परातीतून कोणकोणत्या वस्तू आणतात?
३. 'संदल की रात' या कार्यक्रमाया वेळी काय काय करतात?

**व्यवसाय :**

**खालील शब्दांना पाठात वापरलेले समानार्थी शब्द लिहा.**

**जसे : मुख्य शिष्य – खलिफा**

साधू ......... समाधी .........
पुजारी ......... सुगंधित .........
भोजन .........

**उपक्रम :**

वेगवेगळ्या धार्मिक सणांदिवशी कोणकोणते पदार्थ करतात, त्यांची माहिती मिळवा व यादी तयार करा.

◆◆◆



**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी उत्तरे लिहा.**

१. खलिफा कोणते काम करतो?
२. उरूस कशाला म्हणतात?
३. दरगाहच्या पुजाऱ्याला काय म्हणतात?
४. उरूसाच्या रात्री प्रसाद म्हणून कोणते पदार्थ वाटतात?
५. उरूसाच्या दुसऱ्या दिवशी रात्री कोणता कार्यक्रम असतो?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

१. उरूसाच्या तयारीसाठी दरगाहजवळ कोणकोणती कामे केली जातात?
२. मिरवणुकीने परातीतून कोणकोणत्या वस्तू आणतात?
३. 'संदल की रात' या कार्यक्रमाया वेळी काय काय करतात?

**व्यवसाय :**

**खालील शब्दांना पाठात वापरलेले समानार्थी शब्द लिहा.**

**जसे : मुख्य शिष्य – खलिफा**

साधू ......... समाधी .........
पुजारी ......... सुगंधित .........
भोजन .........

**उपक्रम :**

वेगवेगळ्या धार्मिक सणांदिवशी कोणकोणते पदार्थ करतात, त्यांची माहिती मिळवा व यादी तयार करा.

◆◆◆

८५

# २७. लुईची देणगी

एका खेडेगावात आठ-दहा वर्षाचा एक मुलगा राहत होता. त्याच्या घरासमोरच एक लोहाराचे एक घर होते. एकदा त्या लोहाराच्या घरासमोर खूप गर्दी जमलेली होती व



विव्हळण्याचा आवाज ऐकू येत होता. त्या मुलाने तो आवाज ऐकला व धावतच तो तिकडे गेला. त्याने पाहिले, लोहार एका तापविलेल्या लांब सळईने एका माणसाच्या जखमेवर चटके देत होता. त्या माणसाला पिसाळलेल्या कुत्रा चावला होता व त्यावर उपचार केले जात होते असे त्याला कळले. लोहाराने दिलेल्या प्रत्येक चटक्याबरोबर तो माणूस मोठमोठ्याने ओरडे. हे दृश्य पाहून त्या मुलाने तेथून आपल्या घराकडे धूम ठोकली. त्या मुलाचे नाव होते 'लुई'.

लुई घरी आला. पण त्याचे कशातच लक्ष लागेना. त्याने पाहिलेले ते भयंकर दृश्य त्याच्या नजरेसमोर येऊ लागले. त्याने वडिलांना विचारले, ''बाबा, कुत्रा का पिसाळतो? त्याच्या चावण्यामुळे माणसे का मरतात?'' वडिलांना त्याच्या प्रश्नांची उत्तरे माहीत नव्हती. त्यामुळे लुईच्या मनात ते प्रश्न तसेच राहिले.

अशीच काही वर्षे निघून गेली. लुईने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याने रोगजंतूविषयी संशोधन कार्य सुरू केले. प्रथम त्याने रेशमाच्या किड्यांना होणाऱ्या रोगाचे संशोधन करून त्यावर इलाज शोधून काढला. त्यानंतर मेंढ्यांना होणाऱ्या रोगावर रोगप्रतिबंधक लस त्याने शोधून काढली. त्यामुळे त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.

त्यानंतर त्याने पिसाळलेल्या कुत्र्याविषयीचे संशोधन सुरू केले. लुई पाश्चरने आपल्याजवळ अनेक पिसाळलेली कुत्री जमविली व त्यांचे निरीक्षण करू लागला. प्रथम त्याला वाटले, पिसाळलेल्या कुत्र्यांच्या लाळेत विष असते. कुत्रा माणसाला चावला की लाळेतील रोगजंतू माणसाच्या रक्तात जातात. त्याने पिसाळलेल्या कुत्र्याची लाळ ससे, मेंढ्या यांना टोचून पाहिली. पण त्यांच्या रक्तात रोगजंतू सापडले नाहीत. तेव्हा त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या कृतीचे निरीक्षण केले. हे कुत्रे पाण्याला घाबरतात. जमिनीला तोंड



# २७. लुईची देणगी

एका खेडेगावात आठ-दहा वर्षाचा एक मुलगा राहत होता. त्याच्या घरासमोरच एक लोहाराचे एक घर होते. एकदा त्या लोहाराच्या घरासमोर खूप गर्दी जमलेली होती व



विव्हळण्याचा आवाज ऐकू येत होता. त्या मुलाने तो आवाज ऐकला व धावतच तो तिकडे गेला. त्याने पाहिले, लोहार एका तापविलेल्या लांब सळईने एका माणसाच्या जखमेवर चटके देत होता. त्या माणसाला पिसाळलेल्या कुत्रा चावला होता व त्यावर उपचार केले जात होते असे त्याला कळले. लोहाराने दिलेल्या प्रत्येक चटक्याबरोबर तो माणूस मोठमोठ्याने ओरडे. हे दृश्य पाहून त्या मुलाने तेथून आपल्या घराकडे धूम ठोकली. त्या मुलाचे नाव होते 'लुई'.

लुई घरी आला. पण त्याचे कशातच लक्ष लागेना. त्याने पाहिलेले ते भयंकर दृश्य त्याच्या नजरेसमोर येऊ लागले. त्याने वडिलांना विचारले, ''बाबा, कुत्रा का पिसाळतो? त्याच्या चावण्यामुळे माणसे का मरतात?'' वडिलांना त्याच्या प्रश्नांची उत्तरे माहीत नव्हती. त्यामुळे लुईच्या मनात ते प्रश्न तसेच राहिले.

अशीच काही वर्षे निघून गेली. लुईने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याने रोगजंतूविषयी संशोधन कार्य सुरू केले. प्रथम त्याने रेशमाच्या किड्यांना होणाऱ्या रोगाचे संशोधन करून त्यावर इलाज शोधून काढला. त्यानंतर मेंढ्यांना होणाऱ्या रोगावर रोगप्रतिबंधक लस त्याने शोधून काढली. त्यामुळे त्याची कीर्ती सर्वत्र पसरली.

त्यानंतर त्याने पिसाळलेल्या कुत्र्याविषयीचे संशोधन सुरू केले. लुई पाश्चरने आपल्याजवळ अनेक पिसाळलेली कुत्री जमविली व त्यांचे निरीक्षण करू लागला. प्रथम त्याला वाटले, पिसाळलेल्या कुत्र्यांच्या लाळेत विष असते. कुत्रा माणसाला चावला की लाळेतील रोगजंतू माणसाच्या रक्तात जातात. त्याने पिसाळलेल्या कुत्र्याची लाळ ससे, मेंढ्या यांना टोचून पाहिली. पण त्यांच्या रक्तात रोगजंतू सापडले नाहीत. तेव्हा त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या कृतीचे निरीक्षण केले. हे कुत्रे पाण्याला घाबरतात. जमिनीला तोंड

८६

लावून विचित्र आवाज काढतात, जोरजोराने धावत राहतात, चावण्याचा प्रयत्न करतात. हे पाहून त्याला वाटू लागले की, हा रोग मेंदूचाच असला पाहिजे. त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूचा अभ्यास करण्यास सुरुवात केली.

बऱ्याच प्रयत्नानंतर त्याने एका पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूतील द्राव चांगल्या कुत्र्याच्या मेंदूत सोडला व तो निरीक्षण करू लागला. दोन आठवड्यांनी तो चांगला कुत्र पिसाळला व त्यातच तो मेला.



त्याचा अंदाज खरा ठरला. त्यानंतर त्याने अनेक कुत्रे, ससे यांच्यावर प्रयोग केले. आता त्याचे सारे लक्ष या रोगाची रोगप्रतिबंधक लस कशी तयार करावी याकडे केंद्रित झाले. त्यासाठी त्याने शेकडो कुत्र्यांना आपल्या प्रयोगशाळेत डांबून ठेवले व त्यांच्यावर तो प्रयोग करू लागला. एकदा त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूतील द्राव काढून एका निर्जंतुक बाटलीत चौदा दिवस ठेवला. नंतर त्याचे एक इंजक्शन बनवून निरोगी कुत्र्याला दिले. पण आश्चर्य म्हणजे त्या कुत्र्याला रोग झाला नाही. ते पाहून त्याने सौम्य अशी प्रतिबंधक लस तयार केली व त्याचा पडताळा पाहिला. ज्या कुत्र्याला ही लस दिली त्याला पिसाळलेला कुत्रा चावूनही काही होत नाही हे त्याच्या लक्षात आले. लुई पाश्चरला रोग प्रतिबंधक लस सापडली.

आतापर्यंत त्याने केलेले प्रयोग प्राण्यांवर होते. पण कुत्रा चावलेल्या माणसावर या लसीचा उपयोग किती होतो हे पाहणे आवश्यक होते. आपण पिसाळलेला कुत्रा



लावून विचित्र आवाज काढतात, जोरजोराने धावत राहतात, चावण्याचा प्रयत्न करतात. हे पाहून त्याला वाटू लागले की, हा रोग मेंदूचाच असला पाहिजे. त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूचा अभ्यास करण्यास सुरुवात केली.

बऱ्याच प्रयत्नानंतर त्याने एका पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूतील द्राव चांगल्या कुत्र्याच्या मेंदूत सोडला व तो निरीक्षण करू लागला. दोन आठवड्यांनी तो चांगला कुत्र पिसाळला व त्यातच तो मेला.



त्याचा अंदाज खरा ठरला. त्यानंतर त्याने अनेक कुत्रे, ससे यांच्यावर प्रयोग केले. आता त्याचे सारे लक्ष या रोगाची रोगप्रतिबंधक लस कशी तयार करावी याकडे केंद्रित झाले. त्यासाठी त्याने शेकडो कुत्र्यांना आपल्या प्रयोगशाळेत डांबून ठेवले व त्यांच्यावर तो प्रयोग करू लागला. एकदा त्याने पिसाळलेल्या कुत्र्याच्या मेंदूतील द्राव काढून एका निर्जंतुक बाटलीत चौदा दिवस ठेवला. नंतर त्याचे एक इंजक्शन बनवून निरोगी कुत्र्याला दिले. पण आश्चर्य म्हणजे त्या कुत्र्याला रोग झाला नाही. ते पाहून त्याने सौम्य अशी प्रतिबंधक लस तयार केली व त्याचा पडताळा पाहिला. ज्या कुत्र्याला ही लस दिली त्याला पिसाळलेला कुत्रा चावूनही काही होत नाही हे त्याच्या लक्षात आले. लुई पाश्चरला रोग प्रतिबंधक लस सापडली.

आतापर्यंत त्याने केलेले प्रयोग प्राण्यांवर होते. पण कुत्रा चावलेल्या माणसावर या लसीचा उपयोग किती होतो हे पाहणे आवश्यक होते. आपण पिसाळलेला कुत्रा

८७

चावलेल्या माणसाला ही लस टोचली व तो माणूस मेला तर! अशी भीती त्याला वाटत होती. पण अचानक एक संधी चालून आली. 'जोसेफ' नावाच्या एका मुलाला पिसाळलेला कुत्रा चावला. पिसाळलेल्या कुत्र्यांना व त्यांच्या चावण्यामुळे माणसांना होणाऱ्या रोगास 'रॅबिज' किंवा 'हायड्रोफोबिया' असे म्हणतात. जोसेफला डॉक्टरकडे नेण्यात आले. पण त्या डॉक्टरकडे कुत्रा चावलेल्यावर काही औषधोपचार नव्हते, तेव्हा त्या डॉक्टरच्याच सांगण्यावरून जोसेफला पाश्चरकडे आणण्यात आले. 'हायड्रोफोबिया' विरुद्ध एक इंजेक्शन लुई पाश्चरने जोसेफ यास दिले. ही घटना सन १८८५ सालची. त्यानंतर लसीची प्रखरता वाढवून एकूण चौदा इंजेक्शन त्याला देण्यात आली. जोसेफला रॅबिज रोग झाला नाही. असाध्य रोगावर पाश्चरने नवे औषध शोधून काढले होते. पाश्चरचे नाव जगभर झाले.

पिसाळलेला कुत्रा चावल्यावर एकच इलाज आज जगास माहीत आहे आणि तो म्हणजे पाश्चरने तयार केलेली लस. या लसीमुळे आपण आज 'रॅबीज' होऊ नये म्हणून उपाय करू शकतो व आपले प्राण वाचवू शकतो.

---

**शब्दार्थ :**

**द्राव** – पातळ पदार्थ. **निर्जंतुक** – जंतू विरहीत. **विव्हळणे** – वेदनेने तळमळणे. **संशोधन करणे** – शोध लावणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोहाराच्या घरी एक माणूस वेदनेने का विव्हळत होता?
२. कुत्रा चावलेल्या माणसावर लोहार कोणता उपाय करीत होता?
३. पिसाळलेला कुत्रा चावून माणसांना होणाऱ्या रोगास काय म्हणतात?
४. 'हायड्रोफोबिया' या रोगावरील रोगप्रतिबंधक पहिले इंजेक्शन पाश्चरने कोणास दिले?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

१. लुईने आपल्या घराकडे धूम का ठोकली?
२. लुई पाश्चरने आपल्याजवळील वेडी कुत्री का जमविली?
३. 'रॅबिज' या रोगावरील प्रतिबंधक लस लुई पाश्चरने कशी तयार केली?
४. लुई पाश्चरची कीर्ती सर्वत्र का पसरली?



चावलेल्या माणसाला ही लस टोचली व तो माणूस मेला तर! अशी भीती त्याला वाटत होती. पण अचानक एक संधी चालून आली. 'जोसेफ' नावाच्या एका मुलाला पिसाळलेला कुत्रा चावला. पिसाळलेल्या कुत्र्यांना व त्यांच्या चावण्यामुळे माणसांना होणाऱ्या रोगास 'रॅबिज' किंवा 'हायड्रोफोबिया' असे म्हणतात. जोसेफला डॉक्टरकडे नेण्यात आले. पण त्या डॉक्टरकडे कुत्रा चावलेल्यावर काही औषधोपचार नव्हते, तेव्हा त्या डॉक्टरच्याच सांगण्यावरून जोसेफला पाश्चरकडे आणण्यात आले. 'हायड्रोफोबिया' विरुद्ध एक इंजेक्शन लुई पाश्चरने जोसेफ यास दिले. ही घटना सन १८८५ सालची. त्यानंतर लसीची प्रखरता वाढवून एकूण चौदा इंजेक्शन त्याला देण्यात आली. जोसेफला रॅबिज रोग झाला नाही. असाध्य रोगावर पाश्चरने नवे औषध शोधून काढले होते. पाश्चरचे नाव जगभर झाले.

पिसाळलेला कुत्रा चावल्यावर एकच इलाज आज जगास माहीत आहे आणि तो म्हणजे पाश्चरने तयार केलेली लस. या लसीमुळे आपण आज 'रॅबीज' होऊ नये म्हणून उपाय करू शकतो व आपले प्राण वाचवू शकतो.

**शब्दार्थ :**

**द्राव** – पातळ पदार्थ. **निर्जंतुक** – जंतू विरहीत. **विव्हळणे** – वेदनेने तळमळणे. **संशोधन करणे** – शोध लावणे.

**प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोहाराच्या घरी एक माणूस वेदनेने का विव्हळत होता?
२. कुत्रा चावलेल्या माणसावर लोहार कोणता उपाय करीत होता?
३. पिसाळलेला कुत्रा चावून माणसांना होणाऱ्या रोगास काय म्हणतात?
४. 'हायड्रोफोबिया' या रोगावरील रोगप्रतिबंधक पहिले इंजेक्शन पाश्चरने कोणास दिले?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २/३ वाक्यांत लिहा.**

१. लुईने आपल्या घराकडे धूम का ठोकली?
२. लुई पाश्चरने आपल्याजवळील वेडी कुत्री का जमविली?
३. 'रॅबिज' या रोगावरील प्रतिबंधक लस लुई पाश्चरने कशी तयार केली?
४. लुई पाश्चरची कीर्ती सर्वत्र का पसरली?

८८

**व्यवसाय :**

**खाली दिलेले वाक्य वाचा.**

**त्या माणसाच्या जखमेवर तो चटके देत होता.**

वरील वाक्याच्या शेवटी 'देत होता'असे क्रियापद आले आहे. 'देणे' आणि 'असणे' या दोन मूळ क्रियापदांची ती रूपे आहेत. यासारखी क्रियापदे असलेली या पाठातील पाच वाक्ये लिहा.

**उपक्रम :**

भारतीय शास्त्रज्ञांची चित्रे मिळवून वहीत चिकटवा व त्या खाली त्यांची व त्यांनी लावलेल्या शोधांची नावे लिहा.

◆◆◆



**व्यवसाय :**

**खाली दिलेले वाक्य वाचा.**

**त्या माणसाच्या जखमेवर तो चटके देत होता.**

वरील वाक्याच्या शेवटी 'देत होता'असे क्रियापद आले आहे. 'देणे' आणि 'असणे' या दोन मूळ क्रियापदांची ती रूपे आहेत. यासारखी क्रियापदे असलेली या पाठातील पाच वाक्ये लिहा.

**उपक्रम :**

भारतीय शास्त्रज्ञांची चित्रे मिळवून वहीत चिकटवा व त्या खाली त्यांची व त्यांनी लावलेल्या शोधांची नावे लिहा.

◆◆◆

८९

# खरा धर्म

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।
जगी जे हीन अतिपतित
जगी जे दीन पद-दलित
तया जाऊन उठवावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
सदा जे आर्त अति विकल
जयांना गांजिती सकल
तया जाऊन हसवावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
कुणा ना व्यर्थ शिणवावे
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधु मानावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे । जगाला प्रेम अर्पावे ।।

– साने गुरुजी

◆◆◆



# खरा धर्म

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावे ।।
जगी जे हीन अतिपतित
जगी जे दीन पद-दलित
तया जाऊन उठवावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
सदा जे आर्त अति विकल
जयांना गांजिती सकल
तया जाऊन हसवावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
कुणा ना व्यर्थ शिणवावे
कुणा ना व्यर्थ हिणवावे
समस्ता बंधु मानावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
प्रभूची लेकरे सारी
तयाला सर्वही प्यारी
कुणा ना तुच्छ लेखावे । जगाला प्रेम अर्पावे ।।
असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्था प्राणही द्यावे । जगाला प्रेम अर्पावे ।।

– साने गुरुजी

◆◆◆

९०

# या भारतात



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
                    दे वरचि असा दे ।।
हे सर्व पंथसंप्रदाय एक दिसू दे ।।
                    मतभेद नसू दे ।।धृ.।।
सकळास कळो मानवता राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय प्रार्थना
उद्योगि तरुण शीलवान येथ दिसू दे
                    दे वरचि असा दे ।।१।।
जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी
जगनिंदका मनीहि सत्य न्याय वसू दे
                    दे वरचि असा दे ।।२।।
सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गि ज्यापरी
नष्ट होऊ दे विपत्ति भीति बावरी
तुकड्यास सदा या सेवेमाजि वसू दे
                    दे वरचि असा दे ।।३।।

◆◆◆



# या भारतात



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
                    दे वरचि असा दे ।।
हे सर्व पंथसंप्रदाय एक दिसू दे ।।
                    मतभेद नसू दे ।।धृ.।।
सकळास कळो मानवता राष्ट्रभावना
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय प्रार्थना
उद्योगि तरुण शीलवान येथ दिसू दे
                    दे वरचि असा दे ।।१।।
जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी
जगनिंदका मनीहि सत्य न्याय वसू दे
                    दे वरचि असा दे ।।२।।
सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गि ज्यापरी
नष्ट होऊ दे विपत्ति भीति बावरी
तुकड्यास सदा या सेवेमाजि वसू दे
                    दे वरचि असा दे ।।३।।

◆◆◆

९१

# आज गाऊ आरती

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ आरती
लक्ष हस्त लक्ष पाद हृदय एक भारती ॥
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती ॥

भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ॥
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥

भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न जरी, एक गगन-माती ॥
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमल-पुष्प हासते, पाकळ्यांतुनी किती ॥

**– राजा मंगळवेढेकर**

◆◆◆




# आज गाऊ आरती

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ आरती
लक्ष हस्त लक्ष पाद हृदय एक भारती ॥
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती ॥

भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ॥
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥

भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न जरी, एक गगन-माती ॥
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमल-पुष्प हासते, पाकळ्यांतुनी किती ॥

**– राजा मंगळवेढेकर**

◆◆◆

९२

## भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

भारतीय राज्यघटनेत खालील मूलभूत कर्तव्यांचा अंतर्भाव केला आहे.

१. भारतीय राज्यघटनेचे पालन करणे आणि तिच्या तत्त्वांचा, संस्थांचा तसेच राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा सन्मान करणे.

२. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणारी उदात्त तत्त्वे हृदयात जतन करून त्यांचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

४. देशरक्षणासाठी व देशसेवेसाठी हाक येईल तेव्हा समर्पित होणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रांतिक इत्यादी भेदभाव न मानता सर्व भारतीयांत एकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करणे, तसेच महिलांचा सन्मान आणि प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या रीतिरिवाजांचा परित्याग करणे.

६. विविधतेने नटलेल्या आपल्या वैभवसंपन्न वारशाचा सन्मान राखून तो जतन करणे.

७. राने, तलाव, नद्या आणि वन्यप्राणी अंतर्भूत असलेल्या नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, तसेच सर्व जीवसृष्टीशी दयाभावाने वागणे.

८. वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद, जिज्ञासा आणि सुधारक वृत्ती यांची जोपासना करणे.

९. सामाजिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि प्रतिज्ञापूर्वक हिंसाचारापासून दूर राहणे.

१०. सर्व क्षेत्रातील वैयक्तिक आणि सांघिक कार्यात सर्वोत्तमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे.


## भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

भारतीय राज्यघटनेत खालील मूलभूत कर्तव्यांचा अंतर्भाव केला आहे.

१. भारतीय राज्यघटनेचे पालन करणे आणि तिच्या तत्त्वांचा, संस्थांचा तसेच राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा सन्मान करणे.

२. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणारी उदात्त तत्त्वे हृदयात जतन करून त्यांचे पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता यांचे संरक्षण व संवर्धन करणे.

४. देशरक्षणासाठी व देशसेवेसाठी हाक येईल तेव्हा समर्पित होणे.

५. धार्मिक, भाषिक, प्रांतिक इत्यादी भेदभाव न मानता सर्व भारतीयांत एकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करणे, तसेच महिलांचा सन्मान आणि प्रतिष्ठा यांना बाधा आणणाऱ्या रीतिरिवाजांचा परित्याग करणे.

६. विविधतेने नटलेल्या आपल्या वैभवसंपन्न वारशाचा सन्मान राखून तो जतन करणे.

७. राने, तलाव, नद्या आणि वन्यप्राणी अंतर्भूत असलेल्या नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे, तसेच सर्व जीवसृष्टीशी दयाभावाने वागणे.

८. वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद, जिज्ञासा आणि सुधारक वृत्ती यांची जोपासना करणे.

९. सामाजिक मालमत्तेचे संरक्षण करणे आणि प्रतिज्ञापूर्वक हिंसाचारापासून दूर राहणे.

१०. सर्व क्षेत्रातील वैयक्तिक आणि सांघिक कार्यात सर्वोत्तमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे.